... प्रकाशशी बोलताना मला एक गमतीदार साक्षात्कार झाला. प्रकाश हा एकेकाळचा आमच्या शाळेचा कवी. आज तो संगणक क्षेत्रात काम करतो. एकदा पायाभूत संकल्पना समजल्यावर तो स्वतःहून शिकत गेला आणि आज त्यातला तज्ज्ञ झाला आहे. मी त्याला विचारले, ''प्रकाश, हल्ली तू कविता का करत नाहीस?'' त्यावर तो म्हणाला, ''पूर्वी मी कुठेही असलो, काहीही करत असलो, तरी डोक्यात कवितेचेच विषय असत. मी ओळींचा, चपखल बसणाऱ्या शब्दांचाच विचार करत असे. आज माझ्या डोक्यात संगणकाचेच विचार असतात, अमुक करण्यासाठी काय काय करावे लागेल, तमुक हे अशा प्रकारे करता येईल का, हे माझ्या डोक्यात कायम घोळत असते.'' थोडक्यात प्रकाशची सृजनशीलता लेखनावरून संगणकावर संक्रमित झाली आहे.

मुलांना शाळेत आम्ही अवांतर वाचायला सांगत असतो, तेव्हा पालक हटकून म्हणतात, ''तो काय पुढे लेखक, कवी होणार आहे का? कशाला या फालतू गोष्टींवर वेळ घालवता? प्रश्नोत्तरे घ्या तेवढी.'' अशा वेळी त्यांना आता सांगेन, ''अहो, सृजनशीलता काय फक्त लेखनातूनच प्रकट होऊ शकते? तुमची मुलं सृजनशील डॉक्टर, इंजिनिअर, शासकीय अधिकारी, काहीही होऊ शकतील.''

सृजनशीलता असणे ही कोणत्याही व्यक्तीची नैसर्गिक गरज आहे. ती सृजनशीलता विविध गोष्टींमधून प्रकट होऊ शकते, अगदी व्यक्तीच्या वागण्या-बोलण्यातूनही. व्यक्ती-व्यक्तींमधील संबंध ती सुंदर बनवते. सार्वजनिक जीवनातही ती दिसते. तिला कुठेच पायबंद घालू नये. शाळेत तर बिलकूल नाही, कारण सृजनशीलतेचा पाया तर तिथेच आहे.

डॉ. मंजिरी निमकर

9 788179 252253

मूल्य पंचाहत्तर रुपये

# मुलांचे सृजनात्मक लिखाण

मंजिरी निमकर



ज्योत्स्ना प्रकाशन

# प्रस्तावना

शालेय स्तरावर भारतीय भाषांचे प्रथम भाषा शिक्षण याबद्दल फारसे लेखन झालेले नाही व सृजनात्मक लेखनाबद्दल तर काहीच नाही. या पार्श्वभूमीवर मंजिरी निमकर यांच्या 'मुलांचे सृजनात्मक लिखाण' या पुस्तकाला विशेष महत्त्व प्राप्त होते.

पुस्तक छोटेखानी असले तरी ते प्रदीर्घ प्रक्रियेचे फळ आहे. प्रगत शिक्षण संस्थेच्या कमला निंबकर बालभवन या शाळेमध्ये मुले सुरुवातीपासून लिहीत होती. मात्र मंजूताईंनी डोळसपणे केलेल्या प्रयत्नामुळे या लेखन प्रक्रियेला सातत्य मिळाले. १९९६ साली नवनीत हा शाळेचा पहिला वार्षिक अंक प्रसिद्ध झाला, त्यात त्यांचा मोठा वाटा होता. दुसरा अंक तीन वर्षांनी निघाला आणि २००४ पासून दर वर्षी १ मे रोजी शाळेच्या निकालाच्या दिवशी- नवनीतचा अंक निघतो. या अंकांचे श्रेय मंजूताईंना जाते.

सुरुवातीपासून मुलांच्या सृजनशील लेखनाबद्दल मंजूताईंना रस व अंतर्ज्ञानी समज होती; तरी मार्च २००६ ते २००८ मध्ये त्या मुंबई येथील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमध्ये एम.ए. करीत असताना या विषयावर त्यांचा विचार जास्त स्पष्ट व्हायला लागला. एका नवीन दृष्टिकोनातून त्या आपल्या शाळेच्या मुलांचे लेखन पाहायला लागल्या. मुलांचे सृजनशील लेखन म्हणजे काय, त्याचे टप्पे काय आहेत, त्याचे मोजमाप कसे करायचे, त्याला पोषक वातावरण कसे द्यायचे, शिक्षकांची भूमिका काय या प्रश्नांचा त्या विचार करायला लागल्या.

''सृजनशील असणे ही कोणत्याही व्यक्तीची नैसर्गिक गरज असते,'' हे त्यांचे विधान अत्यंत मार्मिक आहे. सृजनशीलता केवळ कवी-लेखक होणाऱ्या मुलांसाठीच महत्त्वाची नसते तर प्रत्येक माणसाची लहानपणी केलेली सृजनशील

अभिव्यक्ती ही आयुष्यभराची मोलाची ठेव असते हे मंजूताईंचे म्हणणे सर्व पालक, शिक्षक व शिक्षण अधिकाऱ्यांना समजायला पाहिजे.

मंजूताईंच्या मते, सृजनशील लेखन म्हणजे अनुभवांचे कथन असते.

*सृजनशील लेखनाचे बीज अनुभवांमधून रुजते. मूल जेव्हा स्वानुभव कथन करते तेव्हा ते लिखाण सुंदरच असते कारण ते पारदर्शक आणि प्रांजळ असते.*

मंजूताईंचा दृष्टिकोन १९७०-१९८० च्या दशकामध्ये इंग्लंडमध्ये काम करीत असलेल्या जेम्स ब्रिटन, हॅरल्ड व कॉनी रोजन आणि सिबिल मार्शल या शिक्षणतज्ज्ञांच्या विचारांशी मिळता-जुळता आहे. कॉनी रोजन यांनी तर देशभर हिंडून विविध शाळांतील मुलांच्या लेखनाचे नमुने गोळा करून The Language of Primary School Children हे पुस्तक पती हॅरल्ड रोजन यांच्याबरोबर प्रसिद्ध केले.

रोजन दांपत्याच्या व मंजूताईंच्या कामात एक महत्त्वाचे साम्य आढळते-ते म्हणजे गरीब, ग्रामीण भागातील अथवा (रोजन यांच्या बाबतीत) मजूर वर्गातील मुलांच्या लेखनाकडे विशेष लक्ष. ही मुले फार चांगले लेखन करू शकतात, अशी त्यांची भूमिका आहे. मंजूताईंचे निरीक्षण आहे की अनेक वेळा उत्कृष्ट लिहिणाऱ्या मुलांचे आई-वडील निरक्षर किंवा अर्ध-शिक्षित असतात व ही मुले नेहमीच इतर विषयांमध्ये हुशार समजली जातातच, असे नव्हे.

सृजनशील लेखनाचे जे टप्पे मंजूताईंना दिसतात त्यांचे विश्लेषण त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे म्हणून त्यांचे तपशील इथे देण्याची आवश्यकता नाही. काही टप्प्यांचा उल्लेख मात्र केल्याशिवाय मला राहवत नाही. मंजूताईंच्या मते पहिला टप्पा म्हणजे अनुभवांचे प्रांजळ कथन. त्याच्या पुढच्या टप्प्याबद्दल त्या म्हणतातः

*सृजनात्मक लेखनाची यावरची पायरी म्हणजे घटनेच्या भावनिक प्रतिक्रियांच्या पलीकडे जाऊन आपल्या अनुभवांकडे एखाद्या तिऱ्हाइताच्या नजरेतून बघता येणे व वाचणाऱ्याला ते अनुभव रसपूर्ण वाटतील अशा रीतीने मांडणे.*

बाल मानसशास्त्राच्या दृष्टीने एखाद्या मुलाला असे दुसऱ्या व्यक्तीच्या नजरेतून बघता येणे हा मनाच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. याचा दुवा मंजूताईंनी सृजनशील लेखनाशी जोडला आहे, हे विशेष अर्थपूर्ण वाटते.



मंजूताईंना आढळलेले आहे की १२ ते १४ या वयातील मुले पूर्णपणे काल्पनिक गोष्टी लिहायला लागतात. चांगल्या-वाईटाचा संघर्ष व चांगल्याचा विजय हे या गोष्टींचे केंद्रबिंदू. याबाबत त्या म्हणतातः

*मुलांची एकूण जडण-घडण व जीवन-मूल्ये ठरविण्याच्या पौगंडावस्थेच्या अतिशय महत्त्वाच्या अवस्थेत मुलांचा जगातल्या भल्यावरचा हा विश्वास आश्वासक वाटतो.*

आजकाल शालेय स्तरावर सृजनशील लेखनाच्या महत्त्वाचा आग्रह करणे हे फार आवश्यक आहे. ब्रिटन व अमेरिकेमध्ये शिक्षण सुधारण्याच्या नावाने शाळांवर सरकारी नियंत्रण वाढले आहे. व्यवस्थापनशास्त्राच्या वाढत्या प्रभावामुळे विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या गुण-श्रेणी यांना अवास्तव महत्त्व दिले जात आहे. विद्यार्थ्यांना कमी गुण मिळाले तर शिक्षकांना व शाळांना पूर्णपणे जबाबदार धरले जाते. भारतात NCERT सृजनशीलतेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करीत असली तरी राज्य पातळीवर शिक्षण मंडळे त्याची दखल नेहमीच घेतात असे नाही. शिक्षण ''सुधारण्यासाठी'' ते एकामागून एक कठोर उपाययोजना करतात.

सद्यःपरिस्थितीत प्रगत शिक्षण संस्थेने नुकत्याच स्थापन केलेल्या भाषा, साक्षरता व संज्ञापन केंद्र या उपक्रमाला विशेष महत्त्व आहे, असे म्हणायला काही हरकत नाही. सर रतन टाटा ट्रस्टच्या साहाय्याने स्थापन झालेले हे केंद्र भारतीय भाषा शिक्षणाला तात्त्विक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न करणार आहे. कमला निंबकर बालभवनमध्ये होत असलेले काम आणि येथील शिक्षकांचा अनुभव याचे या केंद्रात विशेष स्थान असावे असे आम्हाला वाटते. या केंद्राच्या निमित्ताने मंजूताईंच्या दीर्घकाळ केलेल्या चिंतनाला पुस्तकरूप मिळाले याबद्दल समाधान वाटते. या पुस्तकामुळे महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात मुलांच्या सृजनात्मक लेखनाला चालना मिळेल, अशी आशा आहे.

•

डॉ. मॅक्सीन बर्नसन
संचालक
भाषा, साक्षरता व संज्ञापन केंद्र
प्रगत शिक्षण संस्था
फलटण

# मनोगत

कमला निंबकर बालभवनमध्ये जेव्हा मी प्रथम मुलांबरोबर एक पर्यावरणविषयक प्रकल्प करायला गेले, तेव्हा माझ्या लक्षात आले की ही मुले लिहितात, कविता करतात. ती निसर्गात फिरतात, निरीक्षणे करतात, शोध घेतात आणि आपले अनुभव व निरीक्षणे आपल्या लेखनातून वाचकांच्या डोळ्यांसमोर उभी करतात.

तसे शाळा-कॉलेजातल्या मुलांचे लेखन मी शाळेच्या, कॉलेजच्या मासिकांमधून वाचले होते. शाळेत असताना मी स्वतःही आमच्या शाळेच्या मासिकात लिहीत असे. पण कमला निंबकर बालभवनमधील मुलांचे लिखाण काही वेगळे होते. अगदी खरेखुरे होते. हाडामांसाचे होते. सर्वसाधारणतः निबंधांत आढळणारी कृत्रिमता त्यात नव्हती. लेखनाचे विषयही खूप वेगवेगळे असत. काही साचेबद्ध लेखनही त्यात असे पण फार थोडे.

१९९४पासून मी शाळेत पूर्णवेळ काम सुरू केले. १९९६मध्ये मुलांचे लेखन साऱ्यांसमोर यावे म्हणून आम्ही एक वार्षिक पत्रिका काढण्याचे ठरवले. हेच आमचे 'नवनीत'. दरवर्षी पत्रिका काढणे काही आर्थिक व तांत्रिक अडचणींमुळे जमेना. तरीही १९९९मध्ये दुसरी पत्रिका काढली. त्यानंतर तब्बल ५ वर्षांनी, २००४मध्ये तिसरी पत्रिका काढली. आणि २००४ नंतर मात्र आजतागायत सलग ५ वर्षे 'नवनीत'चा अंक काढला आहे. पुढेही ही परंपरा सुरू राहील अशी खात्री आहे.

नवनीतची प्रस्तावना किंवा शाळेच्या एखाद्या उपक्रमाची शिक्षकांनी लिहिलेली माहिती वगळता नवनीतमधील सर्व लेखन विद्यार्थ्यांचेच असते. दरवर्षी भाषा-शिक्षक वर्गात केलेल्या लिखाणातील उत्तमोत्तम लिखाण नवनीतसाठी राखून ठेवतात. पण याशिवाय विद्यार्थ्यांशी चर्चा करून, वेगवेगळ्या विषयांवर बोलून, त्यांच्याकडून नवनीतसाठी वेगळे लिहून घेतले

जाते. लिहिण्याची प्रक्रिया हीदेखील बरीच दीर्घ असते. दोन-तीन नकलांनंतरच लेख गोळीबंद बनतो.

२००६पर्यंत मी मुलांच्या लेखनाकडे कधी विश्लेषणात्मक नजरेने पाहिलेच नव्हते. पण टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मध्ये (TISS) प्राथमिक शिक्षणाच्या एम.ए.च्या पदवीसाठी अभ्यास करताना मला मुलांच्या सृजनशीलतेकडे पाहण्याची एक नवी दृष्टी मिळाली. सिबिल मार्शल सारख्या शिक्षिकेने आपण शाळेत केलेल्या प्रयोगांबद्दल लिहिलेली पुस्तके वाचता आली आणि जाणवले की, अरे! आपल्याकडे केवढेतरी साहित्य आहे आणि भारतात मुलांच्या सृजनशीलतेकडे अशा प्रकारे कुणी पाहिलेच नाहीये. आपल्याकडे केवढी माणिक-मोत्ये आहेत. पण इतके दिवस आपल्याला त्याचे मोलच कळले नव्हते. मग मी पुन्हा एकदा १९९६पासूनचे नवनीतचे अंक नजरेखालून घालायला सुरुवात केली. त्यात एक गोष्ट मला प्रकर्षाने आढळली. ती म्हणजे मुलांची निसर्गाशी असणारी जवळीक. हाताशी असणाऱ्या सातही अंकांमधून निसर्गविषयक साहित्य एकत्र करून त्याला एक प्रस्तावना लिहून 'निसर्ग आणि आपण' ही पुस्तिका मी तयार केली.

'निसर्ग आणि आपण'चे संपादन करत असताना मुलांचे सारेच अनुभवविश्व मला खुणावू लागले. तेव्हाच या पुस्तकाचा श्रीगणेशा झाला. मुलांचे उत्तमोत्तम लिखाण एकत्रित करून त्यास 'निसर्ग आणि आपण' सारखी प्रस्तावना लिहून एक पुस्तिका तयार करण्याचे सर्वप्रथम ठरले होते. मात्र मी जसजसा अभ्यास करत गेले, शिक्षकांशी बोलले, चांगले लिहिणाऱ्या माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला, तसतशी प्रस्तावना विस्तारू लागली आणि शेवटी आपली मते अधिक तपशीलवार मांडण्याचे मी ठरवले; तरी मुलांच्या कवितांना मी अजून हातही लावला नाही.

जाई निंबकर, वसीम मणेर, प्रकाश अनभुले, दत्ता अहिवळे व स्वामिनी रुद्रभटे या सर्वांनी ही पुस्तिका लिहिताना माझ्या विचारांना स्पष्टता देण्याचे काम केले. त्यांची मी ऋणी आहे.

प्रकाशशी बोलताना मला एक गमतीदार साक्षात्कार झाला. प्रकाश हा एकेकाळचा आमच्या शाळेचा कवी. आज तो संगणक क्षेत्रात काम करतो. एकदा पायाभूत संकल्पना समजल्यावर तो स्वतःहून शिकत गेला आणि आज त्यातला तज्ज्ञ झाला आहे. मी त्याला विचारले, ''प्रकाश, हल्ली तू कविता का करत नाहीस?'' त्यावर तो म्हणाला, ''पूर्वी मी कुठेही असलो, काहीही करत असलो, तरी डोक्यात कवितेचेच विषय असत. मी ओळींचा, चपखल बसणाऱ्या शब्दांचाच विचार करत असे. आज माझ्या डोक्यात संगणकाचेच विचार असतात, अमुक करण्यासाठी काय काय करावे लागेल, तमुक हे अशा प्रकारे करता येईल का, हे माझ्या डोक्यात कायम घोळत असते.'' थोडक्यात प्रकाशची सृजनशीलता लेखनावरून संगणकावर संक्रमित झाली आहे.

मुलांना शाळेत आम्ही अवांतर वाचायला सांगत असतो, तेव्हा पालक हटकून म्हणतात, ''तो काय पुढे लेखक, कवी होणार आहे का? कशाला या फालतू गोष्टींवर वेळ घालवता? प्रश्नोत्तरे घ्या तेवढी.'' अशा वेळी त्यांना आता सांगेन, ''अहो, सृजनशीलता काय फक्त लेखनातूनच प्रकट होऊ शकते? तुमची मुलं सृजनशील डॉक्टर, इंजिनिअर, शासकीय अधिकारी, काहीही होऊ शकतील.''

सृजनशीलता असणे ही कोणत्याही व्यक्तीची नैसर्गिक गरज आहे. ती सृजनशीलता विविध गोष्टींमधून प्रकट होऊ शकते, अगदी व्यक्तीच्या वागण्या-बोलण्यातूनही. व्यक्ती-व्यक्तींमधील संबंध ती सुंदर बनवते. सार्वजनिक जीवनातही ती दिसते. तिला कुठेच पायबंद घालू नये. शाळेत तर बिलकूल नाही, कारण सृजनशीलतेचा पाया तर तिथेच आहे.

डॉ. मंजिरी निमकर

•

# मुलांचे सृजनात्मक लिखाण

मुलांच्या सृजनात्मक लिखाणाकडे शालेय शिक्षणात सर्वसाधारणतः दुर्लक्षच केले जाते. जे काही प्रश्नोत्तरांव्यतिरिक्त लिखाण मुले करतात ते असते निबंध, कल्पना विस्तार किंवा मुद्यांवरून गोष्ट. या सर्वांमध्ये ठरावीक अशी गुणांच्या वाटणीमध्ये बसवलेली मांडणी असते. अधिक गुणांसाठी त्याची सुरुवात अशी हवी, शेवट असा हवा. त्यात लोकांनी केलेल्या कवितांच्या ओळी, श्लोक, थोरांची सुवचने व सुविचारांची पखरण असेल तर अधिक गुण मिळतात. थोडक्यात ते लिखाण मुलांचे स्वतःचे असे नसतेच. अशा प्रकारे लिहिले तर मला अधिक गुण मिळतील ही लिहिण्यामागची प्रेरणा असल्याचे आढळते. 'मला असे असे वाटते' किंवा 'याच्याबद्दल लिहावेसे वाटते' ही प्रेरणा बहुतेक शालेय लिखाणात आढळत नाही. मुलांचे लिखाण अभिव्यक्तीच्या मूळ ऊर्मीकडे नेणारे नसते. माणूस म्हणून प्रत्येकाला बोलण्याची, लिहिण्याची, चित्र काढण्याची ऊर्मी असते; आपले अनुभव, आपले विचार, आपल्या भावना मांडण्याची इच्छा असते. परंतु, भाषेच्या पेपरमधील एक १०-१२ मार्कांचा प्रश्न, एवढाच त्याचा विचार केला गेल्याने शालेय जीवनात मुलांकडून फारसे सृजनात्मक लेखन होत नाही.

कित्येकदा वर्गात निबंध फळ्यावर लिहून दिला जातो. अगदी 'माझी आई' या सारखा निबंधदेखील! शिक्षकांची भूमिका अत्यंत स्पष्ट असते. वर्गात ६०-७० विद्यार्थी असतात. त्यातील प्रत्येकाचा निबंध तपासणे अशक्य असते. त्यापेक्षा एकचं निबंध लिहून दिला व मुलांनी वहीत उतरवून काढला तर त्या महिन्याचे 'टारगेट' पूर्ण होते. सही करून हस्ताक्षर पाहून १० पैकी आलटून पालटून ६ किंवा ७ गुण देऊन टाकले की तपासल्याचेही पुण्य मिळते. शाळा तपासनीसही फक्त शासकीय नियमांनुसार वर्षभरात १० निबंध

झाले आहेत का ते बघून शेरा मारून टाकतात. निबंध-लेखनासाठी विषय ठरावीक वर्गीकरणात बसवलेले असतात. उदा., वर्णनात्मक निबंध, काल्पनिक निबंध, आत्मचरित्र इत्यादी. त्याची मांडणी कशी असावी व त्यांत कोणते शब्द अथवा वाक्ये वापरली जावीत ही माहिती शिक्षकांकडून पुरवली जाते. विद्यार्थ्यांच्या लिखाणाचे मूल्यमापनही बरेच साचेबद्ध असते. अलंकारिक, शब्दबंबाळ, प्रमाण-भाषेतील, तत्त्वज्ञान किंवा तात्पर्य सांगणारे लिखाण सर्वसाधारणतः अधिक वाखाणले जाते. साध्या भाषेतले, रोजच्या आयुष्यातले अनुभवकथन करणारे लिखाण कमी गुण मिळवते. खरे म्हणजे मुलाच्या लिखाणाच्या बाबतीत सध्याचे निकष बाजूला ठेवले पाहिजेत आणि प्रत्येक शिक्षकाला आपापल्या परिस्थितीनुसार ते ठरवण्याची मोकळीक दिली पाहिजे. शिक्षकांना स्वतःला सृजनशील बनायला आणि सृजनशीलता जाणायला वाव दिला पाहिजे.

### अनुभव व लेखन

सृजनशील लेखनाचे बीज अनुभवांमधून रुजते. मुले जेव्हा स्वानुभव कथन करतात, तेव्हा ते लिखाण सुंदरच असते, कारण ते पारदर्शक आणि प्रांजळ असते. घडलेली घटना किंवा आलेला अनुभव मुले उतरवण्याचा प्रयत्न करतात. अगदी लहान मुलांच्या लिखाणाला पुष्कळदा लोककथेचा बाज असतो. इयत्ता पहिलीतली सायली लिहिते –

*पाऊस रात्री मोठा आला होता. पाऊस आला. माझ्या मनात आले पाऊस जास्त मोठा येणार नाही. पण पाऊस जास्त मोठा आला. आमच्या गेटमध्ये जास्त चिखल झाला. सकाळी शाळेत येताना वड्याला जास्त पाणी होते. तुम्हाला सांगू काय, रोडवरून पाणी चालले होते. पण पाणी कमी झाल्यावर आम्ही शाळेत आलो. शाळेतील मैदान पाण्यानी भरले होते. चिखल झाला होता. वर्गात गेलो. वर्गातही पाणी. पाऊस झाला तो चांगला झाला.*

पाऊस हा एक पुरा भारावून टाकणारा अनुभव असतो. बहुसंख्य मुले पावसाबद्दल भरभरून लिहितात. कित्येकदा त्यांना काळाचे किंवा प्रमाणाचे भान नसते, म्हणजे पाऊस नक्की किती वेळ पडला किंवा किती पडला किंवा पाऊस पडणे व गवत उगवणे यात किती काळ गेला इत्यादी. पहिलीतली ज्योती लिहिते –

*पाऊस धो धो पडत होता. माझ्या घराच्या जवळ पाणी साचले होते. मला असे वाटले की नदी वहात आहे. मी व माझा भाऊ पावसात छान भिजत होतो. लाइट गेली आणि मी घाबरून गेले. लाइट येयच्या आधी झोपले. आमच्या घराच्या जवळ छोटे छोटे गवत उगवून आले.*

अनुभव सर्वांनाच येतात. तरीही 'आपला एखादा अनुभव लिहा', असे सांगितल्यावर सर्वच जण लिहू शकतील असे नाही. याचे कारण त्यांना लिहिता येत नाही हे नसून त्यांना 'लिहिण्यासारखा' अनुभव आठवत नसतो, हे आहे. काही जण तर सरळ सांगून मोकळे होतात की 'लिहिण्यासारखे' काही आमच्या आयुष्यात झालेच नाहीये. याउलट काहींना अगदी 'चुना' (नवनीत २००८) सारखा लहानसा अनुभव रंगवता येतो. एका लहानग्याला असणाऱ्या चुन्याच्या मऊ स्पर्शाच्या आकर्षणातून निर्माण झालेले नाट्य सहावीतल्या प्रीतमने रंगवले आहे –

*बाबांना चुना हवा होता तेव्हा चुना कोठे ठेवला आहे हे ते विसरले. सगळे घर चुना शोधत होते. मला अचानक टेबलावर चुना दिसला मी त्याला हात लावला. हाताला मऊ लागला. मला पुन्हा एकदा हात लाऊ वाटला. मी ती पुडी दाबली तेव्हा ती फुटली. मला काय करू काय नको ते सुचेना. इतक्यात मला एक कल्पना सुचली. मी खाटेखाली जाऊन लपलो. बाबांनी मला चुना शोधायला हाक मारली. मी काही ओ दिली नाही. चुना तर सापडला पण मी गायब झालो होतो.*

या लेखाचे शेवटचे वाक्य आहे, 'बाबा जेथे होते तेथून घरी आले व त्यांनी मला मिठी मारली.' हे वाक्य मनाला स्पर्शून जाते. मुलांच्या भावनिक जगातील आई-वडिलांचे स्थान अधोरेखित करते. अनुभवातील नाट्य जाणण्यासाठी मनाची एक वेगळीच संवेदनशीलता असावी लागते आणि ते एवढेसे नाट्य सर्वांना खिळवून ठेवील असे मांडण्यामध्ये फार मोठी सृजनशीलता असावी लागते.

'विक्सची गोळी' (नवनीत २००४) मध्ये इयत्ता पाचवीतील ओंकारने एखाद्या आणीबाणीत मोठे कसे वागतात याचे धमाल वर्णन केले आहे. दोन वर्षांच्या मुलाच्या घशात विक्सची गोळी अडकल्यानंतर मोठ्यांची होणारी धावपळ, त्यांचे लहानग्याकडे लक्ष देण्यापेक्षा डॉक्टरांशी वाद घालत बसणे आणि त्यातून आणखी एक प्रसंग उभा राहणे, हाही प्रसंग अगदी छोटा जीव असणारा. पण तो उत्कंठावर्धक रीतीने रंगवणे, त्यातली गंमत दाखवून देणे यातच लेखकाचे खरे कौशल्य दिसून येते. सृजनशील लेखन म्हणजे आणखी काय?

*ती भली मोठी विक्सची गोळी माझ्या घशात अडकली नि मी घाबरलो. अॅ-अॅ करत ओरडत रडू लागलो. ताई पण घाबरली. कालवा करून तिनं साऱ्यांना गोळा केलं. माझा दादा पळतच आला. त्यानं मला २-३ बुक्क्या मानेत मारल्या पण मला जास्तच वेदना होऊ लागल्या. शेवटी तसेच डॉक्टरांकडे पळवले. डॉक्टरांकडे दुसरा पेशंट होताच पण दादा थेट डॉक्टरांकडे जाऊन म्हणाला गडबडीची केस आहे लवकर घ्या. लहान मूल आहे. पण डॉक्टर ऐकेनात. त्यांनी नंबरवर बसविण्यास सांगितलं. दादा चिडला. जवळ जवळ डॉक्टरांच्या अंगावर धावूनच गेला. तोपर्यंत मध्येच माझ्या घशात अडकलेली विक्सची गोळी कधी पोटात गेली कळलेच नाही. मी ओरडून सांगू लागलो, "मी ठीक आहे. गोळी पोटात गेली. गोळी पोटात गेली." पण कोणीच लक्ष देईना. सगळे भांडणात गुंतून गेले. मी हळूच काढता पाय घेतला. दवाखान्यातून बाहेर पडलो आणि पुन्हा मला शोधायला सर्वांची पळापळ सुरू झाली.*

अनुभवकथन करताना पुष्कळदा घटना घडतेवेळी मुलांना वाटलेल्या आनंद, भीती, यांसारख्या भावनांमुळे व त्यावेळच्या मुलांच्या उत्तेजित अवस्थेमुळे त्या घटनेला एक वेगळेच रूप प्राप्त होते. पाचवीतील प्रीतमच्या 'एक प्रसंग' (नवनीत २००७) मध्ये याचे चपखल उदाहरण सापडते. प्रीतमने अंधाऱ्या रात्री त्यांच्या दुकानात कंदील घेऊन आलेल्या माणसाबद्दल लिहिले आहे. वास्तविक दिवे गेलेले असताना मेणबत्ती घ्यायला येणे यात विचित्र असे काहीच नाहीये; पण प्रीतमच्या साऱ्या अनुभवाला त्याच दिवशी संध्याकाळी त्याने टी.व्ही.वर पाहिलेल्या 'हॉरर शो' चा रंग चढला आहे. हॉरर शो मधील चेटकिणीचे वर्णन तो असे करतो –

*मी एकटाच घरात असताना भुताचा कार्यक्रम बघत बसलो. त्यात थोडे पडलेले व थोडे टोकदार दात असलेली, पांढरे केसवाली व कपाळावर मोठे कुंकू लावलेली, पांढरी साडी नेसलेली, गळ्यात माळा घातलेली, हातात बांगड्या घातलेली अशी एक विचित्र चेटकीण होती.*

त्यानंतर रात्री वीज गेल्यावर तो दुकानात एकटाच बसलेला असताना आलेला अनुभव रंगवताना म्हणतो –

*विचार करता करता माझी नजर रस्त्यावर गेली. तिथून एक कंदील हलत हलत माझ्या दिशेने येत होता. मी माझा कंदील घट्ट पकडला. मला वाटले तो माझा कंदील नाही. मग तो कंदील कोणाचा? तो दुसऱ्याचा कंदील होता. हळू हळू तो माझ्याकडे येत होता. तो जरा जरा जवळ आल्यावर मला कळले की कंदील घेऊन एक माणूस येत होता. तो माझ्या दुकानात आला. तो विचित्र दिसत होता. केस वाढलेले. दाढी वाढलेली. कपाळावर गंध. कानात रिंग घातलेली व हातात कडे. असा तो माणूस होता. त्याने माझा हात दाबला. तेव्हा माझे पाय भीतीने लटलटा कापू लागले. त्याने माझ्या हातात काही पैसे दिले आणि म्हणाला मेणबत्ती दे.*

प्रीतमच्या डोक्यातल्या चेटकिणीच्या प्रतिमेमुळे त्याने मेणबत्ती घ्यायला आलेल्या गिऱ्हाइकाभोवती एक गूढ वलय निर्माण केले आणि एक साधासा प्रसंग त्याच्या उत्तेजित अवस्थेमुळे एक थरारक प्रसंग झाला.

हळू हळू स्वतःच्या आयुष्यातील अनुभवकथनाच्या चौकटीतून १४-१५ वर्षांची मुले बाहेर पडू लागतात. माहीत असलेल्या एखाद्या वास्तू, व्यक्ती, स्थळ किंवा घटनेभोवती एखादी संपूर्ण काल्पनिक अशी गोष्ट रचू लागतात. गोष्टीची पार्श्वभूमी म्हणजेच पाया स्वानुभवावर आधारित असल्यामुळे ती गोष्ट अस्सल वाटते. जिवंत वाटते. सूरजची 'ती भयाण रात्र'

(नवनीत २००६) ही अशा प्रकारची एक कथा आहे. यात तो विंचुर्णीच्या शेताचे एक चित्र तपशीलवार वर्णनातून आपल्यासमोर उभे करतो –

*आमचे शेत विंचुर्णीच्या तलावाजवळ होते. तेथे एका साधूचे घर होते आणि एक मोडकळीला आलेले 'छप्पर' होते. घरापासून जवळच तलाव होता. तलावाच्या मध्यभागी एखाद्या बेटाप्रमाणे दिसणारी थोडीशी जमीन होती. आणि तेथे एकही पान नसलेले भुताच्या घराप्रमाणे वाटणारे एक झाड होते. तेथील लोक आमच्या घराजवळ भुतांचा वावर आहे अशा कथा सांगत. गावापासून घर थोडेसे लांब असल्याने व भुतांच्या भीतीने सहसा तिथे कोणी येत नव्हते. आमच्या रानात ऊस लावला होता. व तलावाच्या पलीकडच्या गर्द झाडीत कोल्ह्यांचे टोळके होते. ती कोल्ही रात्रीची जोरात कोल्हेकुई करत आणि आमच्या शेतात येऊन नासधूस करत.*

मग त्यातल्या 'मी'सारखे आपणही पुढे-पुढेच जात राहतो. अगदी त्यातील अतिरंजित भागही खरा वाटावा अशा रीतीने मांडण्याची ताकद इयत्ता नववीतल्या मुलाच्या लेखनात येऊ शकते.

काही अनुभव नाट्यपूर्ण असतात तर काही धीमे, हळुवार (low-key) असतात. विशेषतः निसर्गातील अनुभव या सदरात मोडतात. निसर्गात फिरताना वन्य प्राणी दिसला नाही तरी त्याच्या नख्यांच्या खुणा, विष्ठा, यांतून त्याचे अस्तित्व जाणवते. पक्ष्यांनी घरटी बांधणे, पिल्लांना भरवणे, विंचवासारखा विषारी प्राणी घरट्याजवळ आढळल्यास त्याला नष्ट करणे, सोसाट्याच्या वाऱ्यापासून पिल्लांचे रक्षण करणे अशा अनेक घटना मुलांनी नाट्यमय रीतीने रंगवल्या आहेत. वसीमने आपले माळावरच्या चंडोल पक्ष्याच्या घरट्याचे निरीक्षण लिहिताना म्हटले आहे –

*मी तेथे बसलो. अचानक एक चंडोल तोंडात किडा घेऊन शेजारच्या दगडावर बसला. मला काही काम नसल्यामुळे मी शांतपणे त्याचे निरीक्षण करत बसलो. त्याने इकडे तिकडे शत्रूची चाहूल घेतली आणि तो गवतात शिरला. तेथे त्याची दोन पिले सुखावली होती. तो जवळ जाताच पिले अधाशासारखी तोंड उघडून घास घेण्याचा प्रयत्न करू लागली. तेव्हा मला पुस्तकातले वाक्य आठवले. पुस्तकात लिहिले होते की आई-बाप आल्यावर पिले गोंधळ करतात. पण येथे पिले कसलाच आवाज करत नव्हती. ही गोष्ट मला विलक्षण वाटली. नर पिलांना घास देऊन दूर उडाला. आपल्या आगळ्यावेगळ्या शैलीने आणि मनाला हुरहुर लावणारी शीळ घालीत निघून गेला.*



काही अनुभव हे सामुदायिकरीत्या घेतलेले असतात. तरीही मूल प्रत्येक अनुभव स्वतःचा बनवते. इयत्ता तिसरीच्या सर्व विद्यार्थ्यांनी बेंदराच्या निमित्ताने शाडू मातीचे बैल बनवले. अनुभव एकच, परंतु प्रत्येकाला वेगवेगळा भावला. त्याने तो स्वतःचा बनवला, त्याला तसे करण्यासाठी अवकाश दिला गेला. कधी कधी मुलांना त्याविषयी एकमेकांशी, शिक्षकांशी बोलायचे असते. अनुभव पचवून पूर्वानुभवाशी तुलना करून पाहायचे असते आणि मगच त्याविषयी काही लिहायला मुले तयार होतात. ज्या दिवशी अनुभव दिला जातो त्याच दिवशी लिहायला सांगितले तर वरवर तरंगणारे विचार किंवा निरीक्षणे फक्त कागदावर उतरतात. दुसऱ्या दिवशी किंवा नंतर कधीतरी अनुभवाचे चांगले पचन केल्यावर मुले अधिक सृजनशील लिहितात. त्यात त्यांचे प्रतिबिंब दिसते. तो अनुभव फक्त 'मग आम्ही अमुक केले' एवढ्यावर सीमित न राहता मूल त्यातील बारकावे टिपते. म्हणूनच वर्गातल्या ३५-४० विद्यार्थ्यांनी जरी एकच अनुभव घेतला तरी प्रत्येक जण वेगवेगळे लिहितो. 'मी बैल असा बनवला' याविषयी चार मुलांचे चार परिच्छेद नवनीत २००८ च्या अंकात दिसतात. त्यातील प्रत्येकाचे आपले असे वैशिष्ट्य आहे.

शुभम लिहितो –

*'शिंगे सारखी पडायची आणि बैलाचं तोंड वेगळं आलं.'*

गौरी लिहिते –

*'बैल चार पायांवर राहिला नंतर पडला. पण तो बैल दिसायला गाढवासारखा आला.'*

समीक्षा लिहिते –

*'मी मळून बैल बनवला. मी पाच बोटे जुळवली आणि शिंग, पाय बनवले. मी मूठ झाकून त्याचे पोट बनवले.'*

मयूर लिहितो –

*'काठीचे नाक बसवले. बियांचे डोळे बसवले. मग माझा बैल थोडासा बरोबर आला.'*

सृजनशील लेखनाची यावरची पायरी म्हणजे घटनेच्या भावनिक प्रतिक्रियांच्या पलीकडे जाऊन आपल्या अनुभवांकडे एखाद्या तिऱ्हाइताच्या नजरेतून बघता येणे व वाचणाऱ्याला ते अनुभव रसपूर्ण वाटतील अशा रीतीने मांडणे. 'आणि परीक्षा दिली' (नवनीत २००८) मध्ये पाचवीतील प्रथमेशने आपल्या आजारपणाची गोष्ट अशीच मांडली आहे. दवाखान्यात ॲडमिट होण्याचा त्याचा आयुष्यातील तो पहिलाच अनुभव. पण त्या वेळी वाटलेल्या आपल्या भीतीवर मात करून त्याने त्यातली विनोदी बाजू वाचकांसमोर मांडली. यातच लेखक म्हणून त्याचे मोठे कौशल्य आढळते.

*संध्याकाळी रुग्णालयात गेलो. स्टेथस्कोप छातीला टेकला. ऱ्हदयाची स्पंदने वाढली. थोड्याच वेळात रक्तदाबाच्या यंत्राचा पट्टा हाताभोवती आवळला गेला. गोळ्या दिल्या गेल्या. संपूर्ण रात्र तळमळत काढली. सकाळी उठून पेपरला गेलो. दुपारी रक्त-तपासणीचा अहवाल आला आणि डॉक्टर वाचेपर्यंत श्वास रोखले गेले. रुग्णालयात दाखल करा हे शब्द आम्हाला बंदुकीच्या गोळीप्रमाणे वाटले. पायाखालची जमीन सरकली. मी सर्व भान विसरून भावनांना वाट मोकळी करून दिली.*

तोच प्रकार प्रथमेशच्याच 'जम्मू प्रवास' (नवनीत २००७) मध्ये आढळतो. विविध नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींना तोंड देत केलेल्या प्रवासाचे अत्यंत रोखठोक वर्णन त्याने केले आहे.

*मग सकाळी दर्शन घेऊन खाली येताना अर्धकुवारी नावाच्या गुहेत दर्शनास गेलो. तिथे गुडघ्यावरून रांगत जाऊन दर्शन घेऊन खालून वर साखळी धरून यावे लागते. मी रांगत गेलो पण वर येता येईना.*



*बराच वेळ प्रयत्न केला. रांग पुढे सरकेना. रांग पुढे का येत नाही हे पाहण्यासाठी पोलीस आले. त्यांनी मला ओढून बाहेर काढले.*

प्रथमेश अपंग आहे हे माहीत असलेल्यांना तर ते अधिकच भावते. लेखाच्या शेवटी, 'सतत होणारे बॉंबस्फोट, दंगल यामुळे तेथील लोक व पोलीस चिडचिड्या स्वभावाचे बनले होते,' हे प्रथमेशचे निरीक्षण फार काही सांगून जाते. एखाद्या पात्राच्या जागी स्वतःला लेखून त्याच्या मानसिकतेचे विश्लेषण करणे ही सृजनशीलतेचीच एक पायरी आहे, कारण त्यामुळे एखादी व्यक्तिरेखा रंगवताना ती व्यक्ती विविध प्रसंगांमध्ये कशी कशी वागेल याबद्दल लेखक अचूक अनुमान बांधू शकतो.

आत्तापर्यंत आपण पाहिलेले लिखाण हे एकेका 'विशिष्ट' अनुभवाचे होते. या लिखाणाची 'आपली' अशी एक शैली असते. आपल्याला आठवणारा प्रसंग हा त्या लेखनाचा परमोच्च बिंदू असतो आणि बाकीचे लिखाण टप्प्या-टप्प्याने त्या प्रसंगाच्या दिशेने होणारी वाटचाल असते. 'आमचा भैय्या' (नवनीत २००८) मधील सुजितने रंगवलेला, आपला भाऊ लहान असताना गर्दी-गडबडीत चहाच्या टपरीवर राहिल्याचा प्रसंग, हा याचे उत्तम उदाहरण आहे. परंतु जेव्हा मुले अधिक मोठ्या कालखंडाकडे पाहत असतात तेव्हा त्यासाठी एक वेगळी शैली वापरावी लागते. अशा लेखनात एकच नाट्यपूर्ण, परमोच्च बिंदू असत नाही. तरीही वाचणाऱ्याला कंटाळा येणार नाही अशा रीतीने लिहावे लागते. बरेचदा हा विस्तृत कालखंड मुलांच्या स्वतःच्या अनुभवातला, स्वतःच्या आयुष्यातलाच असतो. घडलेल्या घटना ती अत्यंत पारदर्शकपणे लिहितात. घडलेल्या घटनांना चांगले-वाईट किंवा चूक-बरोबरच्या मूल्याधिष्ठित मोजमापाने न मोजता किंवा भावनांच्या कल्लोळात न बुडवता एखाद्या कथाकाराच्या अलिप्तपणे कागदावर उतरवणे याला 'श्रेष्ठ' लिखाणच म्हणायला हवे.

'शाळा' (नवनीत १९९९) या आठवीतील प्रशांतच्या लेखात शाळा भरण्यापासून सुटण्यापर्यंतचा सहा तासांचा कालावधी एका विद्यार्थ्याच्या नजरेतून दिसतो. हा लेख म्हणजे शाळेचे दिवसाचे वेळापत्रक नसून एका दिवसाचा मनोरंजक आलेख आहे. गंमत म्हणजे अभ्यासाच्या एकाही

तासाविषयी एकही सविस्तर ओळ या लेखात नाही. मुलांची गप्पाष्टके, मोठ्या मुलामुलींचे अड्डे, धाकट्यांचे खेळ, शाळेच्या वेळेआधी येणाऱ्या मुलांचे उद्योग या साऱ्यांतून प्रशांत शेवटच्या विशेष कार्यक्रमापर्यंत जातो. शाळा अमुक अशी आहे किंवा आमच्या शाळेत तमुक असते असे शाळेविषयी काहीही विशेष न लिहिता शाळेतले मोकळे वातावरण व शाळेची वैशिष्ट्ये वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम प्रशांत खुबीने करतो.

'स्वतःचा इतिहास'मध्ये (नवनीत १९९९) आठवीत शिकणारा धीरज अगदी निर्व्याजपणे लिहितो –

*माझी आई कमला निंबकर बालभवन या शाळेत शिपाई म्हणून कामाला लागली. तेव्हा मी दोन वर्षांचा होतो. सगळेजण माझ्या आईला आशाबाई म्हणायचे म्हणून मी पण आईला 'आशा' या नावाने हाका मारायचो. आईने एकदा खूप मारले तेव्हापासून मी तिला आई म्हणू लागलो.*

पुढे एका ठिकाणी तो म्हणतो –

*माझे पुढचे दोन दात पुढे आहेत. मुले कधी कधी मला तात्याविंचू, फड्या अशा नावाने चिडवतात. मी त्यांना काहीही बोलत नाही. मोठे दात हीदेखील निसर्गाचीच देणगी आहे.*

कसलाच आडपडदा न ठेवता प्रांजळपणे लिहिलेला हा लेख म्हणजे अशा प्रकारच्या स्वतःच्या बाहेर येऊन स्वतःकडे पाहण्याच्या लेखनशैलीचे आणखी एक उत्तम उदाहरण आहे. प्रकाशचे 'माझ्या शाळेची कहानी' (नवनीत १९९६), प्रियांकाचा 'माझं आवडतं गाव' (नवनीत २००४), विराजचा 'माझे गाव' (नवनीत २००५) आणि सृष्टीचा 'माझे पोहणे' (नवनीत २००७) हे सारे लेख याच पठडीत बसणारे. प्रियांकाच्या 'माझं आवडतं गाव' या लेखात मात्र इतर लेखांमध्ये असलेला वस्तुनिष्ठपणा कमी आढळतो. खेड्यात राहण्याबद्दल, 'वाड्यात राहण्याचं सुख काही वेगळंच. काय त्या फ्लॅटमध्ये रहायचं?' किंवा आजीबद्दल बोलताना, 'एवढं होत नाही म्हणा तिच्याच्यानं, साठीला आली हो आता.' यासारखी कृत्रिम वाक्ये तिच्या लिखाणावरील मोठ्यांचा प्रभाव दाखवतात.



स्वतःच्या घराच्या परिसरात मुलांना अनेक अनुभव येतच असतात. तरीही दर काही दिवसांनी शाळेतून होणाऱ्या परिसर भेटी मुलांना अनुभव-समृद्ध करायला महत्त्वाच्या ठरतात. परिसर भेटी हा कधीतरी वर्षातून एक-दोनदा होणारा कार्यक्रम न होता तो दर दहा दिवसांतून एकदा तरी व्हायला हवा. भेट पूर्ण दिवसाची, भरगच्च असली पाहिजे असे बिलकूलच नाही. गणेशोत्सवापूर्वीचे कुंभार टेक, गाई-म्हशींचा गोठा, भाजी मार्केट, पोलीस स्टेशन या मोठ्या मोठ्या भेटींबरोबरच बाया पक्षिणींची बाभळीवरील कॉलनी, फुललेला गुलमोहर, एखाद्या पालकांच्या कुत्रीला झालेली पिले यासारख्या लहान लहान भेटीही मुलांसाठी महत्त्वाच्या ठरतात. भेट देऊन परत आल्यावर मुले दमलेली, पेंगुळलेली असतात किंवा उल्हसित झालेली असतात. अशा अवस्थेत त्यांना बसून लिहायला सांगितले किंवा भेटीच्या ठिकाणीच लिहायला, नोंदी घ्यायला सांगितले तर आपण काय काय पाहिले याची जंत्री येण्याचीच शक्यता जास्त असते. म्हणून त्यांना शाळेत पोहोचल्यावर एकमेकांत गप्पा मारण्यास अवसर द्यावा. आपणही त्यांच्यात सामील व्हावे. एखाद्याने विशेष काही पाहिले असेल तर ते सर्वांपर्यंत पोहोचवावे. कुणाला झोपायचे असेल तर झोपू द्यावे. मुले जरा स्थिरस्थावर झाल्यावर त्यांच्या इच्छेनुसार चित्रे काढायला कागद द्यावा किंवा सरळ दुसऱ्या काही शालेय विषयाकडेही वळायला हरकत नाही. पहिलीच्या वर्गात मुले पुष्कळदा चित्रांमधून अभिव्यक्ती साधतात. कधी कधी भेटीत सहभागी झालेल्या शिक्षकांनाही आपल्या कल्पनाशक्तीला जरा ताण द्यावा लागावा अशा काही गोष्टी मुले चित्रांमधून दाखवतात.

मुलांना जेव्हा लिहिता-वाचताही येत नसते तेव्हा चित्रांबद्दल ती जे काही बोलतात ते तंतोतंत त्यांच्या शब्दांत शिक्षकांनी लिहून काढावे, चित्राखाली चिकटवावे व वर्गात सर्वांना चित्र दाखवून वाचून दाखवावे. लेखनावर बऱ्यापैकी प्रभुत्व मिळाल्यावरही काही मुलांना आपल्या लेखनाला चित्राची जोड द्यायची इच्छा असते.

## काल्पनिक कथा

१२ ते १४ वयोगटातील मुले संपूर्णतः काल्पनिक अशा गोष्टी लिहिताना आढळतात. या गोष्टी हितोपदेशाच्या गोष्टींसारख्या असतात. यांचा आकृतिबंध अगदी साधा, सोपा, सरळसोट असून गोष्टी एका सरळ घटनाक्रमाने मांडल्या जातात. यातील व्यक्तिरेखा साधारणतः पापभीरू, साऱ्यांचे भले करणाऱ्या असतात. गोष्टींचा शेवट नेहमी गोडच होतो. सत्याचा, भल्याचा नेहमी विजयच होतो. 'क्षण एक' (नवनीत २००५) मध्ये नम्रता कोकणातील एका खेड्यातील कोळी कुटुंबात जन्मलेल्या मुलीची कथा सांगते. बन्या आणि अनसा ही भावंडे. अनसा हुशार आणि कष्टाळू असते; पण 'मुलगी' म्हणून तिच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते. तरीही शिक्षकांच्या आणि सरपंचांच्या मदतीने ती शिक्षण चालू ठेवते. तिचा भाऊ मात्र उनाडक्या करत राहतो. शेवटी एक क्षण असा उजाडतो की अनसा एम.पी.एस.सी.च्या परीक्षेत पहिली आल्याची खबर मिळते आणि त्याच क्षणी तिच्या भावाला खुनाच्या आरोपाखाली अटक करण्यासाठी पोलीस घरी येतात. 'देव पावला' व 'शाळेची वर्गणी' या नवनीत २००५मधील आणखी काही गोष्टी, 'नाम्याची गोष्ट' ही नवनीत २००६मधील कथा व 'लेकरू' ही नवनीत २००७मधील कथा याच प्रकारात मोडतात.

मुलांच्या एकूण जडणघडणीत, जीवन-मूल्ये ठरवण्याच्या पौगंडावस्थेच्या अतिशय महत्त्वाच्या अवस्थेत मुलांचा जगातल्या भल्यावरचा हा विश्वास आश्वासक वाटतो.

## शिक्षक आणि सृजनशील लिखाण

मुलांच्या सृजनशील लेखनात शिक्षकाची भूमिका अगदी कळीची असते. मुलांना लिहिते करण्यापासून सृजनशील लेखनापर्यंत पोहोचवण्यात शिक्षकांचा मोठा वाटा असतो. शिक्षक भले स्वतः लिहिणारे नसू देत; पण त्यांना मुलांच्या लिखाणाची आणि मानसशास्त्राची जाण हवी. ते उत्साही असले पाहिजेत. मुलांना केव्हा लिहिण्याचा मूड आहे, त्यांना किती अवकाश द्यावा, त्यांच्याकडे किती वैयक्तिक लक्ष द्यावे, त्यांच्या लिखाणात किती व कसल्या दुरुस्त्या कराव्यात यासारख्या अनेक गोष्टींचे शिक्षकांना भान



असायला हवे. शिक्षक किंवा पालकांनी अति हस्तक्षेप केला तर मुलांचे लिखाण असे होऊ शकते –

*जशा दहा दिशा तसेच वर्षात सहा ऋतू मानले जातात. परंतु उन्हाळा, हिवाळा व पावसाळा हे ऋतू महत्त्वपूर्ण मानले जातात. सर्व ऋतूंत सर्वश्रेष्ठ मानला जातो वसंत ऋतू. म्हणजे ऋतुराजाच्या मुलानं स्वतः काढलेल्या चित्रात फक्त हिरवाच रंग भरला आहे असं वाटतं.*

*वसंत ऋतूच्या आधी झाडांची पाने गळून पडतात व वसंत ऋतूत झाडांना नवी पालवी फुटते. त्याच वेळी पतझड सावन बसंत बहार ही गाण्याची ओळ मला आठवते.*

*याच वेळी आंब्याचा नवा मोहर येऊन त्याचा सुवास दाही दिशांना दरवळत असतो. जणू काही तो सुवास आपल्याला म्हणत असतो, अरे असा दुरूनच फक्त वास घेऊ नका. आंब्याच्या झाडाला तर लहान कैऱ्यासुद्धा लटकत आहेत. हेच जणू काही कोकिळाला कळलेले असते व तो हर्षित होऊन वसंताला साद घालत असतो. सगळी धरती तऱ्हेतऱ्हेच्या फुलांनी, त्यांच्या सुवासांनी व आनंदानी बहरून गेलेली असते. म्हणूनच आमच्या हिंदीच्या पुस्तकात*

*तन खुश होता,*
*मन खुश होता,*
*जब वसंत ऋतु आता है।*

असे सोहनलाल द्विवेदी यांनी म्हटले आहे.

आता या तुलनेत याच वयाच्या मुलाने स्वतःच्या भाषेत स्वतःचा अनुभव सांगणारा लेख लिहिला आहे –

*गप्पा मारता मारता सात वाजले. गप्पा खूपच रंगल्या होत्या. पण उशीर झाला होता. आम्ही घरी जायला निघणार इतक्यात दोन पक्षी उडता उडता खाली पडले. आधी वाटले ते चिमणा-चिमणीच आहेत. पण जरा नीट पाहिल्यावर लक्षात आले की हे स्पॉटेड मुनिया आहेत. का बरे पडले असतील हे? विषारी पाणी प्याले असतील की विषारी फळे खाल्ली असतील?*

*हळूच रुमालात उचलून दोघांना मी घरी घेऊन गेलो. घरी एक*

*चिमणीचे सोडून दिलेले घरटे होते. त्यात मी त्यांना ठेवले. पाणी पाजले. दाणे टाकले. दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यागेल्या बाईंना सांगितले. बाई म्हणाल्या संध्याकाळी पक्षी घेऊन ये. संध्याकाळी पुन्हा चारा-पाणी देऊन हातावर घेतले. मनात विचार आला, हे कधी उडतील का? विचार आल्यासरशी त्यांना हवेत सोडले. ते धडपडत धडपडत उडत जाऊन कुंडीवर जाऊन बसले आणि तिथून उडून गेले. मी खूप नाराज झालो. बाईंना जाऊन सांगितले. पण बाई रागावल्या नाहीत. उलट म्हणाल्या, "अरे बरे झाले ते उडून गेले ते!"*
*माझ्या मनातला एक प्रश्न मात्र सुटला नाही. ते का पडले असावेत? काही दिवसांनी मला घराजवळ एक स्पॉटेड मुनियाचे घरटे सापडले. हे त्यांचेच असावे का? कुणाचे का असेना, त्यांची आठवण म्हणून मी ते ठेवून घेतले आहे.*

कधी कधी मुलांना लिहिण्यास उद्युक्त करण्यासाठी कवितेची एखादी ओळ दिली जाते. यामुळे कदाचित फारशी कधी न लिहिणारी मुले लिहिती होतात. परंतु खऱ्या सृजनशील मुलांना मात्र हेही बंधन नको वाटते. प्रकाश पाचवीत असताना बाईंनी एक ओळ दिली – 'ओसाड माळरानावर उभे एक झाड एकटे एकटे'. प्रकाशची कविता त्या वेळी इतर सर्वांच्या कवितांवर मात करून गेली.

परंतु पुढे कधीतरी बोलता बोलता तो म्हणाला, मला स्वतःला ती कविता कधीच आवडली नाही कारण ती पूर्णपणे माझी नव्हती. बाईंनी केवळ पहिली ओळच दिली होती असे नाही तर त्या ओळीत विशिष्ट शब्दनिवडीमुळे एक उदास भावही दिला होता. त्यामुळे जणू काही सक्तीने तोच भाव त्या कवितेतून उमटणे गरजेचे होते. त्यापेक्षा फक्त 'माळावरचे झाड' एवढाच विषय बाईंनी दिला असता तर अधिक वेगवेगळे आविष्कार उमटले असते.

मुलांकडून सृजनशील लेखन करून घेण्यासाठी आपल्याला शिक्षक म्हणून काय करता येईल? शाळेचे तास, घंटा, अभ्यासक्रम यात लहान मुलांना जखडून ठेवू नये. साधारणतः चौथीपर्यंत व कधी कधी सातवीपर्यंतही



एकच शिक्षक सर्व विषय शिकवतात व दिवसभर वर्गावर असतात. त्यामुळे मुलांना असा अवकाश ते देऊ शकतात. एखाद्या नव्या पाहिलेल्या, अनुभवलेल्या गोष्टीबद्दल मुलांना बोलायचे असते, तेव्हा शिक्षकांनी मुलांबरोबर गप्पांमध्ये सहभागी व्हायला हवे. मुलांना एकमेकांत गप्पा मारू द्यायला हव्या. सारखा 'गप्प बसा'चा पाढा नको.

इयत्ता पहिलीमध्ये मुलांना लवकरात लवकर पुरेशी भाषा कौशल्ये येतील याची काळजी शिक्षकांनी घेतली पाहिजे. लेखन कौशल्यात अक्षराचे योग्य वळण, दोन शब्दांमध्ये जागा सोडणे, शुद्धलेखन व योग्य विरामचिन्हांचा वापर करणे, तसेच वाचन कौशल्यात समजून व योग्य ठिकाणी जोर देऊन वाचणे मुले शिकली पाहिजेत. त्यांच्याजवळ आपले अनुभव मांडण्याइतपत शब्दभांडारही असले पाहिजे. ते वाढवण्यासाठी गप्पा, शब्दांच्या भेंड्या, नाव-गाव-फळ-फूल सारखा खेळ, अवांतर वाचन या साऱ्यांचा उपयोग होतो. मुले वाचती होईपर्यंत मुलांना गोष्टी सांगणे, वाचून दाखवणे, पूर्वी माहीत नसलेली गोष्ट निम्मीच सांगून उरलेली पूर्ण करायला सांगणे यातून मुलांची सृजनशीलता वाढवता येते व मुले गोष्टीचा आकृतिबंध ओळखू लागतात. त्याचा पुढे लिहिण्यासाठी उपयोग होतो.

वर्गात मुलांना भरपूर वाचून दाखवावे. गोष्टी सांगाव्यात. वर्तमानपत्रातील वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्यांची चर्चा करावी. त्यांचे विवेचन करावे व मुलांना आपले विचार मांडायला वेळ द्यावा. परंतु चर्चा झालेल्या किंवा वाचून दाखवलेल्या विषयावर लगेच लिहायला सांगू नये. अन्यथा मुले त्याचेच अनुकरण करण्याची दाट शक्यता असते.

लहान मुलांचे लिखाण ही गोष्ट वर्षभर, कायमस्वरूपी चालणारी गोष्ट असावी. मुलांना जेव्हा लिहावेसे वाटते तेव्हा त्यांना लिहायला परवानगी असावी. मुलांचे सर्व लिखाण स्वीकारले जावे. ते अधिक चांगले करण्यासाठी त्यावर चर्चा केली जावी, परंतु कुठलाच प्रयत्न चुकीचा किंवा अयोग्य किंवा वाईट म्हणून बाद केला जाऊ नये आणि याची मुलांना पूर्ण जाणीव करून द्यावी.

मुलांचे लिखाण हे मुलांच्या विकासासाठी वापरले जायला हवे. त्यामुळे मुलांनी दिलेले सर्व लिखाण काटेकोरपणे तपासले जावे. पहिल्यांदा

जेव्हा मुलांचे लेखन तपासले जाते तेव्हा शुद्धलेखनाकडे, विरामचिन्हांकडे थोडे दुर्लक्ष करून आशय समजून घेण्याचा प्रयत्न केला जावा. तो वाचकांपर्यंत पोहोचत नसेल तर मुलांशी गप्पा मारून त्यांना आपले अनुभव तोंडी सांगायला सांगितले जावे. त्यातील बलस्थाने टिपून मुलांच्या लक्षात आणून दिली जावीत. लेखनातील त्रुटी लक्षात आणून देऊन पुन्हा लेखन करायला लावले जावे. चर्चा करतानाही 'हे तुझे चुकले आहे', 'हे काहीतरीच काय लिहिले आहे' असे न म्हणता, 'इथे नीट समजत नाहीये', 'इथे तुला काय म्हणायचे आहे?', 'या ठिकाणी दुसरा एखादा शब्द सुचतोय का बघ', 'या ठिकाणी अधिक विस्तृत लेखन व्हायला हवे' अशा सूचना केल्या जाव्यात.

मुलांना बोलते व लिहिते करण्यासाठी पहिलीच्या वर्गात काही उपक्रम करता येतील. एखादा विषय घेऊन मुलांना त्याबद्दल एक एक वाक्य सांगायला सांगावे. 'मला राग येतो', 'मला आवडते', 'मला नाही आवडत', इत्यादी विषयांवर प्रत्येक मुलाला एक एक वाक्य सांगायला सांगावे. ते कागदावर खालच्या बाजूला लिहून तो कागद मुलाला चित्र काढायला परत द्यावा. आपण सांगितलेल्या वाक्याला जोड म्हणून मूल चित्र काढते. उदाहरणादाखल मुलांना कशा-कशाचा राग येतो ते आपण पाहू. किरण म्हणतो, 'आईने मारले की राग येतो.' शरयू म्हणते, 'पुस्तकाला हात लावला की मला राग येतो.' सुभान म्हणतो, 'आईने लाकडाने मारले की राग येतो.' प्रतीक्षा म्हणते, 'फुलपाखरू धरले की मला राग येतो.'

आपण, आपले अनुभव, आपल्या भावना, विचार, आपले घर या साऱ्यांना शाळेत स्थान आहे ही जाणीव वरील उपक्रमामधून मुलांच्या मनात ठसवण्याचे काम करता येते.

मुले स्वतःबद्दल बोलती झाली, एक एक वाक्य बोलू लागली की मग 'मला पंख असते तर' किंवा 'मला शेपूट आली तर' सारखे काही काल्पनिक विषय हाताळता येतील. एका ओळीवरून मुलांना ५-६ ओळींपर्यंत न्यायचे असते तेव्हा एखादा सण किंवा उत्सव मदतीला येतो. सणादिवशी काय केले त्याविषयी मुलांना ५-६ ओळी लिहायला सांगाव्यात किंवा कविता करायला सांगावी. पहिलीतील शिवम आणि सलमान लिहितात –



*सकाळ झाली,*
*आंघोळ केली*
*मांजा घेतला*
*पतंगीला बांधला*
*नंतर पतंग उडवायला गेलो*
*आई नागोबाला गेली.*
*तिथं मी पतंग उडवली.*
*चार पतंगी पकडल्या*
*घरी आलो.*

*शिवम इ. १ली*

*दोऱ्याचा बंडल आणला*
*निळा रंग घेतला*
*त्यात शाबू टाकला*
*काच आणली*
*कपड्यात घेतली*
*भैया आणि मी*
*मांजा तयार केला*

*सलमान इ. १ली*

पहिलीच्याच मुलांबरोबर करता येऊ शकेल असा आणखी एक उपक्रम म्हणजे एकमेकांशी नाते सांगणारे आठ-दहा शब्द घेऊन त्यांच्या साहाय्याने गोष्ट किंवा कविता लिहायला सांगणे. वाघ, जंगल, माकड, पाणी, मित्र, पळणे, आनंद, खेळणे, सहल या शब्दांवरून सूर्यभानने लिहिले होते –

*पोरांची गेली सहल*
*तिकडून पळत आला वाघ*
*पोरांना विचारले,*
*'कुठे चालला?'*
*पोरं म्हणाली,*
*'तुझ्याशी मैत्री करायला.'*

एकदा मुले आठ-दहा ओळी लिहायला लागल्यावर अशा कृत्रिम उपक्रमांची गरज पडत नाही.

दुसरी-तिसरीमध्ये शब्दांची जागा म्हणी व वाक्प्रचार घेऊ शकतात. पण त्यातून फारसे काही सृजनशील लेखन घडत नाही. या उपक्रमाचा उपयोग एवढाच होतो की, मुलांना म्हणी व वाक्प्रचारांचे अर्थ नीट लक्षात येतात व ते कुठे आणि कसे वापरता येतात याचे भान येते. त्यामुळे स्वतःच्या लेखनात ती ते सफाईदारपणे वापरू शकतात.

लिखाणासाठी मुलांना बरेचदा विषय द्यावे लागतात. तुम्हांला हवे ते लिहा सांगून नेहमी लिखाण मिळतेच असे नाही. विषय देताना तो 'भारतीय शेतकरी'सारखा फारच मोठा आवाका असणारा नसावा. त्यापेक्षा एक अविस्मरणीय प्रसंग, माझे बाबा, आई असा विषय द्यावा. विषय शक्यतो मुलांच्या आयुष्याशी, अनुभवविश्वाशी निगडित असावा. नैसर्गिक घटना, सांस्कृतिक, सामाजिक घटना, परिसर सहली, अभ्यासक्रमातले धडे, कविता यातले काहीही नवा विषय पुरवायला पुरेसे होते.

लहान मुलांच्या बरोबर समाजातील सण, उत्सव, यात्रा, जत्रा, वर्तमानपत्रातील बातम्या, जगात घडत असणाऱ्या महत्त्वाच्या घटना यांच्याबद्दल रोज वर्गात खुली चर्चा व्हावी. एखाद्या विशिष्ट घटनेमध्ये नक्की काय झाले, कसे कसे झाले, का झाले, त्याबद्दल काय केले अशा सर्व बाजूंनी त्या घटनेची सविस्तर चर्चा झाली की नंतर लिखाण घ्यावे. मुलांना अभिव्यक्ती करण्यासाठी गद्य / पद्य / चित्र अशी विविध माध्यमे वापरण्याची मुभा द्यावी.

आपले लिखाण जसे आहे तसे मान्य केले जाणार आहे या जाणिवेबरोबरच इतर काही गोष्टींची मुलांना जाणीव करून द्यावी लागते. त्या काही गोष्टी अशा –

१. तुम्ही एखाद्या क्षणाबद्दल दोन पाने लिहू शकता किंवा एका परिच्छेदात अख्खा जीवनक्रम रंगवू शकता.

२. अनुभव जरी अनेकांचा एकच असला तरी लिखाण स्वतःचे असे करता येते.

३. प्रत्येकाने स्वतःची अशी शैली विकसित करायला हवी.



### कवितांचे वेड

आमच्या शाळेतील सर्वांत सृजनशील विद्यार्थी घडवण्याचे श्रेय मी आशाताईंना देईन. १९९० या वर्षी इयत्ता चौथीच्या वर्गात कवितांचे वेड होते. त्या वर्षी जितके उत्कृष्ट लिखाण मुलांकडून मिळाले व त्याच मुलांकडून दहावीपर्यंत मिळत गेले, तितके त्यानंतर कधी मिळाले नाही. आशाताई चौथीच्या वर्गशिक्षिका होत्या. चौथीला सर्व विषय शिकवत होत्या. त्यामुळे दिवसभर सर्व मुले व बाई एकत्र असत. आमच्या शाळेत अभ्यासक्रम आणि परीक्षांचा कधीच बाऊ नसे त्यामुळे मुलांना सृजनशील लेखनाला आणि चर्चेला भरपूर अवकाश मिळत असे. आशाताई ४थी ते ६वीच्या मुलांना कविता लिहिण्यासाठी बिरोबाच्या माळावर घेऊन जात. मुले तिथे निसर्गाच्या सान्निध्यात बसून लिहीत. वर्गाच्या चार भिंतींमध्ये बसून जे शब्द सुचणार नाहीत ते निसर्गसान्निध्यात सहज सुचून जात. मग शाळेत परत आल्यावर सर्वांच्या कविता एकत्र करून त्यांचे सामुदायिक वाचन होई. सुरुवातीला कवितांमध्ये यमक जुळलाच पाहिजे असा अट्टाहास नसे. ओळी अर्थपूर्ण असणे अधिक महत्त्वाचे. त्यामुळे यमक जुळवण्यासाठी आटापिटा करत बसायचे नाही हे साऱ्यांना माहीत होते. आशाताई मग 'कविता कशा वाचाव्यात' याचे धडे देत. त्यामुळे तालाची जाण येई. ओळींची लांबी किती असावी, ती बसत नसल्यास प्रतिशब्द कसे निवडावेत ते कळे व हळू हळू आपोआपच यमके जुळून येत.

काव्यवाचनातून आणखी एक गोष्ट साध्य होते. ती म्हणजे कवितांचे अभंग, फटके, चारोळ्या असे वेगवेगळे प्रकार समजणे. तसेच कविता वेगवेगळ्या छंदांमध्ये व वृत्तांमध्ये गुंफलेल्या असतात हे लक्षात येणे. या गोष्टी लक्षात आल्यावर मुलेही आकृतिबंधात कविता बांधू लागतात. चोखामेळाच्या 'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा' या अभंगावरून प्रकाशनेही एक अभंग लिहिला होता –

*शाळा डोंगा परी शिक्षण नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा*
*आई डोंगा परी प्रेम नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा*
*प्रकाश डोंगा परी गुण नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा*

महेशने चारोळ्या केल्या होत्या –

*कल्पना म्हणजे माळावरचं गवत नाही*
*केव्हाही डोक्यात यायला*
*विचारांची सात वर्षे जावी लागतात*
*कल्पनेची एक कारवी फुलायला*

प्रत्येकाने वेगळे लिहा, आपापले लिहा, असे आशाताई कायम मुलांच्या मनावर ठसवत. वाचनानंतर एकेका विद्यार्थ्याजवळ बसून त्याच्या कवितेची चर्चा करत, पुनर्लेखन करायला लावत आणि झालेल्या कविता स्केच पेनने कोऱ्या कागदावर लिहून फलकावर लावत. वर्गात वर्षभर काही ना काही लिखाण चालूच असे.

## वाचन आणि लेखन

भाषेच्या सराईत वापरासाठी भरपूर, चौफेर आणि सकस वाचन फार महत्त्वाचे असते. पण कधी कधी मुले एखाद्या लेखकाने अथवा त्याच्या शैलीने इतकी भारावून जातात की, स्वतःच्याही नकळत त्या लेखकाची, त्याच्या शैलीची नक्कल करू लागतात. कधी कधी तर त्याच्या लेखनातील भावलेले परिच्छेदच्या परिच्छेद उचलतात. हा एक मर्यादित टप्पा असेल तर त्याला हरकत नाही. परंतु मूल त्यातून बाहेर पडते आहे ना यासाठी त्याच्या लिखाणावर नीट नजर ठेवली पाहिजे.

## सृजनशील लेखनाचे मोजमाप

सृजनशील लेखनाचे मोजमाप करायचे का व केले तर ते कसे, हे दोन प्रश्न आपल्यासमोर आहेत. मला वाटते मोजमाप झाले पाहिजे. मग प्रश्न राहतो, कसे? एक गोष्ट पहिल्यांदाच स्पष्ट करायची आहे. ती म्हणजे कुठल्याच सृजनशील लेखनाचे मोजमाप गुण किंवा श्रेणींनी करू नये.

मोजमाप करताना सर्वप्रथम मुलाच्या अनुभवाकडे पाहावे. या ठिकाणी शिक्षकांची पार्श्वभूमी, आवडनिवड यांसारख्या वैयक्तिक गोष्टींचा प्रभाव पडतो. पण शक्य तितकी वस्तुनिष्ठता येण्यासाठी मुलाचे वय व पार्श्वभूमी लक्षात घेऊन अनुभवातील अस्सलपणा जोखावा. खेड्यात राहणारा कमलेश रानातले म्हव काढायला जातो, हा इतका वैशिष्ट्यपूर्ण अनुभव आहे की एखाद्या शहरी शिक्षकाला तो न भावण्याची शक्यता आहे. परंतु अनुभव आपल्या ओळखीचा नसला तरी त्याचा जिवंतपणा जोखण्याइतपत जाण भाषाशिक्षकाला हवी.

यानंतर निबंधाच्या मांडणीकडे पाहायला हवे. बहुतेक वेळा मुले साधी सरळ सुरुवात करतात, जसे की 'उन्हाळ्याच्या सुट्ट्या होत्या....' पण कधी कधी ती फ्लॅशबॅकचा उपयोग करतात व वर्तमानातील एखाद्या प्रसंगातून सुरुवात करतात. 'आमचा भैय्या' (नवनीत २००८) या लेखात या पद्धतीचा सुजितने उपयोग केला आहे –

*मी, आई आणि भैय्या संध्याकाळच्या वेळी असेच निवांतपणे बसलो होतो. गप्पा रंगात आलेल्या आणि का कुणास ठाऊक आई अचानक स्तब्ध झाली. मी पाहिले तर ती भैय्याकडे एकटक पहात होती. तिचे डोळे पाणावल्याचेही मला जाणवले. आई अचानक भावविवश का झाली समजेना. मी तिला विचारू लागलो. मात्र काहीच न बोलता ती माझ्याकडे व भैय्याकडे पहायची. शेवट मी तिच्या गळी हात घालून तिला बोलते करण्याचा प्रयत्न करू लागलो. तेव्हा तिने 'तो' प्रसंग सांगितला.*

मूल शाळेत येते तेव्हा आपल्या घर आणि परिसरातून भाषेची आणि अनुभवांची घसघशीत शिदोरी घेऊन आलेले असते. ते सर्व टाकाऊ आहे असे आपण म्हणू शकत नाही. तेव्हा मुलांची भाषा आहे तशीच स्वीकारली पाहिजे. ग्रामीण भागातून येणाऱ्या मुलांची भाषा प्रमाण-भाषेपेक्षा थोडी वेगळी असेल. परप्रांतातून येणाऱ्या मुलांची भाषा प्रादेशिक भाषेत त्यांच्या मातृभाषेची सरमिसळ असलेली असेल. तेव्हा प्राथमिक शाळेत प्रमाण-भाषेचा आग्रह धरणे मला चुकीचे वाटते. मुलाची भाषा स्वीकारून त्याच्या शिकण्याच्या प्रक्रियेतील अडसर प्रथम दूर करून नंतर हळू हळू त्याला प्रमाण-भाषेकडे वळवणे योग्य ठरेल. आमच्या शाळेत मुले ग्रामीण भागातून

येतात. ती ग्रामीण भाषा वापरतात. त्यांचे अनुभवही अस्सल ग्रामीण असतात. ते अनुभव प्रमाण-भाषेत लिहिले तर कचकड्यासारखे वाटतील म्हणून त्या लेखाची मूळ भाषा आम्ही आहे तशीच ठेवतो. 'कमल्याचा तमाशा' (नवनीत २००८) मध्ये रणजित लिहितो –

*कमलेशच्या वडिलांनी मला अशी एक सनसनीत चापट लावली की मला तिरीमिरी आल्यासारखं झालं. तसाच मी किविलवाना चेहरा करून परत कमल्याला हुडकायला गेलो.*

काही मुलांची घरची संवादाची भाषा हिंदी असते. परंतु शाळेचे माध्यम मराठी असल्यामुळे मुले हिंदीमिश्रित मराठीत लिहितात. पहिलीतला सुभान आपल्या आजोबांविषयी लिहितो, 'आजोबा नमाजको जातात. आजोबा मला कंपास दिलातो. आजोबा तंबाको खातात.'

ही वाक्ये आहेत तशी स्वीकारली जातात. त्यामुळे मुले चुका दुरुस्त करण्यात किंवा प्रमाण-भाषा लिहिण्याच्या मागे लागण्यात आपली शक्ती खर्च न करता अधिकाधिक सृजनशील लिहितात. खूप लिहितात. नवे नवे लिहितात. त्यांच्या लेखनाचा जसे आहे तसा स्वीकार आणि केलेले कौतुक त्यांना प्रोत्साहन देते. याचा अर्थ वाट्टेल ते लिखाण स्वीकारले जाते असे नाही. आत्तापर्यंतचा आमचा अनुभव आहे की, मुलांना पूर्ण लेखन-स्वातंत्र्य असल्याने मुले प्रांजळपणे आणि अगदी पोटातून लिहितात. असे लिखाण कधीच टाकाऊ नसते. शिवाय आपले लेखन चांगले झाले आहे किंवा नाही हे कळण्याइतकी जाण त्यांना उपजतच असते.

विषयातील नावीन्य हा आणखी एक भाग सृजनशीलता दाखवतो. आपण एखाद्या विषयावर लिहायचे का नाही याच संभ्रमात मुले पुष्कळदा असतात. मला ज्या विषयावर लिहायचे आहे त्यावर मी लिहिणार हा विश्वास मुलांमध्ये निर्माण करणे हेही शिक्षकांचे काम असते.



## लेखनशैली

शाळेत सतत होणाऱ्या लिखाणातून मुलांची आपली आपली अशी शैली तयार होऊ लागते. सहावीत असताना नम्रताने 'मनमोहक संध्याकाळ' या नावाने संध्याकाळचे वातावरण व लोक त्याचा कसा आस्वाद घेतात याविषयी लिहिले होते. त्यानंतरच्या अंकात 'क्षण एक' ही हितोपदेशाच्या गोष्टीसारखी संदेश देणारी कथा लिहिली. त्यानंतर मात्र तिने तितक्याच ताकदीने नर्म विनोदी प्रसंग लिहायला सुरुवात केली. 'मी स्वयंपाक शिकते'मध्ये तिने स्वतःच्या स्वयंपाकाच्या प्रयोगाची टिंगल उडवली. तर 'दुःख'मध्ये दूरदर्शन मालिकांच्या आहारी गेलेल्या महिला वर्गाची मस्करी केली. हलके-फुलके, मस्करी करत करत चिमटे काढत काढत लिहिण्याची शैली तिने 'आपली' म्हणून विकसित केली.

सूरज चौधरीचे शक्तिस्थान होते चपखल बसणाऱ्या उपमांमधून एखादे दृश्य वाचकांसमोर तंतोतंत उभे करणे. 'एक अविस्मरणीय सामना'मध्ये (नवनीत २००५) त्याची विशेषणे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. जसे की –

*आमच्या गटात प्रोत्साहनाच्या घोषणा वादळासारख्या उठू लागल्या. त्या निर्जन मैदानावर आमचाच आवाज मधमाश्यांच्या घों घों सारखा येत होता.*

पुढे बॅटिंगची वेळ आल्यावर तो लिहितो –

*मी बॅटिंगला उभा राहिलो. समोर विरोधी संघाचा बॉलर होता. एखादा लढाऊ बैल नाकातून फुसकारा सोडत, खुरांनी मागे माती उधळत यावा तसा तो आला. त्याने समोरून गोळीसारखा बॉल टाकला.*

'ती भयाण रात्र' (नवनीत २००६) या कथेतही त्याने 'भुताच्या घराप्रमाणे वाटणारे झाड' वगैरे उपमा देऊन विंचुर्णीच्या शेताचा परिसर डोळ्यांसमोर उभा केला आहे.

आपला अनुभव मनोरंजक रीतीने वाचकांपर्यंत पोहोचवण्यात मूल यशस्वी झाले आहे का? वाचकाला पुढे पुढे वाचावेसे वाटेल, रुची वाटेल अशी लेखनाची मांडणी आहे का? कमलेशने 'म्हव'मध्ये (नवनीत २००८) मधाचे पोळे काढण्याच्या मोहिमेचे वर्णन केले आहे. हा अनुभव सर्वसामान्य लोकांसाठी अगदीच नवखा आहे. पण कमलेशने आपल्या खास ग्रामीण

शैलीत तो असा काही रंगवला आहे की बस! कमलेश लिहितो –

*आम्ही सगळे ते मधमाश्यांचे पोळे नीट बघण्यासाठी गेलो. म्हणजे माश्या केवढ्या आहेत, मधाचा कांदा केवढा आहे, झाड कसं आहे हे बघून कसं कसं कोणी कोणी काय काय करायचं हे ठरलं. त्या पोळ्यात किती मध मिळेल या विचारात पुढचे आठ दिवस गेले. ठरलेल्या दिवशी दुपारीच मी, गव्या, भैय्या आम्ही तिघेच घराबाहेर पडलो आणि गव्याच्या रानात पोहोचलो. आमच्या म्हव काढण्याच्या कामगिरीला सुरुवात झाली.*

*दुपारची उन्हाची वेळ असल्याने रानात कुणीच नव्हतं. येतानाच आम्ही फुल शर्ट, फुल पँट घालून आलो. आता बरोबर आणलेले टॉवेल डोक्यावरून, तोंडावरून गुंडाळून घेतले. गव्या नारळाची शेंडी आणि काडेपेटी खिशात घेऊन आधी झाडावर चढला. मग मी थोडा वर गेलो आणि भैय्याने माझ्या हातात विळा दिला. मी वर चढलो. आम्ही दोघे म्हवापाशी पोहोचलो. मग गव्याने नारळाची शेंडी पेटवली आणि म्हवासमोर धरली. धुरामुळे सगळ्या माशा घोंघाऊ लागल्या. दोन घावांत मी ढांपी तोडली. ती खाली पडली. भैय्याने झेलली आणि तो पळत सुटला. मी झाडावरच होतो. माझ्या बोटांना दोन माश्या चावल्या होत्या, गव्यालाही दोन-तीन माश्या चावल्या. फांदी घेऊन पळताना पोळ्यावर राहिलेली एक माशी भैय्यालाही चावली. भैय्या पळत जाऊन रस्त्यावर उभा राहिला.*

पोळे काढण्यासाठी डावपेच आखणे, तयारी करणे आणि शेवटी म्हव पाडणे या साऱ्यांचे थोडक्या शब्दांत वर्णन करून कमलेशने एक नवाच अनुभव वाचकांसमोर ठेवला आहे. त्याच्या खास ग्रामीण शैलीत केलेल्या मधाचा कांदा, झाडाची ढांपी, माशीचा काटा वगैरे विशिष्ट शब्दांच्या पेरणीमुळे लेख आणखी रोचक झाला आहे.

या लेखाच्या सुरुवातीला मी म्हटले आहे की, माणूसप्राण्याला इतरांशी संवाद साधण्याची एक मूळ ऊर्मी असते.

चित्र काढणे किंवा लिहिणे यातून ही ऊर्मी प्रकट होत असते. आमचा असा अनुभव आहे की प्राथमिक वर्गांच्यात सर्वच मुलांना लिहावेसे वाटते व सर्व जण लिहितात. परंतु चौथीमध्ये मुलांचे लिखाण कमी होऊ लागते. पुढे पुढे मात्र फक्त ठरावीक मुलेच लिहितात. या लिहिणाऱ्या मुलांकडे पाहिले तर त्यातील काही चांगले गुण मिळवणारी असतात तर काही सामान्य गुण मिळवणारी असतात. तेव्हा लिखाण ही काही हुशार समजल्या जाणाऱ्या मुलाची मक्तेदारी नसते हे लक्षात येते. मुलांची पार्श्वभूमी पाहता शिकल्या-सवरलेल्या, वाचत्या घरातील मुलेच लिहितात असेही आढळत नाही. उलट 'नवनीत' चे सर्वांत सृजनात्मक लेखन अल्पशिक्षित आणि निम्न मध्यम वर्गातून येणाऱ्या मुलांकडून मिळाले आहे.


लेखनातील सृजनशीलतेबरोबरच इतर ठिकाणीही मुले सृजनशीलता दाखवतात. चित्रकला, नृत्य, अभिनय, कार्यानुभव, वक्तृत्व, कार्यक्रमांचे निवेदन, कथाकथन, वर्गसजावट, विज्ञान व गणितातील समस्यापूर्ती, संगणकीय कौशल्ये अशा अनेक ठिकाणी सृजनशील आविष्कार पाहायला मिळतात. शाळेमध्ये एकूणच मोकळे वातावरण, करड्या शिस्तीला लगाम, मुलांच्या कलेचा, विचारांचा आदर व कौतुक, सर्व कामांमध्ये मुलांचा सहभाग यासारखा समग्र दृष्टिकोन असेल तर मुलांचे लिखाणही सृजनशील बनेल.

# माझ्या शाळेची कहानी

**प्रकाश अनभुले (इयत्ता ७ वी)**

माझ्या शाळेची कहानी जरा अजबच आहे. मला पूर्वी शाळा हे नाव घेतलं की भीती निर्माण व्हायची. याचं कारण म्हणजे शिक्षकच. एखाद्या मुलास शाळा जरी आवडली तरी सरकारी शाळेत गेल्यावर दुसऱ्याच दिवशी तो पळून परत जाणार. कारण शिक्षकांच्या आज्ञेत रहावे यासाठी त्याला मारणं, शिक्षा करणं हे ठरलेलंच असायचं. अशाने मुलांना सरांबद्दल कधीच प्रेम राहणार नाही. नाइलाजाने त्यांच्या समोर आज्ञापालन करतील पण मागे त्यांच्याबद्दल मनात अनेक वाईट विचार असतील.

माझं नाव नगरपालिकेच्या शाळेत टाकलं. माझा शाळेतील पहिलाच दिवस! सर्व नवीन होतं. मी शाळेच्या ग्राऊंडवर दप्तर घेऊन आलो. भिंती कमजोर होत्या. खिडक्या तुटक्या-फुटक्या, दरवाज्याच्या तोंडाशी एक मोठं टेबल. त्यावर मुलांनी सुंदर कोरीव काम केलेलं. सरांचा चेहरा काढलेला. मी टेबलाजवळ गेलो. एक पट्टी, खडू, हजेरीपत्रक हे तिथं होतं. टेबलावरच एक व्यक्ती होती. मी आत चाललोच होतो. तोवर सरांनी मला बाहेर जाण्यास सांगितलं. म्हणाले, 'चल बाहेर जा आणि आत येऊ का असं विचार'. मी तसं केलं. मला दोन नंबर ओळीत बसवलं. आतमध्ये एक सुविचार होताः 'मुले म्हणजे देवाघरची फुले'. पण इथे तर या फुलांना काट्यांसारखी वागणूक दिली जात होती.



सरांनी शिकवायला सुरुवात केली. पहिला तास मराठीचा होता. सरांनी एक धडा घेतला, वाचून दाखवला व प्रत्येकास उभा करून वाचून घेतला. त्याखालील प्रश्न लिहायला सांगून स्वतः बाहेर जाऊन दुसऱ्या सरांबरोबर गप्पा मारू लागले.



मला जास्त कळत नव्हतं. मुलांनी मला नाव विचारलं. नंतर दोन जणांची भांडणं सुरू झाली. मारामारीही झाली. सर रागाने पळत आले. ज्यांनी मारामारी केली ते बाजूलाच राहिले. सरांनी सर्वांना ओळीने मारायला सुरुवात केली. त्यात मलाही मार मिळाला. सायंकाळी मी घरी आल्यावर सांगणार कुणाला? आई कामावरून आलेली असायची. वडील १०-१२ वाजता परत यायचे. मी गप्प बसायचो. दुसऱ्या दिवशी मात्र मी शाळेत जाण्यास नकार द्यायचो. आई मला मारतच शाळेत नेऊन बसवायची. सर का येत नाही हे विचारायचे सोडून मारायलाच सुरुवात करायचे. मला फारच वाईट वाटायचं. संध्याकाळी



माझ्यासाठी चॉकलेट घेऊन आई मला न्यायला यायची. मी सर्व विसरून घरी यायचो. आईचा मायेचा हात अंगावरून फिरायचा पण सरांचा मात्र मायेचा हात कधीच फिरला नाही.

आई-वडिलांसाठी मुलांना शाळेत जाणं भाग पडायचं. त्या शाळेतील मुलं गरिबीत वाढलेली, चांगले संस्कार न झालेली असायची. त्यामुळे बाकीची मुलेही बिघडायची. मला का कोणास ठाऊक, पण त्यांच्यापासून दूर रहायला आवडायचं.

शाळेजवळच एक मंदिर होतं. तिथं जाऊन मी ओळींना ओळी लावायचो. तेव्हापासून मला कवितेचं वेड होतं, असं आज वाटत आहे. कविता हा शब्द त्या शाळेत माझ्या कानावर पडला. पण लेखकांच्या कविता. स्वतः मुलांना कविता करायला कधीच सांगत नसत. त्यामुळे माझ्या कविता मनातच रहायच्या. वाटायचं आपण या शाळेतून पळून जावं. पण आईची भीती वाटायची आणि असं करू नकोस अशी तिची शिकवणही मिळायची.

या शाळेत आम्हाला सुट्ट्या फारच असायच्या. त्यामुळे मी व माझा

मित्र धनंजय विटी-दांटू आणि गोट्या खेळत बसायचो. आमचं सर्व लक्ष खेळावर असायचं. धनंजय माझा लंगोट मित्र होता. आमचं एकमेकांवर अतूट प्रेम होतं. शाळेचा आम्हाला राग येऊ लागला. घरच्यांना आम्ही खूप सांगायचो. पण त्यांना वाटायचं यांना बोंबलत हिंडायला पाहिजे म्हणून ही नाटकं करतात.

नंतर नंतर शाळेचा कंटाळा म्हणण्यापेक्षा सरांचा त्रास वाढला. आम्ही दोघं शाळेचं नाव करून मंदिरात जाऊन बसायचो. दोन वाजले की घरी यायचो. घरच्यांना वाटायचं आम्ही शाळेतच गेलोय, पण आमची तरी काय चूक? खरंच सर खूप मारायचे. मला वाईट वाटायचं ते त्या गरीब गोसावी मुलांचं. अंगावर धड कपडा नाही. पुस्तकं वह्या तर कधीच नसायच्या. तरीही बिचारी शिकत होती. वाचायला आलं की सारं आलं अशी त्यांची शिक्षणाची व्याख्या असायची.

मला फार वाटायचं आपल्याला चांगल्या शाळेत जायला मिळावं. पण ते कधी होणार याचीच सतत हुरहुर....

माझं मन स्वप्नं रंगवू लागायचं. नवीन शाळा कशी असेल? मला वाटायचं शिक्षकांनी समजावून सांगावं, प्रेमानं शिकवावं. ही सर्व स्वप्नं आहेत हे समजल्यावर निराश व्हायचो.

अशीच त्या शाळेत माझी दोन वर्षं गेली. नंतर मात्र सतत गैरहजेरी हे कारण दाखवून मी शाळेला राम राम ठोकला. वडील म्हणाले, तुला नवीन शाळेत टाकतो. काही दिवसांनी मला समजलं आमच्या शाळेतील ते सर वारले. मुलांना दुःख झालं नाही. पण मला वाईट वाटलं. कसेही असले तरी माझे ते पहिले सर होते. शाळेतून निघाल्यावर एकदा मी आजारी पडलो. कदाचित हे आजारपणच माझं दुसऱ्या शाळेत जाण्याचं कारण बनलं असावं.

आम्ही त्या वेळी डॉ. मंजूताई यांच्याकडे गेलो. त्यांनी शाळेविषयी विचारलं व नंतर एक चिठ्ठी लिहून दिली. औषधांबरोबर माझं खरं औषध त्यांनी त्यात लिहून दिलं होतं.

वडील कामाला लागले. माझी शाळेत जाण्याची तयारी सुरू झाली. या नव्या शाळेत पुढचा वर्ग नसल्याने मला मागच्या वर्गातच बसावं लागलं होतं. याचं मला दुःखही वाटलं. दुसऱ्या दिवशी सकाळी सायकलवर बसलो.



सायकल खूप वेळ चालली होती. मी वडिलांना काहीच विचारलं नव्हतं. शेवटी मी आणि वडील दोन कमानींच्या पुढे गेलो. वडिलांनी सायकल वळवली. पुढे जाताच एक भक्कम इमारत दिसली. तीच माझी नवीन शाळा. जणू मला म्हणायची, 'ये तुझ्या स्वप्नातील आहे मी.'

मी उत्साहाने आत गेलो. खेळणी, सनमायकाचे टेबल. मला फार आनंद झाला. एक बाईंनी मला आत नेलं. मी घाबरलो. बाईंनी गोड आवाजात माझी आणि मुलांची ओळख करून दिली. मला समाधान वाटलं. खेळ, गाणी करत करत बेल झाली. मला शाळेतून बाहेर जावंसंच वाटत नव्हतं.

वडील आत आले व वडिलांनी मला चल म्हटले. मी घरी आलो. मला फारच आनंद झाला होता. आई म्हणाली, 'आवडली का शाळा?' मी 'हो' म्हणलं.

दुसरा दिवस कधी येतोय असं झालं होतं. दुसऱ्या दिवशी माझी एका व्यक्तीशी भेट झाली; त्या व्यक्तीचे माझ्यावर फार फार उपकार आहेत. त्या म्हणजे मॅक्सीन आज्जी, आमच्या फक्त आजी!

खरं तर आजी या शब्दात काय लपलंय हे कोणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला नसेल. पण आज मी तो केलाय. आजी म्हणजे आईची आई!


जसं आई आपल्यावर प्रेम करते, तसंच आज्जींनी आमच्यावर खूप प्रेम केलंय व करतातही. त्यांनी सर्वांना समान वागणूक दिली. त्यांच्या विषयी माझ्या मनात त्याच दिवशी आदर निर्माण झाला व तो अजूनही आहेच. आज्जींना मी जिवंत असेपर्यंत कधीच विसरणार नाही.

आजी आम्हाला सांगायच्या, सर्वांनी वर्गात भावंडांप्रमाणं वागावं. आम्ही मुलं-मुली एकत्रित असतो. एकमेकांशी भावंडं या नात्यानं वर्गात वागत असतो. आजी प्रत्येक बारीक गोष्टींचा विचार करायच्या व चांगल्या गोष्टी पटकन ओळखायच्या. मला त्यांचा हा स्वभाव फार फार आवडायचा.

नंतर मी पुढच्या वर्गात गेलो आणि आम्हाला सर्व विषयांसाठी एक शिक्षिका मिळाली. ती म्हणजे आशाताई रुद्रभटे. ह्यांचे तर माझ्यावर सर्वांपेक्षा अधिक उपकार आहेत. कारण ह्यांनीच माझ्या अंगातला एक गुण प्रकाशात आणला. तो म्हणजे काव्यगुण!

काव्यगुण हा माझ्या जीवनाचा एक भाग होता आणि राहणार आहे. माझा एक हात मी कविता करण्याकरता ठेवलेला आहे. पुढे मी मोठा माणूस होवो अथवा न होवो, माझ्यातला हा गुण जाणणं म्हणजे एक प्रकारे शोध लावणं. हा शोध आशाताईंनी लावला. त्यांचं शिकवणं आमच्या नीट डोक्यात शिरायचं.

आता मला सारं काही मिळालं होतं. जेव्हा आज मला ती पहिली शाळा आठवते तेव्हा मला खूप वाईट वाटतं. कारण आज माझ्यापेक्षाही खूप चांगले विद्यार्थी तशा शाळांच्या भिंतीत बंद आहेत आणि कितीतरी मुलं तशा शाळांतून रिमांड होममध्ये जाताहेत आणि नाही नाही ते करत बसताहेत आणि स्वतःचं आयुष्य आपल्याच हातानं संपवताहेत. पण जी स्थिती माझी झाली होती ती अन्य कोणाची होऊ नये.





# चंडोल

**वसीम मणेर (इयत्ता ९ वी)**


त्या दिवशी मी विंचुर्णीच्या माळावर काळ्या पोटाच्या चंडोलाचे (Black bellied finch lark) घरटे शोधत होतो. गेल्याच वर्षी म्हातारबाबांनी मला सांगितले होते की माळचिमण्या याच सुमारास घरटी बांधतात.

मी निसर्गमंडळाचा सदस्य असल्याने घरटी शोधण्याची दृष्टी लाभली होती. घरटी शोधायची नसतात. त्यांचे बिल्डर शोधायचे असतात. म्हणजे घरटे सापडते. कारण आई-बाबा चिमुकल्यांसाठी चारा घेऊन येत असतात.

अचानक एक चंडोल तोंडात लाल पायाच्या नाकतोड्यास घेऊन माझ्या शेजारच्या दगडावर येऊन विसावला. बहुधा त्याला नाकतोडा पकडताना खूप श्रम पडले असावेत. तो किडा घेऊन आलाय म्हणजे जवळपास कुठेतरी त्याचे घरटे नक्कीच असणार हे मी हेरले.

त्याच्याकडे बघता बघता मला एकदम तो दिवस आठवला. त्या वेळी आमचे निसर्गमंडळ वगैरे काही नव्हते. मी रॉकेल आणायला उपळव्याला गेलो होतो. उपळवे फलटणच्या दक्षिणेकडील महादेव डोंगर-रांगांच्या पायथ्याशी आहे.

मी उशिरा आल्यामुळे माझी बस चुकली. मी गाव सोडून पुढे आलो. तेथे एक चौक होता. आजूबाजूला जिरायती शेती होती. पाण्याअभावी पिके घोट्याएवढीच वाढलेली होती. बाकी सर्वत्र तुरळक गवत होते. मी तेथे बसलो. अचानक एक चंडोल तोंडात किडा घेऊन शेजारच्या दगडावर बसला. मला काही काम नसल्यामुळे मी शांतपणे त्याचे निरीक्षण करत



बसलो. त्याने इकडेतिकडे शत्रूची चाहूल घेतली आणि तो गवतात शिरला. तेथे त्याची दोन पिले सुखावली होती. तो जवळ जाताच पिले अधाशासारखी तोंड उघडून घास घेण्याचा प्रयत्न करू लागली. तेव्हा मला पुस्तकातले वाक्य आठवले. पुस्तकात लिहिले होते की आई-बाप आल्यावर पिले गोंधळ करतात. पण येथे पिले कसलाच आवाज करत नव्हती. ही गोष्ट मला विलक्षण वाटली. नर पिलांना घास देऊन दूर उडाला. आपल्या आगळ्यावेगळ्या शैलीने आणि मनाला हुरहुर लावणारी शीळ घालीत निघून गेला.


मी घरट्याजवळ गेलो. दोन मातकट रंगाची पिले आत पडून होती. मी त्यांच्या घरट्यास हात लावला. पण पिले शांत पडून होती. मला पुन्हा गंमत वाटली कारण मी वाचले होते की घरट्यास हात लावल्यावर पिले ओरडतात म्हणून. मला एक गंमत सुचली. मी लगेच कामाला लागलो. सगळे दगड उलटवले तेव्हा एक विंचू सापडला. काड्यांच्या साहाय्याने विष पिशवी तोडली अणि त्याला घरट्याजवळ आणून ठेवले आणि पुन्हा दूर जाऊन बसलो. थोड्या वेळाने चंडोल आला व पिले उतावळी झाली. त्याचबरोबर तो विंचूही आपली विष पिशवी नसलेली शेपूट वर खाली करू लागला. चंडोलाने इतक्या पटकन घास पिलांच्या तोंडी टाकला व विंचूही दूर फेकला की मला क्षणभर काहीच दिसले नाही. चंडोल थोडा विसावला आणि उडाला. मी पाहिले बिचारा विंचू मेला होता.

मी फडफडण्याच्या आवाजाने भानावर आलो. चंडोल थोडी विश्रांती घेऊन नाकतोडा घेऊन उडाला होता. थोड्याच अंतरावर त्याचे घरटे होते.

मी आता सॅक सावरली. आता घरी जायचे होते. घरटे तर सापडले होते. उद्यापासून घरट्याचा शास्त्रीय अभ्यास करायचा होता. मी घरी परतलो ते एक अनामिक आनंद घेऊन.



# लांडग्याच्या शोधात



**धनंजय निंबाळकर (इयत्ता ९ वी)**

माझं गाव विंचुर्णी. फलटणच्या दक्षिणेला असलेलं एक लहानसं गाव. गावात रामोशी जमात फार पूर्वीपासून राहते. रामोशी लोक हाडाचे शिकारी.

आमच्या मळ्यात एक आप्पा रामोशी राहतो. आप्पाने होल्यापासून हरणापर्यंत शिकारी केलेल्या आहेत. पशुपक्ष्यांबद्दल त्याला बरीच माहिती आहे. एखादा ससा कुठे घावेल ते तो बरोबर सांगू शकतो. एखादा स्थलांतरित पक्षी केव्हा येईल व केव्हा माघारी जाईल हेही त्याला माहीत असते. फक्त त्या पक्ष्यांची ग्रामीण नावे त्याला सांगावी लागतात. मीही त्याच्याबरोबर घोरपडी, ससे, तितर मारलेत. पण माझ्या शाळेत निसर्गमंडळ सुरू झाल्यापासून मी ते सर्व सोडलं. पण तो काही ऐकत नाही.

एकदा मी त्याच्याबरोबर बैल बांधायला चाललो होतो. तो सांगत होता की माझे आजोबा आपला घोडा आणि चारपाच कुत्री घेऊन शिकारीला जात. आपल्याकडे असलेलं हरणी नावाचं हरीण त्यांनी आधीच कुरणात बांधून ठेवलेलं असायचं.

गप्पा मारीत जाता जाता माझ्या पायाला काहीतरी ओलसर लागलं. खाली पाहतो तर अर्धवट खाल्लेलं कोकरू. आप्पानं ते कोकरू उचललं व मला म्हणाला, 'धनू, सांच्याला या जेवाय.' मी म्हणालो, 'लांडग्याचं उष्ट दिसतंय.' तो म्हणाला, 'त्याला काय मरतय?' मी म्हटलं, 'इथं लांडगी आहेत का?' दूरवर एक काटेरी वन दाखवीत तो म्हणाला, 'गेल्या म्हयन्यात मी न् न्हानबानं तिथं एक लांडगी आन् तिची पिली पाह्यली होती.' आम्ही चांगलं गवत बघून बैलं बांधली आणि घरी आलो.

आल्यावर मी माझ्या निसर्गमित्रांना ही बातमी सांगितली. ते खूष झाले. लांडगी आणि पिले बघायला आम्ही चौघा-पाच जणांनी जायचं ठरवलं. दुपारी दोन वाजता मळ्यात पोचलो. सायकली ठेवता-ठेवताच गुलाबी मैनांचा (Rosy pastor) एक थवा दिसला. जेवणे करून आम्ही निघालो. वाटेत कावळीची जाळी लागली. आत मधमाश्यांची पोळी होती. काही ठिकाणी आत शिरताही येत नव्हतं इतकं गचपण होतं. तेव्हा त्या जाळीच्या वाटे न लागता पुढे निघालो.

कोर्सर, तीतर, बटेर, चंडोल असे असंख्य माळपक्षी दर्शन देऊन गेले. विविध रंगांची फुलपाखरे इकडून तिकडे उडत होती.

आम्ही मळा सोडून माळावर आलो. गवत चांगलं चार फूट उंच वाढलं होतं. वर एक पाझर तलाव होता. पाणी थोडंसंच होतं. पण चार व्हाईट नेक्ड स्टॉर्क्स दिसले. आम्हाला पाहून ते इतके वर उडाले की आकाशात ठिपक्यांसारखे दिसले. पुढे सामाजिक वनीकरणाची झाडे वाळून चालली होती. माळ संपून आम्ही पुन्हा उतरायला लागलो होतो.

डोंगर रांग अगदी जवळ आल्यासारखी वाटत होती. पुन्हा एक कोरडा तलाव लागला. तलावाच्या भिंतीत एक बीळ दिसलं. बिळासमोरच्या मोकळ्या मातीत नख्या उमटल्या होत्या. बहुधा घोरपडीचं असावं. समोर काटेरी वन दिसायला लागलं होतं. आम्ही जरा थबकलो. पायांवर हजारो बाण मारावेत अशी कुसळं टोचली होती. समोरच एक मेलेली मण्यार दिसली. आम्ही न बोलता एकदम शांत झालो होतो. जवळच्या गवतातून एक चंडोल फर्रकन् उडाला. सगळेच दचकले. वनाच्या तोंडाशीच ताजी विष्ठा सापडली. पण त्यात केस नव्हते. होत्या बोराच्या बिया. तेव्हा विष्ठा बहुधा खोकडाची किंवा कोल्ह्याची असावी.

वेड्या बाभळीच्या त्या वनात शिरताना भीती वाटत होती. पण तसेच शिरलो. खाली मोठाली बिळे होती. पण लांडग्यांचा कुठे मागमूसही नव्हता. आम्ही वनाला वेढा घालून परत बाहेर निघालो. तो एक बैलगाडीवाला भेटला. त्याला लांडग्यांबद्दल विचारल्यावर तो म्हणाला लांडगे त्या तिथं पुढच्या काटाड्यात असतील. आमची जागा चुकली होती. पण संध्याकाळ झाली होती. पाच तास चालून पायही बोलायला लागले होते. म्हणून मुकाट्यानं परतीची वाट धरली.

काहीच दिसले नाही असे म्हणत खूप काही दिसले होते. निसर्गात एखादे ठरावीक उद्दिष्ट ठेवून जायचे नसते. कारण मग आपले लक्ष त्याच उद्दिष्टाकडे राहते. इतर गोष्टी खूप असतात. मात्र त्यांना पाहण्यासाठी आपल्याला ती दृष्टी लागते. घडणाऱ्या घटना काहीतरी बोलत असतात. त्या ऐकण्यासाठी कान लागतात. परतीच्या वाटेवर गवत चांगलं उंच वाढलं होतं. मात्र त्या गवताला खाणाऱ्या हरणांची जागा मात्र शेळ्यांनी घेतली होती.

जर त्या शेळ्यांच्या जागी हरणं असती तर आज ही निसर्गमंडळं स्थापन करण्याची काही जरूरच नसती.


# अविस्मरणीय प्रसंग

**ताहिर मणेर (इ. ७ वी)**

उन्हाळ्याचे दिवस होते. मे चा महिना होता. बाहेर रणरणते ऊन होते. शाळा नसल्याने घरी बसून खूप कंटाळा यायचा. कंटाळा घालवण्यासाठी आम्ही विंचुर्णीला जायचो. एकदा सुधीरकाका कोठेतरी गावाला गेला होता. आता सुधीरकाका नसल्याने आमचे विंचुर्णीला जाणे बंद पडले. आम्ही पाच-सहा दिवस विंचुर्णीला गेलो नाही. पण दोन दिवसांनंतर सुधीरकाका येणार हे आम्हाला कळल्यानंतर आम्ही मित्रमंडळींनी विचार केला की सुधीरकाकाला खूष करण्यासाठी आपण त्यांचे घर साफ करूया. झाले, आणि आम्ही विंचुर्णीची वाट धरली.

आम्ही दुपारी जात असल्याने माळावरती एकही चिटपाखरू दिसले नाही. सुधीरकाकाच्या घरी जाऊन आम्ही घर साफ करण्यास लागलो. एक दोन तास खपल्यानंतर एकदाचे घर साफ झाले. सगळ्यांच्या पाठी दुखू लागल्या. आम्ही बरोबर नेलेली बिस्किटे खाल्ली व जरा तलाव बघण्यासाठी सुधीरकाकाच्या घरापाठीमागे गेलो तर तलावाचे पाणी आटले होते व बेट वरती आले होते. बेटावर जावे असे सर्वांना वाटले. आम्ही राहिलेली बिस्किटे खिशात भरली व बेटावर निघालो.

आम्ही बेटावर जाताना अचानक दोन टिटव्या उडाल्या व खूप गोंधळ घालू लागल्या. आम्ही खाली बघितले तर टिटवीची पिल्ले होती ती. पण वरती त्या दोन टिटव्यांचा असा कालवा चालला होता की लग्नाचा गोंधळ लाऊड स्पीकरवर लावला तरी कमीच वाटेल.



आम्ही बेटावर गेलो तर दोन बदके आमच्या पायापासून उडाली. आम्ही खाली पाहतो तर कढईसारखा उथळ खोल खड्डा व त्यात सात अंडी होती. घरट्याच्या कडेने बदकांची पिसे होती. म्हणजे बदकाचे घरटेही होते तर तिथे. आम्ही परत येऊन सायकली घेऊन घरची वाट धरली. विमानतळावरून आम्ही जात होतो. खूप माणसे विमानतळावर फिरायला आली होती. काही माणसे गाडी शिकत होती. इतक्यात आमच्या पुढून एक इंडियन कोर्सर पळाला व त्याच्यामागे तीन लहान दगड पळाले. आम्ही सायकली स्टँडला लावून पाहू लागलो तर आम्हाला कळले की ते तीन दगड नसून ती त्यांची पिल्ले होती. तो इंडियन कोर्सर कीटक पकडून आपल्या पिल्लांना भरवत होता. आम्ही जवळ जवळ १५-२० मिनिटे हेच पाहत होतो. अचानक सगळे शांत वाटले. आम्ही वर पाहिले तर धुळीचे वादळ येत होते.

आम्ही तोंडे फिरवली पण वादळ इतक्या जोरात होते की आमच्या सायकली पडल्या व आम्हाला वादळ पुढे ढकलू लागले. आम्हाला कोर्सरची चिंता वाटत होती. सायकली पडल्या, आम्ही पुढे ढकलले जातोय तर कोर्सर व त्याच्या पिल्लांचे काय झाले असेल? पायाला वाऱ्याने आलेले खडे इतके टोचत होते की आपले पाय मुंगळे असलेल्या पातेल्यात ठेवले आहेत असे वाटत होते.

पाच-दहा मिनिटांनी वादळ संपले तेव्हा आम्ही पाहिले की तो कोर्सर आपल्या पिल्लांना भरवत होता. ते पाहून आम्हाला खूप बरे वाटले. मग वाटले जंगलात पक्ष्यांना झाडांचा तरी थारा असतो पण माळावरच्या पक्ष्यांना कशाचा थारा असतो? या असल्या वावटळीत ते स्वतःचा बचाव कसा करत असतील हे कोडेच आहे. एखाद्या दगडाआड किंवा ओंजळभर खड्ड्यात जमिनीसरशी चिकटून बसून बहुतेक. म्हणूनच मी माळावरचे पक्षी म्हणजे श्रेष्ठ पक्षी असे मानतो.

# ऊन

**सबीना मणेर (इयत्ता ८ वी)**

फटफटायला लागले होते. माणसांची ये-जा सुरू झाली होती. शेतकऱ्यांना शेतात जायची घाई झाली होती. तर बायकांना काम उरकायची. मुलांचे रडणे चालू होते. अशातच उजाडले. शेतकरी गरम गरम भाकरीचा मेवा खाऊन तृप्त होऊन शेताकडे जाऊ लागले.

हळू हळू सूर्य वर येऊ लागला. काही मुले पाटी दप्तर घेऊन शाळेत जाऊ लागली. काहींच्या मनात अजिबात शाळेत जायचे नव्हते. पण पाठीत रट्टे पडताच ती डोळे पुसत पुसत शाळेला पळत होती. काही नुसतीच फिरत होती. बायकांची नुसती घाई चालली होती. उकाडा मी म्हणत होता. तरी बाया घाम पुसत पुसत आपली कामे आवरत होत्या.

काही मुले शाळेत जातो म्हणून बाहेर पडत होती आणि खेळत बसत होती. काही मुले गोट्यांचा डाव मांडून खेळत होती. त्यातच त्यांची भांडणे होत होती. मारामाऱ्या होत होत्या, शिवीगाळ होत होती आणि परत एकत्र खेळ सुरू होत होता. ती मुले खेळात इतकी मग्न होती की त्यांना आपण खोटे बोलून येथे खेळत बसलो आहोत आणि आपली शाळा बुडाली आहे याचे भानच राहिले नव्हते. जसजसा सूर्य डोक्यावर येऊ लागला तसतसे जास्तच उकडू लागले. शेवटी मध्यान्ह झाली. बायका फडक्यात भाकऱ्या बांधून घेऊन शेतावर जाऊ लागल्या. शेतकऱ्यांनी आपली कामे थांबवली आणि ते जेवायला बसू लागले. सर्वांनी योग्य जागा निवडल्या व ते बोलत बोलत जेवू लागले.

मुले शाळेतून परत आली. कसेतरी खाऊन खेळायला जाऊ लागली. मेंढरागत इकडेतिकडे फिरू लागली. काही मुले झाडावरच्या मधमाश्यांच्या पोळ्याला दगडे मारत होती. एकदा का मधमाश्यांचा घोळका उठला की आपली चड्डी सावरत ओरडत ओरडत पळत होती. काहींना माश्या चावत होत्या आणि त्या मुलांची तोंडे हत्तीसारखी सुजत होती.

बाहेर सूर्य तळपत असल्याने रस्त्यावर एक चिटपाखरूही दिसत नव्हते. सूर्य नुसता आगीच्या ज्वाळा ओतत होता. पूर्ण गावच भकास, शांत, अबोल भासत होते.

चावडीतील रिकामटेकडी माणसे निवांत गोष्टी करत बसली होती. काही माणसे नुसती ऐकत होती आणि ऐकता ऐकता पेंगत होती. पेंगताना एकदम त्यांचा तोल जायचा आणि ती कोलमडायची. दचकून जागी होऊन परत नीट बसायची. एक-दोन मिनिटे गेली की परत पेंगायला लागायची. काही वेळाने झोपून जायची. एखाद्या भट्टीत पाव भाजावा तसे चावडीतल्या माणसांचे व घरातल्या बायकांचे अंग भाजून निघत होते.

जेवणे संपली तरी शेतातली माणसे ऊन लागू नये म्हणून झाडाखाली बसली होती. काही गाढ झोपी गेली होती. काही आपली चंची सोडून पान-तंबाखू खात बोलत बसली होती.

उन्हाने लोकांना बेजार करून टाकले होते. ओढे, नाले यांच्यातले पाणीसुद्धा उकळलेल्या गरम पाण्यासारखे गरम झाले होते. काजवे चमकल्यासारखी मुलांची चपचपीत तेल लावलेली डोकी चमकत होती. डब्यातले तूप वितळून त्याचे ओघळ यावे त्याप्रमाणे मुलांच्या डोक्यावरचे तेलाचे ओघळ गालावर वाहून येत होते. त्यामुळे त्यांचे चेहरे तेलकट घामेजलेले दिसत होते. शर्ट पाण्यात भिजल्याप्रमाणे घामाने भिजले होते. मुलांना वाटत होते ओढ्यात जाऊन मनसोक्त डुंबावे म्हणजे इतके उकडणार नाही. मुले शर्ट काढून उघड्या अंगाने झेप घेत होती. पण ओढ्याचे पाणीही गरम झाल्याने मुलांना ते भाजत होते. बेडकाने पाणी दिसताच टुण्कन उडी मारावी तशी मुले उड्या मारत होती आणि कपडे घालून परत खेळायला जात होती.

हळू हळू सूर्य खाली येऊ लागला आणि मावळू लागला. लोकांना वाटत होते की कधी हा दिवस मावळतोय आणि कधी वारा सुटतोय. दिवस बराच खाली आला. तसे शेतकरी शेतातून परत येऊ लागले. मेंढरागत मुले ओरडत ओरडत आपल्या घरी येऊ लागली. गायी-बैल, शेळ्या-मेंढ्या ही जनावरेही आपल्या गोठ्यात येऊन निवांतपणे रवंथ करत बसली. दिवस मावळला. गावात पुन्हा किलबिलाट सुरू झाला आणि दुपारचे भकास वाटणारे गाव आता गजबजून गेले. सर्वत्र अंधार पसरला आणि मंद शीतल असा वारा सुरू झाला.

# शाळा

**प्रशांत वायसे (इयत्ता ८ वी)**

तांबडं फुटलंच नाही कारण आकाशात काळ्या ढगांचं वास्तव्य अजूनही होतंच. काल रात्रीपासून ते अजूनपर्यंत व अजून काही काळ राहणार होतं. रात्री पाऊस चांगलाच पडला होता आणि म्हणूनच रस्त्यानी जाणारी शाळकरी मुलं आपला गणवेश खराब होऊ नये म्हणून नीट जात होती. पण तरीही त्यांचे प्रयत्न निष्फळच ठरत होते.

शांत असणारी शाळा या पाखरांच्या किलबिलाटाने हळू हळू एखाद्या अशांत मुलासारखी बनू लागली होती. मुलं मित्रांशी गप्पा मारण्यात अगदी दंग झाली होती. राहिलेला गृहपाठ पूर्ण करत काही मुलं आपापल्या वर्गातच बसली होती. मध्येच एखाद-दुसरा दांडगा मुलगा येई व काही चित्रविचित्र प्रकारानं त्यांचं लक्ष वेधून घेई. मग मात्र चिडाचिडी, आरडाओरडा आणि यातून भांडणं निर्माण होत व एका वर्गातच दोन गट पडत असत.

यातच घंटा झाली. मुलं प्रार्थना हॉलमध्ये जात होती. आत जाऊन उभी राहून किंवा रांगेत ओळीत बसून जोरजोरात गप्पा मारत होती. शिक्षकांचं सावधान विश्राम चालू होतं पण मुलांचं लक्ष गप्पा मारण्यातच. त्या प्रार्थना हॉलला रोजच्यासारखंच आजही एखाद्या बाजाराचं स्वरूप आलं होतं. शेवटी ज्याप्रमाणे पोलिसांना अश्रुधुराचा उपयोग करून दंगल शांत करावी लागते त्याप्रमाणे शिक्षकांना मध्येच एखाद्या मुलाला उभं करून तो गोंधळ थांबवावा लागे. आजही तसंच झालं आणि मग मात्र मुलांचा गोंधळ थांबला. प्रार्थना सुरू झाली व संपली. बातम्याही संपल्या. शाळेचा गणवेश न घातलेल्या मुलांना मात्र शिक्षकांनी आज घरी पाठवायचं रद्द केलं कारण नुकतीच पावसाला सुरुवात झाली होती.

सरांनी पटकन वर्गात जायला सांगितलं पण तरीही मुलं थोडीफार भिजलीच. मुलं वर्गात येत होती तोपर्यंतच एखादा रेकॉर्ड केलेला टेप पुन्हा ऐकावा त्याप्रमाणे आशाबाईंचा रेकॉर्ड टेप सुरू झाला. ''मुलांनो, चपला बाहेर काढा. नाहीतर मी चपला फेकून देईन.'' ज्यांनी चपला काढल्या नव्हत्या ते निमूटपणे बाहेर चपला काढून जागेवर येऊन बसले. होमरूमचा तास सुरू झाला. वर्गशिक्षक वर्गात आले. हजेरी घेतली. मग गप्पाटप्पा करण्यातच तास संपला आणि मग रोजच्याप्रमाणे अभ्यासाचे तास सुरू झाले.

टण् घंटा वाजली की एक सर बाहेर जाऊन दुसऱ्या वर्गात जात व दुसऱ्या बाई वर्गात येत होत्या.

टण् टण् टण्... घंटा झाली. मुलांनी दप्तरे आवरली. पटकन डबे घेतले. पाऊस उघडला होता. पण त्यामुळे तयार झालेल्या चिखलात स्वतःला सावरत एखाद्या पिंजऱ्यातून पक्ष्यांचा थवा जसा एकदम बाहेर यायला धडपडतो त्याप्रमाणे मुले दरवाजातून बाहेर यायला धडपडत होती. हात धुतले. काहींचे डबे येणार होते. ती मुले बाहेर उभी होती. मग हळू हळू ती सर्व जेवणाच्या हॉलमध्ये जमू लागली. पुन्हा पाखरांच्या किलबिलाटासारखा चिवचिवाट सुरू झाला. शेवटी सरांनी शांत केल्यावर मुलांनी प्रार्थना म्हणून डबे उघडले व जेवणास सुरुवात केली.

मिनिटात डबे खाऊन मुलं मैदानावर हजर! डबा खातात की नाही कोण जाणे? मग सर्व शाळा मुलांच्या खेळण्यातील धावपळीमुळे गजबजलेली दिसू लागली.

सर पेपर वाचण्यात मग्न झाले होते. पारावरती दहावीच्या मुली, पाईपवर दहावीची मुले, मैदानावर खेळणारी छोटी-मोठी मुले-मुली.

टण् टण् टण् टण्... पुन्हा घंटा व मुले घोळक्याने वर्गात शिरू लागली. पुन्हा तास सुरू झाले. सरांची ये-जा पुन्हा चालू झाली.


शेवटच्या तासाला मात्र पूर्ण शाळा टीव्ही हॉलमध्ये जमली कारण आज ६ ऑगस्ट होता. याच दिवशी बरोबर ५३ वर्षांपूर्वी अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉंब टाकले होते.

मुंबईचे होमी भाभा सायन्स सेंटरचे एक वैज्ञानिक श्री गंभीर सर यांनी या विषयीची माहिती बरीच रंगवून सांगितली. अणुबॉंबचे फायदे-तोटे, उपयोग, दुरुपयोगही सांगितले. ते विचार मुलांवर इतके प्रभाव पाडून गेले की शाळा सुटल्यावर प्रत्येकाच्या तोंडी अणुबॉंब, अणुबॉंब आणि फक्त अणुबॉंबच!

# स्वत:चा इतिहास

**धीरज चव्हाण (इयत्ता ८ वी)**

माझा जन्म २४ ऑक्टोबर १९८५ साली पोळ दवाखान्यात झाला. धीरज हे नाव मला माझ्या मामाने दिले. लाडाने तो मला पिंटू असे म्हणतो.



१९८७ मध्ये माझी आई कमला निंबकर बालभवन या शाळेत शिपाई म्हणून कामाला लागली. तेव्हा मी दोन वर्षांचा होतो. मी आजी, आजोबा, मामा यांच्या सहवासात वाढलो. मामा माझे खूप लाड करायचा. मी जेव्हा बोलायला लागलो तेव्हा पहिल्यांदा 'मामा' हा शब्द उच्चारला.

अडीच वर्षांचा झालो तेव्हा आई मला शाळेत घेऊन जायची. मी एका वर्षात दोन वर्ग केले. मी बालवाडीला होतो तेव्हा मला बाराखडी व १ ते ५० अंक म्हणायला येत होते म्हणून दमूताईंनी प्रथम सत्र झाल्यानंतर मला मधल्या गटात घातले. सगळेजण आईला आशाबाई म्हणायचे म्हणून मी पण आईला 'आशा' याच नावाने हाका मारायचो. आईने मला एकदा खूप मारले तेव्हापासून मी तिला आई म्हणू लागलो.

मला मोठ्या मुलांमध्ये अभ्यास करायला खूप आवडायचे. पण आई मला मुलांच्यात जाऊ द्यायची नाही व हट्टीपणा केला तर पट्टीने मारायची. मला लहानपणी गव्हाची खीर खूप आवडायची. एकदा आजीने मला खीर दिली नव्हती म्हणून मी घरातील चहाचे कप फोडले होते.

आई व वडिलांची खूप भांडणे व्हायची तेव्हा मी पळत जाऊन आजोबांना बोलवायचो. मग भांडणे सुटायची. एकदा मला खूप राग आला होता म्हणून मी दोघांना कोंडून ठेवले होते.

एकेरीवाडी हे माझ्या आजोबांचे गाव. तेथे मी दरवर्षी जातो. शेतातील कामे करतो. एकदा शेतातील मका कापताना माझ्या हाताला विळा लागला होता. मी दररोज म्हशींना चारा टाकायचो. त्यांना पाटातील पाण्याने अंघोळ घालायचो. मी सातवीत असताना पोहायला शिकलो. पोहायला शिकताना मी तीन वेळा बुडलो होतो. मला दर महिन्याचे सामान आणण्यासाठी मलठणमध्ये चालत जावे लागे. म्हणून आईने मला सायकल घेऊन दिली. दुसऱ्यांच्या घरी दूरदर्शनवरील कार्यक्रम बघायला जायचो, रात्री उशिरा घरी यायचो म्हणून तिने दूरदर्शन संच घेतला. माझे एवढे लाड होतात कारण मी एकटा आहे. मला एक मोठा भाऊ होता पण तो जन्मल्यानंतर दोन तासांनी देवाघरी गेला. मला भाऊ-बहीण असायला पाहिजे होती.

फुटबॉल हा माझा आवडता खेळ आहे. मी आमच्या वर्गाबरोबर साखरवाडीला फुटबॉलची मॅच खेळण्यासाठी गेलो होतो. मी मोठा झाल्यावर सैनिकांमध्ये भरती होणार कारण मला आपल्या देशासाठी काहीतरी काम करायचे आहे.

माझा विरंगुळा म्हणजे आजीचे घर. तेथे मला खूप मित्र आहेत. तेथे गेल्यावर मला खूप आनंद मिळतो. तेथील मुलेदेखील मला पिंट्या या नावानेच बोलवतात. माझे पुढचे दोन दात पुढे आहेत म्हणून ती मुले कधी कधी मला तात्याविंचू, फड्या अशा नावाने चिडवतात. मी त्यांना काहीही बोलत नाही. मोठे दात हीदेखील निसर्गाचीच देणगी आहे. आम्हा मुलांना गोट्या खेळायला खूप आवडतात. या शिवाय क्रिकेट, भोवरे इ. खेळही आम्ही खेळतो.


मला निसर्गात फिरायला खूप आवडते. मी दरवर्षी धुमाळवाडीला धबधबा, तेथील परिसर बघण्यासाठी जातो. बोरे खातो, धबधब्याच्या पाण्यात पोहतो. निसर्गाची आवड असल्याने मी 'डब्ल्यू डब्ल्यू एफ' या निसर्गमंडळात भाग घेतला आहे.

निसर्गमंडळात प्राणी-पक्षी यांबद्दल चर्चा होते. मी खूप झाडे लावलेली आहेत. मी आणि माझे मित्र मिळून त्यांना पाणी घालतो.

या शाळेने मला खूप काही दिले. आजच्या माझ्या यशात मॅक्सीनआजी, मंजूताई, शिक्षक आणि माझे मित्र यांचा फार मोठा वाटा आहे. म्हणून मी सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

# विक्सची गोळी

**ओंकार शिरोळकर** (इयत्ता ५ वी)




आज मी पाचवीत आहे. पण लहानपणी आपल्याला काहीच कळत नसते. असाच मी लहान होतो. आईस्क्रीम भरपूर खाल्लेलं व त्यामुळे माझा घसा दुखायला लागला. जेमतेम दोन वर्षांचा होतो मी. आई रागवू लागली. आईस्क्रीमचा हट्ट कशाला करायचा? आता घे औषध. मी औषध काही घेईना. इतक्यात ताईनं मला विक्सची गोळी दिली. थांब मी फाडून देते हं असं म्हणून ती वळली. तोपर्यंत मी विक्सच्या गोळीचं कव्हर काढून गोळी तोंडातही टाकली. ताई रागवेल म्हणून तोंड गच्च दाबून धरलं नि व्हायचं तेच झालं. ती भली मोठी विक्सची गोळी माझ्या घशात अडकली नि मी घाबरलो.

ॲ-ॲ करत ओरडत रडू लागलो. ताई पण घाबरली. कालवा करून तिनं साऱ्यांना गोळा केलं. माझा दादा पळतच आला. त्यानं मला २-३ बुक्क्या मानेत मारल्या पण मला जास्तच वेदना होऊ लागल्या. शेवटी तसेच डॉक्टरांकडे पळवले. डॉक्टरांकडे दुसरा पेशंट होताच पण दादा थेट डॉक्टरांकडे जाऊन म्हणाला गडबडीची केस आहे लवकर घ्या. लहान मूल आहे. पण डॉक्टर ऐकेनात. त्यांनी नंबरवर बसविण्यास सांगितलं. दादा चिडला. जवळ जवळ डॉक्टरांच्या अंगावर धावूनच गेला. तोपर्यंत मध्येच माझ्या घशात अडकलेली विक्सची गोळी कधी पोटात गेली कळलेच नाही. मी ओरडून सांगू लागलो, "मी ठीक आहे. गोळी पोटात गेली. गोळी पोटात गेली." पण कोणीच लक्ष देईना. सगळे भांडणात गुंतून गेले. मी हळूच काढता पाय घेतला. दवाखान्यातून बाहेर पडलो आणि पुन्हा मला शोधायला सर्वांची पळापळ सुरू झाली.



# माझं आवडतं गाव

**प्रियांका शास्त्री** (इयत्ता ९ वी)

माझ्या आवडत्या गावाचं नाव बार्शी. हे गाव, तिथली माणसं मला अत्यंत आवडतात. हे गाव म्हणजे माझ्या आईचं माहेर, माझं आजोळ!

दर वेळी मला जेव्हा दिवाळी व उन्हाळ्याची सुट्टी मिळते, तेव्हा मी तिथे जातेच. तिथे भगवंत देवळाशेजारी आमचा एक मोठा वाडा आहे. तिथे माझे आजी, आजोबा, मामा, मामी, सर्वजण एकत्र राहतात. वाडा तसा बराच मोठा आहे. त्यामुळे माझ्या भावंडांबरोबर लपाछपी खेळण्यास भारी मजा येते. या गावापासून थोडंसं लांब माणकेश्वर हे एक गाव आहे. तिथं माझ्या आईचं व तिच्या बहिणींचं बालपण गेलं. माझी आई जिथं रहायची ते सगळं पडलं आहे. तिथं दुसरं घर बांधलं आहे. माणकेश्वरला माझ्या चुलत आजोबांचा वाडा आहे. तो तर फारच मोठा आहे. त्यांच्याकडे गाई-म्हशी खूप आहेत. त्यामुळे तिथं गेल्यावर आजोबांची भेट घ्यायची सोडून आम्ही आधी गुरांकडेच पळतो. त्यांना खायला, प्यायला घालायची जबाबदारी तिथं गेल्यावर आमचीच!

माझ्या आईला तीन बहिणी आहेत. आई व मावश्या फोनवर ठरवूनच बार्शीला एकत्र जमतात. आम्ही तिथे उन्हाळ्याच्या सुट्टीत आजोबांकडे खूप आंबे खातो. तसंच सर्व भावंडं मिळून दुपारी दंगा करून आयांना झोपू देत नाही. म्हणा मार मिळाल्यावर गप्प तर बसावंच लागतं! दुपारभर नुसता वाडाभर धिंगाणा घालतो.

माझे आजी, आजोबा, माझे खूप लाड करतात. विशेषतः आजी. एवढं होत नाही म्हणा तिच्याच्यानं, साठीला आली हो आता. पण उत्साह काही विचारू नका. आम्ही बार्शीला गेल्यावर काय करू आणि काय नको असं होतं तिला.

त्या गावात सगळं काही छान आहे. तिथले लोक निसर्गप्रेमी आहेत. प्रत्येकाच्या अंगणात भरपूर झाडं आहेत. मला खूपदा विचार केल्यावर असं वाटतं, वाड्यात राहण्याचं सुख काही वेगळंच. आपल्या भाऊ-बहिणींबरोबर राहिलं तर फारच मजा. पण नाइलाज असतो. काय त्या फ्लॅटमध्ये राहायचं?

मला अगदी कंटाळा आला आहे. म्हणूनच दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीत मला तिथे जायला आवडतं. झालं आता माझी आठवी तर संपून गेलीय. शिवाय नववीही संपत आली आहे. एकदा दहावीत गेलो की आपण अडकलोच समजा. आपण मग लवकर बाहेर पडत नाही. म्हणूनच याही वेळी मी बार्शीला जायचं सोडणार नाहीये.

# नवनीत २००५

# एक अविस्मरणीय सामना

**सूरज चौधरी (इयत्ता ९ वी)**

ही गोष्ट आहे मागच्या उन्हाळ्याच्या सुट्टीतील. उन्हाळ्याची सुट्टी म्हणजे एकतर सगळीकडे गरमी, ऊन. पण आमच्यासारख्या गरम रक्ताची व क्रिकेट ज्वर चढलेली मुले भरदिवसा उन्हातान्हात क्रिकेट खेळत बसतात. तसेच अनेक क्रिकेटच्या मॅचेसही असतात. यातील प्रत्येक मॅचमध्ये आम्हा मुलांच्या दृष्टीने आमचा संघ भारत विरुद्ध पाकिस्तान आहे. आपण हरलो तर आपल्या संघाची लाज धुळीस मिळणार.


आम्हाला नुकतीच सुट्टी लागलेली आणि आम्ही वर्गातील सर्व मुले दुपारच्या रखरखत्या उन्हात न्हाऊन तप्त झालेल्या मैदानावर (आमच्या गावातील विमानतळावर) क्रिकेट खेळत होतो. अचानक थोडासा पावसाचा शिंतोडा पडावा तसे आमच्या घामाचे शिंतोडे पडत होते. परीक्षेच्या, अभ्यासाच्या कचाट्यातून सुटून आल्यावर आम्हाला १०-२० वर्षे पाकिस्तानी जेलमध्ये राहिल्यानंतर सुटून आल्यासारखे वाटत होते. आम्ही खेळत असताना दुसऱ्या शाळेच्या मुलांचा संघ मैदानावर आला आणि त्यांनी आमच्यासमोर मॅचचा प्रस्ताव ठेवला. आमच्यात बरीच चर्चा झाल्यानंतर आम्ही आमच्यातील निपुण अशा आठ खेळाडूंचा संघ निवडला व इतर मुले राखीव गडी कम प्रेक्षक म्हणून नियोजित बाउंडरी लाइनच्या पलीकडे बसली. आमच्या संघाचा कप्तान म्हणून माझे नाव घोषित झाले. मॅच ११ रु. ची ठरली.

अनेक शिट्ट्या, टाळ्या आणि प्रोत्साहनाच्या घोषात मी ऐटीत टॉस उडवण्यासाठी गेलो आणि क्षणातच टॉस हरल्यानंतर माझे सर्व मित्र शांत झाले. नको असतानाही आम्हाला प्रथम बॉलिंग आली आणि मी फील्डिंग लावण्यात मग्न झालो. काही क्षणांतच आमचा ओपनिंग बॉलर बॉल घेऊन थांबला. आमच्या गटात प्रोत्साहनाच्या घोषणा वादळासारख्या उठू लागल्या. त्या निर्जन मैदानावर आमचाच आवाज मधमाश्यांच्या घों घों सारखा येत होता. आमचा गोलंदाज जसा रन्अप घेत पळत येत होता तसा कालवा वाढत होता. त्याच्या हातातून बॉल सुटल्यावर क्षणभर सर्वांनी श्वास



रोखला. तो आमच्यातला सर्वात उत्तम गोलंदाज होता. पण पहिल्याच बॉलवर फोर गेला आणि पळभर आम्ही सर्व नाराज झालो. पण पुन्हा त्याला प्रोत्साहन देऊ लागलो आणि अपेक्षेप्रमाणे त्याने तिसऱ्या बॉलवर समोरच्याचा त्रिफळा उडवला आणि नंतर दुसऱ्याच बॉलवर अजून एकाला बळीचा बकरा बनवत कीपरकडे झेल द्यायला लावून आऊट केला. पण नंतरच्या काही ओव्हर्स् आमच्यासाठी निराशाजनक ठरल्या. त्यांचा स्कोअर ८ ओव्हर ६० रन एवढा झाला. मग पुढच्या ओव्हरवर आमच्यातल्या दुसऱ्या एका गोलंदाजाने सलग तीन त्रिफळे उडवून हॅट्ट्रिक तर केलीच पण विरोधी संघाला जोर का झटका धीरे से दिला. नंतर पुन्हा विकेटा घेण्यास आम्ही अपयशी ठरलो आणि १५ ओव्हरच्या अखेरीस त्यांनी १०५ रन्स् बनवल्या व आता आमची बॅटिंगची वेळ होती.

मी आमच्या टीमचा ओपनिंग बॅट्समन होतो. एखादा वीर सरदार चकचकती तलवार घेऊन रणात उतरावा तसा मी ग्राऊंडवर दाखल झालो. माझ्या सहकाऱ्याला काही टेन्शन घेऊ नको असे सांगून आलो. पण खरंतर माझ्यावरच खूप दडपण होतं. आणि तशातच मी बॅटिंगला उभा राहिलो व माझ्या समोर विरोधी संघाचा बॉलर होता. एखादा लढाऊ बैल नाकातून फुसकारा सोडत, खुरांनी मागे माती उधळत यावा तसा तो आला. सर्वजण मला प्रोत्साहन देत होते. मी तो त्याचा रनअप बघून घाबरलो होतो. क्षणभर तर मला शोएब अख्तरचीच आठवण झाली. पण मी तो वेगवान चेंडू पिटून



काढला. मात्र एकही रन काढू शकलो नाही. कोणीतरी आपल्याला गोळी मारलेली आहे पण आपण आपले शस्त्र आडवे घालून वाचल्यासारखे वाटले. नंतर मी एक रन काढून आपला बचाव केला. पण नंतर आमच्या दोन विकेट गेल्या. तरीही खेळाला आवरत मी व तिसऱ्या गड्याने ३२ धावांची भागिदारी करत आमचा स्कोअर ६ व्या ओव्हर अखेरीस ४५ पर्यंत नेला. नंतर त्याच बैलाने (म्हणजे विरोधी संघाच्या बॉलरने) हॅट्ट्रिक केली आणि आमची स्थिती ७ व्या ओव्हरच्या अखेरीस ४७ वर ५ आऊट अशी झाली. नंतर तरीही मी आणि माझ्या सहकाऱ्याने फिरकी गोलंदाजाचा चांगलाच समाचार घेतला. आता स्कोअर १२ ओव्हर अखेरीस ९५ पर्यंत नेला. पण नंतरच्या फास्ट बॉलरच्या दोन ओव्हर्समध्ये आम्ही फक्त दोनच रन केल्या आणि त्याबरोबर दोन विकेटही गमावल्या.

आता शेवटची ओव्हर होती. आम्हाला जिंकण्यासाठी ८ रन्स्ची गरज होती. हारनेवाले की इज्जत का सवाल था आणि माझ्यासमोर तोच बैल उभा होता. त्याच्या पहिल्या बॉलला मी १ रन काढली. आता आम्हाला ५ बॉल ७ रन हव्या होत्या. माझ्या सहकाऱ्याने दुसरा बॉल सोडला. आमच्या टीममधले सगळे त्याच्यावर नाराज झाले पण नंतर त्याने तिसऱ्या बॉलवर एक रन काढली. आता आम्हाला जिंकण्यासाठी ३ बॉल ६ रन्स् हव्या होत्या आणि शेवटचीच विकेट हाती. मला तर त्या बॉलची भीती वाटत होती. तशातच मी दोन बॉल सोडले. सगळे मित्र मला शिव्या देत होते. आता शेवटचा बॉल होता आणि सिक्स हवा होता. माझ्या सगळ्या मित्रांनी अपेक्षा सोडलेल्या आणि तेव्हा दुपारच्या ३-४ च्या उन्हात मी पूर्णपणे घामाघूम झालो होतो. मैदानावर वावटळ उठलेली. अशातच त्या बैलाने समोरून गोळी सारखा बॉल टाकला. पण नशिबाने तो बॉल वाईड पडला. मला अजून एक संधी मिळाली. मी मित्रांकडे बघितले. सर्वजण उत्सुक होते. सर्वजण श्वास रोखून बसलेले.

तो बॉलर पुन्हा पायाने माती उडवीत पळत आला पण यावेळेस मी त्याला धीराने सामोरे जायचे ठरवले. बॉल सुटला व बाऊन्स होऊन सरळ माझे थोबाड फोडण्यासाठी आल्यासारखा तोंडावर आला. मी माझे तोंड वाचविण्यासाठी बॅट लेगसाईडला फिरवत आडवी मारली व तो सिक्स गेला. माझा विश्वासच बसला नाही पण माझ्या तोंड वाचविण्याच्या प्रयत्नामुळे आम्ही मॅच जिंकली होती. सर्वांच्याच आनंदाला उधाण आले.

सर्वजण आनंदाने उड्या मारत होते. मला काहीच कळत नव्हते. काही जण तर शर्ट काढून हवेत उडवत नाचत होते. सर्वांनी मला खांद्यावर घेतले. त्या गोंधळात मी जोरात खांद्यावरून दगडावर पडलो आणि बेशुद्ध झालो. जेव्हा डोळे उघडले तेव्हा मी गळ्यात हात घेऊन दवाखान्याच्या कॉटवर आडवा पडलेलो होतो.

# माझे गाव

**विराज गावडे (इयत्ता ७ वी)**


जेथे तेथे नावाबरोबर विचारले जाते, ते म्हणजे गाव. ''तुमचे नाव काय? तुमचे गाव कोणते?'' जेथे तेथे हा प्रश्न केला जातो. अगदी नोकरी लागायच्या आधी इंटरव्ह्यू वेळीही हे प्रश्न केले जातात. मला जेव्हा कोणी हे प्रश्न करतो तेव्हा ज्या अभिमानाने मी माझे नाव सांगतो तेवढ्याच अभिमानाने मी माझे गाव पवारवाडी असे सांगतो. जरी ते खेडे असले तरी मी गावाचे नाव सांगताना कमीपणा वाटून घेत नाही.''

माझे गाव सातारा जिल्ह्यात फलटण तालुक्यात आहे. या गावात शेती केली जाते. पवारवाडीच्या चारही बाजू हिरव्या रानाने वेढलेल्या आहेत.

माझ्याही घरी शेती केली जाते. ऊस, ज्वारी, बाजरी, मका, वांगी अशी नाना प्रकारची पिके घेतली जातात. तेथे ठिबक सिंचन, तुषार सिंचन यांच्या आधारावर शेती होते. तुषार सिंचनाद्वारे कमी पाण्याचा चांगला वापर केला जातो. तुषार सिंचन चालू असताना त्यात भिजताना वाटते जणू आत्ता पाऊसच पडतो आहे.

एक दिवस मी आणि माझे मित्र शेतात स्प्रिंकलर पहायला गेलो होतो. समोर पाणी कारंजासारखे उडत होते. मावळत्या सूर्यकिरणात असे वाटत होते की जणू सोने उधळले जात आहे. मुलांची सर्वात आवडती गोष्ट म्हणजे पाण्यात खेळणे. मग ते कोठे का असेना. समोर पाणी उडत आहे आणि आम्ही बघत बसलोय असे कसे होईल? कोणी ना कोणी काहीतरी कारण काढायचेच आणि पाण्यात भिजायचेच. थोड्या वेळाने आमच्यात चिखलाच्या गोळ्यांनी मारामारी सुरू झाली. आता एकदा रंगलेल्या खेळात कसले कपडे मळले आणि कसले पिकाचे नुकसान. थोड्या वेळाने त्या बांधाने दत्तूकाका पळत आला तेव्हा मात्र सर्वांची गडबड उडाली. सर्वांची एकच क्रिया चालू होती ती म्हणजे धावण्याची. सर्वजण आपापल्या मार्गाने पळू लागले. नंतर सगळ्यांची भेट झाली ती थेट घरीच. सर्वजण हसत आणि धापा टाकीत होते.

असे आमचे गमतीदार गाव. संकटकाळी वाऱ्यासारखे धावून येणारे मित्र. असे गाव तुम्हाला तरी सोडून जाऊ वाटेल काय? मलाही नाही जाऊ वाटत. पण काय करणार? शाळेला तर जायचेच असते. त्यासाठी फलटणला रहायचे असते. असे हे गाव ज्याचे कितीही वर्णन कराल तेवढे कमीच. आनंदाच्या सागरात डुंबणारे असे माझे गाव आहे.



# क्षण एक

**नम्रता मगर (इयत्ता ७ वी)**

कोकणातील एका खेड्यातील मध्यम आर्थिक परिस्थिती असणाऱ्या परिवारात अनसाचा जन्म झाला. समुद्राकाठी बागमंडले गावातील कोळीवाड्यात तिचे घर आहे. गाव फार लहान.

अनसा ही जातीने कोळी. पूर्वापार चालत आलेला हा व्यवसाय. पुरुषांनी मासे पकडायचे तर स्त्रियांनी ते विकायचे. नुसते मासे विकण्यापेक्षा मोठे कोणीतरी व्हावे असे अनसाला वाटे. सुरुवातीला आई-वडिलांना ती धंद्यात मदत करू लागली.

अनसाचा भाऊ बन्या शाळेत जाऊ लागला होता. त्याला खरेतर शाळेची बिलकुल आवड नव्हती. दिवसभर उनाडक्या करण्यातच त्याचा बराचसा वेळ जायचा. भावाप्रमाणे शाळेत जायची इच्छा अनसाच्या मनात वारंवार प्रबळ होत असे. तिच्याबरोबरच्या काही मुली तिला शाळेत जाताना दिसायच्या; ते बघून तिचे भान हरपायचे. यांच्याप्रमाणे आपणही शाळेत जावे असे तिला वाटायचे. आपल्यालाही आई-बाबा शाळेत घालतील अशी वेडी आशा तिच्या मनात होती. पण दुसऱ्याच क्षणी ती स्वतःला सावरायची. मुलगा शिकतो म्हणून भावाचा होणारा लाड व मुलीकडे दुर्लक्ष? तिला वाईट वाटे. मलाही शाळेत घाला म्हणून ती रोज आई-बाबांच्या मागे लागे. परंतु आई-बाबा तिच्याकडे लक्षच देत नसत. हळू हळू ती तिच्या भावाच्या, बन्याच्या मागे जाऊन शाळेत बसू लागली. लक्षपूर्वक ऐकू व शिकू लागली. जाऊ देत लहान आहे, म्हणून बाबांनी तिचे नाव शाळेत घातले. त्या वेळी तिला खूप आनंद झाला. आई-बाबांना वाटले, नंतर ती कंटाळेल पण ती शिकतच राहिली.

अनसा हुशार होती. सर्व मुलांआधी हिचे उत्तर तयार असे. ती चार-पाच इयत्ता शिकली. शाळेत तिचा पहिला नंबर आला. पण घरात याची दखल कोणी घेतली नाही. मात्र बन्या नुसता पास झाला तरी काय कौतुक! अनसाला वाईट वाटले. तिने याबद्दल विचारले तर आईने खूप मारले व म्हटले, "आनशे, माझ्या पोरावर तुझी नजर का? जळतीस व्हय गं? पुन्हा असं म्हन्शील तर बघ!" अनसा म्हणाली, "आय, मी काय लोकाची हाय व्हय?" आई म्हणाली, "व्हय व्हय, माझी नाय तू बया. तू उद्या जाशील कुठंतरी. काय करायचं शिकून? शिकली तर लोकं तोंडात शेण घातल्याशिवाय राहत्याल व्हय? बास कर ते शिक्ष्यान." अनसा गप्प बसली. अनसा सहा इयत्ता शिकली, तसं आई-बाची शिक्षण बंद कर अशी भुणभुण लागून राहिली. पण ती लक्ष देत नसे. आई म्हणायची, "तुझी साळा बास कर म्हंजी घरात लक्ष राहील. गुरं-ढोरं राकायला नको. मासं इकायला नको. नुसती हुंदाडतीस. माझा बन्या बग." बन्या काय काम करतो असा अनसाला प्रश्न पडायचा. कारण दिवसभर तो घरी नसायचा.

अनसाला वाटले, सहजच म्हणत असतील आई-बाबा. पण नाही. तिला शाळेतून घरी ठेवण्यासाठी आई-बाबानी पुस्तके देणेच बंद केले. बन्या तर तिला पुस्तकाला हात लावू द्यायचा नाही. तो एकवेळ पुस्तके फाडील पण तिला द्यायचा नाही. पण अनसा काही लेचीपेची नव्हती.

तिच्या शाळेतील वेणू गुरे राखायची. तिच्याकडे पुस्तके होती. अनसा आईकडे गेली आणि गुरे राखायला जायचे कबूल केले. ती पण रोज माळाने गुरे राखत जायची आणि वेणूबरोबर तिच्या पुस्तकावरून अभ्यास करायची. जणू ती एका दगडात दोन पक्षी मारत होती.


असा अभ्यास तिने नवव्या इयत्तेपर्यंत केला. मात्र दहाव्या इयत्तेत वेणूचे लग्न झाले. आता पुन्हा प्रश्न! तिने मास्तरांना सांगितले. मास्तरांना खूप वाईट वाटले. एवढी हुशार मुलगी वाया जाऊ नये म्हणून मास्तरांनी तिला मदत केली. तोपर्यंत घरात अनसाच्या लग्नाचे सुरू झाले. मास्तरांनी घरात चार शब्द सांगितले. तेव्हा कुठे गाडी रुळावर आली.

अनसा आता झटून अभ्यासाला लागली. बन्यालाही ती समजावून सांगायची पण त्याची गाडी काही रुळावर आली नाही. परीक्षा आता जवळ आली. अनसाने सर्व पेपर चांगले सोडविले. जून महिन्यात तिच्या जीवनात सुवर्णाक्षरांनी लिहिलेला दिवस उगवला. सर्व गावात तिची चर्चा सुरू झाली. पेपरामध्ये तिचा फोटो छापून आला. तिचा बोर्डात नंबर आला होता. तिचा गावात सत्कारही झाला. कौतुकात जणू ती न्हाऊन निघाली होती.

इकडे तिचे आई-बाबा मात्र बन्या नापास झाला म्हणून अनसावरच

नाराज होते. तिच्या लग्नाचे घेऊन बसले होते. सर्व गावाने त्यांना शिव्या दिल्या. सरपंचांनीदेखील समजावले. आणि अनसा तालुक्याला शिकायला गेली. ती आता हॉस्टेलवर रहात असे. कधी आई-बाबा पैसे पाठवीत तर कधी नाही. अनसा धाडसी होती. तिने 'कमवा आणि शिका' या योजनेत भाग घेतला आणि आपल्या गरजा पूर्ण केल्या. तिने चांगल्या पद्धतीने आपले कॉलेज पूर्ण केले. पण तिला एवढ्यात बास करायचे नव्हते. तिने पेपरात एम.पी.एस.सी.ची जाहिरात वाचली आणि परीक्षा द्यायचे ठरवले. त्यासाठी रोज वर्तमानपत्रे वाचू लागली. खूप अभ्यास करू लागली. परीक्षा देऊन ती आता गावाकडे आली. गाव पूर्ण बदलला होता. गावाने तिचे स्वागत केले.

अशाच एका दिवशी अनसाच्या दारात पोलिसांची गाडी आणि पोस्टमन एकाच वेळी आले. काय झाले कुणालाच काही कळेना. पोलिसांनी बन्याच्या हातात बेड्या घातल्या आणि पोस्टमनने अनसाच्या हातात एक पत्र दिले. बन्याला खुनाच्या आरोपात अटक झाली होती तर अनसा एम.पी.एस.सी.च्या परीक्षेत प्रथम आली होती. एक बातमी आनंदाची तर दुसरी दुःखाची. क्षण एकच होता पण दोघांच्या जीवनाला वेगवेगळा अर्थ प्राप्त झाला होता.






# देव पावला

**शलाका उंडे (इयत्ता ६ वी)**

एक गाव होतं. तेथील सर्व माणसे गुण्यागोविंदाने रहात असत. पण ती माणसे वृक्षतोड खूप करीत, पाण्याचासुद्धा खूप जास्ती वापर करीत.

एके दिवशी असे करता करता त्या गावातली सर्व झाडे संपली, जमिनीखालचा पाण्याचा साठाही संपू लागला. असे करताना एके दिवशी दुष्काळ पडला. गुरांना खायला मिळत नव्हते. प्यायला पाणी मिळत नव्हते. माणसांनी आपल्या जमिनी व गायी-गुरे विकून टाकली. माणसे भरभर गाव सोडून जाऊ लागली.

त्या गावात एक ब्राम्हण रहात होता. त्याने देवाची तपश्चर्या केली. न खाता पिता त्याने खूप दिवस काढले. त्याची तपश्चर्या देवाने ऐकली व देव प्रसन्न झाला.

ब्राम्हणाने देवाला सांगितले की आमच्या गावात दुष्काळ पडला आहे. आमच्या गावातला दुष्काळ घालवा. देव म्हणाला की मी काही उपाय करू शकत नाही. तुम्हीच सर्व झाडे तोडली. पाण्याचा कसाही वापर केला. म्हणून दुष्काळ पडला. आता तुम्हीच झाडे लावा आणि काय ते बघा. असे म्हणून देव अदृश्य झाला.

तो माणूस घरी गेला व गावात सर्वांना सांगितले. मग सर्वांनी झाडे लावली. पाण्याचा काटकसरीने वापर केला. झाडे वाढल्याने हवेत गारवा वाढला, थंड हवा ढगांना लागली व पाऊस पडला. मग सर्वांनी परत बैल खरेदी केले. जमिनी नांगरल्या. पिके पेरली. जमिनीत भरघोस पीक उगवले. मग त्या गावातला दुष्काळ नाहीसा झाला.

# शाळेची वर्गणी

**आदित्य श्री. कुलकर्णी (इयत्ता ८ वी)**

मारुतीच्या देवळासमोर पारावर चार माणसे बसली होती. समोरून सायकल हातात घेऊन रामा चालत येत होता. त्याची चाल बघून तो दमल्यासारखा वाटत होता. तसा पारावरचा माणूस म्हणाला, ''काय रं रामा, असा का येतुयास- सायकलचं पाय दुखाय लागलं काय? का तुझ्या पायातला जोर उतू चाललाय?'' रामा पण कमी नव्हता. तो म्हणाला, ''तुमीपन तुमचं डोळं घरी इसारलाय वाटतं? सायकल पंक्चर हाय ते दिसत नाय वाटतं?'' तो टोला ऐकून चौघे गप्प बसली.

घरी आल्यावर सायकल भिंतीला टेकवून रामा हाशहुश करत बसला होता. तेवढ्यात त्याची नजर समोर गेली. घराचे चित्र विद्रूप दिसत होते. टाकीचा नळ चालू होता. त्याचा ओघळ आत्ताच सारवलेल्या अंगणाकडे जात होता. सारा चिखल झाला होता. ते बघून रामा चिडला. पलीकडे भांडी घासणाऱ्या बायकोला म्हणाला, ''मागं बघ जरा. समदा राडा झालाय. ती भांडी सोड अन् मला च्या दे.'' असे शब्द ऐकून बायकोपण खणकली. म्हटली, ''घ्या तुमचं तुमी करून. नायतर हाटीलात जाऊन प्या.'' तसा तिरमिरीत तो हॉटेलात गेला. तेथे जाऊन दोन मिनिटे डोळे मिटून बसला आणि चहाची ऑर्डर दिली. मालकाचे उत्तर आले, ''दूध संपलंय. च्या नाय.'' सकाळपासून अशा घडणाऱ्या घटनांनी रामाचे डोके भांबावून गेले. परत घरी जाऊन तो चहा प्यायला आणि दिलेल्या महत्त्वाच्या कामाबद्दल विचार करीत बसला.

दुपारी भरलेल्या मीटिंगमध्ये जो विषय झाला होता तो रामाला आठवला. शाळेच्या कामासाठी वर्गणी गोळा करायची होती आणि ती जबाबदारी रामाकडे आली होती. १०० रु. चे व ५० रु. चे पावती पुस्तकही त्याच्याकडे होते. त्यासाठी कुठे फिरायचे याचा विचार तो करत होता. मित्र, नातेवाईक व गाव सोडून दुसरीकडे स्थायिक झालेल्यांची नावे त्याच्या डोळ्यासमोर आली. त्याला रात्री झोप आली नाही. रात्री तो वर्गणी मागायला गेलाय आणि लोकं थापा मारून हाकलताहेत असे त्याला स्वप्न पडले.



दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने तालुक्याच्या गावची वाट धरली. शहरातील लोकांकडे गेल्यावर त्याला थोडी वर्गणी मिळाली तर काहींनी वर्गणी द्यायला जमणार नाही असे सांगितले. तर काहींनी उधारीवर पावत्याही फाडल्या. दिवसभर चालून पायाचे जणू तुकडे पडले होते. ''साळा काय माझ्या एकट्याची हाय काय? ज्या साळंत त्यांचीच मुलं शिकत्यात त्याच साळंसाटी वर्गणी दिली तर बिघडलं कुठं?'' असे विचारही त्याच्या मनात आले. असेच दोन तीन दिवस तो वेगवेगळ्या गावांत फिरला. थोडे पैसे त्याला मिळाले. त्याच्या मनाला थोडी उभारी आली.

बाकीच्यांनी काय केले हे पाहण्यासाठी तो शाळेत गेला. तेथे त्याला दिसून आले की कुणीही वर्गणी गोळा करण्यात रस घेतला नव्हता. हे पाहून त्याला वाईट वाटले. त्याने प्रत्येकाच्या घरी जाऊन त्यांची समजूत घातली. काहींनी त्याची चेष्टा केली. काहींना कौतुक वाटले. काहींनी तू लष्कराच्या भाकऱ्या का भाजतोस असा प्रश्नही केला. बाकीच्यांनी काही केले नाही हे पाहून तो दुप्पट जोमाने शहरात गेला. बऱ्याच मोठ्या लोकांना गाठून त्याने वर्गणी गोळा केली.

आता पुस्तके आणि रक्कम जमा करायला तो शाळेत गेला तेव्हा मुख्याध्यापकांना या खेड्यातल्या अडाणी माणसाचे कौतुक वाटले. बाकीच्या काम न करणाऱ्या लोकांत या अडाणी माणसाची कामगिरी उठून दिसत होती.

चार दिवसांनी शाळेच्या भूमिपूजनाच्या समारंभात रामाचा सर्व गावासमोर सत्कार करण्यात आला. त्याच्या अंगावर मूठभर मांस चढले. त्याच्या बायकोला त्याचा अभिमान वाटला.

काही काळाने रामा सायकल घेऊन पंक्चर काढायला निघाला तेव्हा त्याची कोणीदेखील आधीसारखी थट्टा केली नाही. उलट रामरामच केला. हा बदल त्याला दिसून आला कारण त्याने केलेले सत्कृत्यह्ल 'शाळेची वर्गणी'.

# कष्टाची भाकर

**प्रथमेश इनामदार** (इयत्ता २ री)

एक लक्ष्मण नावाचा गरीब, कष्टाळू आणि सत्यवचनी माणूस होता. त्याचे लग्न झाले होते. ते दोघे नवराबायको व त्याचे म्हातारे आई-वडील असे चौघेजण गुऱ्हाळ चालवून पोटापुरता पैसा मिळवीत. एक दिवस लक्ष्मण सकाळी आपल्या गुऱ्हाळात बसला असताना एक पोस्टमन शेजारच्या एका दुकानाचा पत्ता विचारत लक्ष्मणच्या गुऱ्हाळात आला. लक्ष्मण दिवसभर कष्ट करून दमलेला होता आणि तो पोस्टमन फिरून दमलेला होता म्हणून लक्ष्मण त्याला म्हणाला की ते दुकान गुऱ्हाळापासून बरेच लांब आहे. तुम्ही थोडा वेळ विसावा घ्या, रस घ्या मग पुढे जा. लक्ष्मणने त्याला रस दिला. रस पिता पिता दोघांच्याही गप्पा रंगल्या. पोस्टमनने त्याला एक मौल्यवान माहिती दिली. त्याने त्याला एका अरण्याबद्दलची माहिती सांगितली. ती अशी: महाराष्ट्राच्या दक्षिणेला एक अरण्य आहे. त्या अरण्याच्या वाटेवरच एक देऊळ आहे. तेथे मोठे-मोठे महात्मे व स्वामी आहेत. त्यांचे दर्शन घेऊन पुढे जा. थोड्या अंतरावरच तुला ते अरण्य दिसेल. अरण्यात प्रवेश केल्यावर तुला एक तळे दिसेल. त्या तळ्यात दोन कमळे आहेत. त्यातले कुठलेही एक कमळ घेऊन तू परत ये. पण त्या कमळांच्या संरक्षणासाठी तिथे अस्वल आणि कोल्हा हे दोन प्राणी आहेत. त्यांना चुकवून तुला ते कमळ आणावे लागेल.

लक्ष्मण दोन दिवसांची शिदोरी घेऊन अरण्याकडे जाण्यास निघाला. वाटेत त्याला सांगितल्याप्रमाणे देऊळ दिसले. तो तेथील संतांच्या पाया पडला. पुढे त्याला ते तळे दिसले. अस्वलांना चुकवून त्याने ते कमळ मिळविले व तो आपल्या घरी आला. त्याने ते कमळ देवापुढे ठेवले. ते कमळ आणल्यापासून तो सुखी झाला. काही दिवस सुखाचे गेले पण त्याला असले सुख पटेना. तेव्हा त्याने ते कमळ परत करायचे ठरवले व ते कमळ घेऊन तो निघाला. ते कमळ त्याने अरण्यात सोडले व तो पुन्हा आपल्या व्यवसायाकडे वळला आणि कष्टाने कमवू लागला.



नवनीत २००६

# मी स्वयंपाक शिकते

**नम्रता मगर (इयत्ता ८ वी)**

गेल्या वर्षी मे महिन्याची सुट्टी होती. सुट्टी म्हणजे धमाल नि मजा! माझी सुट्टी मात्र मला स्वयंपाकघर बिघडवण्यात घालवावी लागली. त्याचे असे झाले की आईने मला स्वयंपाक करायला शीक असे सांगितले. तिचा निर्णय अगदी ठाम असतो. त्यामुळे तिच्यापुढे माझी मात्रा चालली नाही.

दुसऱ्या दिवशी मी मुद्दामच खूप उशिरा उठले. हेतू हा की तोपर्यंत आईने स्वयंपाक केला असेल असे वाटले. पण आईलाही सुट्टी होती त्यामुळे अजिबात घाई-गडबड नव्हती. त्यामुळे मी नाराज झाले. मला वाटले विसरली असेल तर छानच होईल पण दात घासतानाच लौकर आटपून स्वयंपाकघरात ये अशी सूचना मिळाली. मग काय जावेच लागले.

''तिथले दोन-तीन कांदे चीर,'' असे आईने सांगितले. नक्की दोन की तीन काही कळेना म्हणून पाच घेतले. कधी हातात सुरी न घेतलेली मी. सुरी घेतली आणि कांदे चिरायला बसले.

पहिला कांदा चिरायला घेताच पावसाच्या सरीपेक्षा दुप्पट वेगाने थेंब पडू लागले आणि नाकातून वाहणाऱ्या पाण्याला सूं सूं करत थांबवता माझी तारांबळ उडाली. माझी गडबड पाहून राहू देत असे आई म्हणाली. मला वाटले आता सुटका झाली.

पण छे! आईने हिरव्या मिरच्या चिरायला सांगितले. मी एक मिरची घेऊन त्याच्यातील बिया काढून टाकून दिल्या. आई बघणार एवढ्यात माझा भाऊ ओंकार मला मारून जाऊ लागला आणि माझा हात चुकून त्याच्या डोळ्यात गेला. तो थयाथया नाचू लागला. मला काय झाले ते समजलेच नाही. आईने पटकन त्याचे डोळे धुतले व ''एवढं साधं कळत नाही का? बरं, लसूण सोल,'' असे सांगितले. मी लसूण घेतला व त्याच्या पाकळ्या सोलू लागले. पाकळ्या वेगळ्या काढून काढून माझी नखे लाल लाल झाली. मी आता फारच वैतागले होते. घरात सुट्टीसाठी गावाहून आलेल्या भावंडांचा पत्त्याचा डाव रंगात आला होता आणि मी मात्र एका कैदेत बसले आहे असे वाटू लागले.

मी काम नीट केल्याशिवाय आई मला खेळायला सोडणार नाही हे मला माहीत होते. म्हणून लसूण नीट सोलू लागले. तेवढ्यात कोणीतरी पाहुणे आले आणि मला आनंद झाला. माझ्या सुटकेचा एक आशेचा किरण मला दिसला. पण आईने मला पाणी नेऊन देण्यास सांगितले. मी लसणाचा हात न धुताच तसेच पाणी नेऊन दिले. ते पाहुणे लसणाचा वास घेऊन पाणी प्यायले नाहीत हे बरे झाले. परंतु माठाजवळ लसणाचा उग्र वास घुटमळू लागला. काय झाले हे लक्षात येताच आईने पाणी ओतून दिले. म्हणाली, ''लक्ष दे. त्या शिवाय सोडणार नाही.'' झाले! आशेचा किरण निघून गेला. मी निमूटपणे वटहुकुमाप्रमाणे वेलदोडे सोलू लागले. मिरचीच्या अनुभवामुळे मी त्याची फोलपटे केरात टाकली व दाणे साखरेत घातले. आता मात्र अगदी हद्द झाली होती. तिने मला चांगलेच फैलावर घेतले. मला वाटले वैतागून आता तरी ती सोडील कारण तिच्या सुसज्ज स्वयंपाकघराची मी नासधूस करत चालले होते. मात्र ती अगदी जिद्दीलाच पेटली होती जणू. मला तांदूळ निवडण्यास सांगितले, ते मात्र मी नीट निवडले. डब्यात टाकून आई सांगेल त्याप्रमाणे पाणी ओतू लागले. मग आईच्या मार्गदर्शनाखाली कुकर लावला. ''उद्या तुझा तू लावायचा,'' आईने फर्मावले.



दुसऱ्या दिवशी मी नीट तांदूळ, डाळ निवडून मापात पाणी ओतून कुकरमध्ये डबे ठेवले आणि कुकर गॅसवर ठेवला. मात्र मी खाली कुकरमध्ये पाणीच घातले नव्हते. मी मुर्खाप्रमाणे शिट्ट्यांची वाट बघू लागले. पण खूप वेळ झाला तरी शिट्ट्या होईनात. मी आपली कंटाळून गोष्टीचे पुस्तक वाचण्यात मग्न झाले. काही वेळाने कसलातरी वास मला आला. पाहते तर काय, निम्मा-अर्धा कुकर करपून कोळसा झाला होता. तेवढ्यात आईलाही करपल्याचा वास येऊन हातातले वर्तमानपत्र टाकून आई हॉलमधून पळत आली आणि गॅस विझवला. आईचे डोळे पाहून आई मला जमदग्नीचा अवतार भासू लागली.

आता मला कणीक मळायला लावून ती केसकर काकूंनी हाक का मारली तिकडे गेली. मला आईने काल अगदी जीव ओतून कणीक मळायला शिकवली होती. मात्र निम्मे अर्धे पीठ माझ्या हाताला, तोंडाला आणि उरलेसुरले जमिनीवर विखुरले होते. तेल घेण्याच्या नादात तेल निम्मे जमिनीवर व अर्धे परातीत झाले होते आणि त्यातच मीठ एकत्र झाले होते. माझा तो अवतार बघून आई रागाने तप्त झाली. भट्टीसुद्धा कमी तापेल एवढी आई चिडली होती. ते पाहून मी सर्व तेथेच टाकून पळू लागले. पण पाय परातीत पडला आणि आईने एवढ्या कष्टाने कालच घासलेल्या फरशीवर तेल आणि पीठ पसरले आणि स्वयंपाकघर चिकट झाले. आई माझ्यामागे येते आहे ते पाहून किचनचे दार ओढायला गेले तोच तिथला माठ खळकन खाली पडून फुटला. आपण आईला किती मदत करतो हे दाखविण्यासाठी आणि मला मार बसविण्यासाठी अक्षता तिकडून आली आणि पाण्यावर पाय घसरून जोरात आपटली. आई तिच्याकडे धावली आणि माझी सुटका झाली. त्या दिवसापासून तिने मला कधी स्वयंपाक कर असे सांगितले नाही. आता पाहू या सुटीत काय होते ते!



# ती भयाण रात्र

**सूरज चौधरी (इयत्ता ९ वी)**

ती भयानक रात्र आजही मला स्पष्टपणे आठवते. मी कधीही विसरू शकणार नाही अशी रात्र. एक अशी रात्र जिच्या आठवणीनेच अंगावर शहारे येतात. तेव्हा मी आठवीत होतो. उन्हाळ्याची सुट्टी लागली होती. आणि मी माझ्या वडिलांबरोबर दोन दिवसांसाठी आमच्या शेतात गेलो होतो. आमचे शेत विंचुर्णीच्या तलावाजवळ होते. तेथे एका साधूचे घर होते आणि एक मोडकळीला आलेले 'छप्पर' होते. घरापासून जवळच तलाव होता. तलावाच्या मध्यभागी एखाद्या बेटाप्रमाणे दिसणारी थोडीशी जमीन होती आणि तेथे एकही पान नसलेले भुताच्या घराप्रमाणे वाटणारे एक झाड होते. तेथील लोक आमच्या घराजवळ भुतांचा वावर आहे अशा कथा सांगत. गावापासून घर थोडेसे लांब असल्याने व भुतांच्या भीतीने सहसा तेथे कोणी येत नव्हते. आमच्या रानात ऊस लावला होता. तलावाच्या पलीकडच्या गर्द झाडीत कोल्ह्यांचे टोळके होते. ती कोल्ही रात्रीची जोरात कोल्हेकुई करत आणि आमच्या शेतात येऊन नासधूस करत.

त्या रात्री मी झोपायची तयारी करत होतो. रात्री अकरा-साडेअकराची वेळ होती. अचानक वीजपुरवठा बंद झाला. उन्हाळ्याचे दिवस असल्याने आणि खूप उकडत असल्याने मी माझे अंथरूण घेऊन बाहेर झोपायला आलो. अंगातला शर्ट काढला व इकडेतिकडे बघत गार हवा घेत बसलो. ती रात्र बहुतेक पौर्णिमेनंतरची होती. चंद्र लालबुंद दिसत होता. त्याचे चांदणेही मंद होते. जवळ-जवळ मध्यरात्र झालेली होती. सर्वत्र स्मशान शांतता होती. तेवढ्यात मला शेताच्या दिशेकडून कोल्हेकुई ऐकू आली. मी थोडासा दचकलो. माझे वडील मोटारीत झालेला बिघाड पाहण्यासाठी एका मोटार मेकॅनिकबरोबर विहिरीवर गेले होते. त्यांना रात्री उसाला पाणी द्यायचे होते. कोल्ही शेतात नासधूस करतील म्हणून त्यांना हाकलायला मीच शेताकडे जाण्याचे ठरवले.

वडलांनी बॅटरी नेली होती. माझ्याकडे काही दुसरी बॅटरी नव्हती. शेवटी एक हातभर लांब व चांगली जाड काठी घेऊन मी निघालो. सर्वत्र अंधार

होता. वारा सुटलेला. फक्त पानांच्या सळसळण्याचा आणि मधूनच कोल्ह्यांचा आवाज येत होता. भुताटकीचे वातावरण होते. पण मी घाबरायचे नाही असे ठरवले. शेताजवळच्या गवतात साप सळसळल्यासारखा आवाज झाला. मी जोराने काठी जमिनीवर आपटली. आवाज बंद झाला. तसेच कोल्ह्यांनाही माझी चाहूल लागलेली असावी कारण तेही शांत झाले. मी शेतातील पाटावरून आत घुसू लागलो. कोणीतरी माझ्या मागे येत असल्याचा भास झाला. आता मात्र मी जाम घाबरलो. नक्कीच माझ्या मागे भूत होते. मी जोरात मागे वळलो व उसावर काठी आपटू लागलो. भीती कमी करण्यासाठी मनातल्या मनात गाणी म्हणू लागलो. तेवढ्यात मागून कोणीतरी पळत गेल्यासारखा आवाज झाला. मी त्या आवाजाच्या दिशेने पाहिले. माझे लक्ष तिथे उमटलेल्या कोल्ह्याच्या पायाच्या ठशांकडे गेले. मी आवाजाच्या दिशेने पाठलाग करू लागलो. प्रत्येक पावलाबरोबर माझी भीती वाढत होती. अचानक आवाज बंद झाला. मी आजूबाजूला पाहिले. मी शेतातून जवळजवळ पलीकडे आलो होतो. फक्त समोरच्या पाटापर्यंतच आमचे शेत होते व त्यापासून थोडा पुढे तलाव होता. मी शेतातून बाहेर निघणार तेवढ्यात तलावाच्या पाण्याचा आवाज झाला. मी शेताच्या बाहेर आलो. तलावाकडे पाहिले पण काहीच नव्हते. मला वाटले मी भुताच्या जाळ्यात फसतोय. बाजूने पाय घासल्याचा आवाज झाला. मी माझ्या डाव्या हाताला पाहिले. पाहतो तर चार कोल्ही एका रानडुकराच्या मेजवानीवर ताव मारत होती.





त्यांनी मी वळल्याबरोबर माझ्याकडे पाहिले. त्यांचे डोळे चमकले. रक्ताने भरलेले लाल दात दिसले. त्यांच्या तोंडातून रक्त गळत होते. ते माझ्याकडे चिडून पाहत होते. मला ते रानकुत्र्यांसारखे वाटले. त्याच वेळेस तलावातल्या बेटावरून कोल्हेकुई ऐकू आली. माझे लक्ष त्या निष्पर्ण झाडाकडे गेले. तलावात पाणी कमी होते. त्यातून कोणीतरी चालण्याचा आवाज येत होता. भूतच माझ्याकडे येत होते. मग मघाशी रानडुक्कर खाणारी रानकुत्रीच होती. मी डोळे झाकले. आता मी संपलो असे म्हणत होतो. तेवढ्यात दातावर दात आपटल्यासारखा आवाज झाला. आता माझे काही खरे नव्हते.

अचानक सर्वत्र शांतता पसरली. काय झाले हे पाहण्यासाठी मी डोळे उघडले तेव्हा मी दचकून जागा झालो. सूर्याची पहिली किरणे डोळ्यांवर पडत होती.

# नाम्याची गोष्ट

**ओमप्रकाश धुमाळ (इयत्ता ६ वी)**

रणरणते ऊन. जणू काही सूर्य आगीच्या ज्वालाच फेकत आहे. कुठे झाड नाही. पान नाही. फूल-फळ तर लांबच. झाडे होती. पण ती अशी बोडकी. या धरतीवर कधी हिरवळ पसरेल काय याचा विचार नाम्या करत होता. उन्हाळ्याचे दिवस. अंगातून घामाच्या धारा निघत होत्या. तेवढ्यात त्याच्या कानावर हाक पडली, ''नाम्या घरी चल. आयनं बोलावलंय.'' ही त्याची बहीण चिंगी. तीही अशीच उनाडकी.

आईने नाम्याला पाणी आणायला लावले. घराजवळ पाण्याची एकही विहीर नव्हती. नाम्याने कळशी उचलली व तो निघाला. पायात चप्पल नाही. अंगावर नीटसे कपडे नाहीत. त्याला समोर काहीतरी दिसले. नाम्याप्रमाणेच रणरणत्या उन्हात उनाडक्या करीत होते. नाम्याने नीट पाहिले तर ते माकड होते. माकड जवळ आले. नाम्या पाण्याच्या शोधात चालला होता. माकड पण त्याच्याच मागे. नाम्या पाणी घेऊन घरी आला तर सगळ्यांची बांधाबांध चालली होती. नाम्याने विचारले तर चिंगी म्हणाली, ''आरं दादा, आपल्या हितं काम मिळत नाय. म्हणून तालुक्याच्या गावी जायचं.'' नाम्या म्हणाला, ''आन् मंग माजी शाळा?'' ''व्हय! लय शाळा शिकून धन लावणार हाय. चल उचल बोचकं आन् लाग रस्त्याला.'' नाम्या व माकड बाबांच्या मागे पायपीट करायला लागले. नाम्याने गावाकडे वळून बघितले. पडक्या झोपड्या व बोडकी झाडे यांचे गाव!

रस्त्यावरून उडणारा फुफाटा त्याला गावची याद करून देत होता. पण गाव तर दुष्काळग्रस्त! प्यायला धड पाणी पण नाही. सर्वजण तालुक्याच्या गावी पलायन करीत होते. एक बारा वर्षांचा मुलगा व एक माकड माणसांच्या घोळक्यातून चालले होते. शहराबाहेर मुक्काम मोडला. वाळलेली भाकरी चघळत नाम्या शहरातील इमारतींकडे पहात होता. थोड्याच वेळाने शहरात काम शोधत सर्वजण जाणार होते. नाम्याच्या व माकडाच्या उनाडक्या चालल्या होत्या. बाबांनी त्यांना झाडाखाली गप्प बसायला सांगितले होते.

बाबा इतर मोठ्या माणसांबरोबर निघून गेले की नाम्या माकडासंगे बोलत बसे. माकड नाम्या जे म्हणेल ते ऐकत असे. माकड व नाम्या यांचा खेळ पाहण्यासाठी मुले जमत होती. एका मुलाने विचारले, ''ए मुला, आमच्या शाळेत येशील का रे?'' नाम्या म्हणाला, ''चालेल.''

दुसऱ्या दिवशी सकाळीच नाम्या शाळेत गेला. ही शाळा जरा मोठीच होती. शाळा त्याला खूपच आवडली. त्याने माकडाचे खूप छान छान खेळ केले. पण शाळेच्या मुख्याध्यापकांना ते आवडले नाही. त्यांनी सांगितले, ''हे असे करणे चुकीचे आहे. याला तू सोडून द्यायला हवे. तू आमच्या शाळेत शिकायला ये. याला आपण जंगलात सोडून देऊ.'' पण माकडावर नाम्याचे खूप प्रेम होते. त्याला माकडाला सोडायचे नव्हते. पण नाइलाजाने त्याला ते करावेच लागले. त्याचे वडील आधी शाळेत पाठवायला तयार नव्हते. पण शिक्षकांनी बाबांची समजूत काढून त्याला शाळेत घालावयास सांगितले.

नाम्या शाळेत जाऊ लागला. पण आता त्याला त्याचे माकड मिळणार नव्हते. नाम्याबरोबर चिंगीही शिकू लागली. माकडाच्या आठवणीने नाम्या खंत करीत होता. बापाला काम लागले आणि नाम्या आठवण जवळ ठेऊन जीवन सुखा-समाधानाने जगू लागला.



# एक प्रसंग

**प्रीतम पवार (इयत्ता ५ वी)**

हो! मी टी.व्ही. बघतो. टी.व्ही.वर खेळ व इतरही कार्यक्रम लागतात. कधी कधी भुताचे कार्यक्रम लागतात.



एकदा काय झाले मी एकटाच घरात असताना भुताचा कार्यक्रम बघत बसलो. त्यात थोडे पडलेले व थोडे टोकदार दात असलेली, पांढरे केसवाली व कपाळावर मोठे कुंकू लावलेली, पांढरी साडी नेसलेली, गळ्यात माळा घातलेली, हातात बांगड्या घातलेली अशी विचित्र चेटकीण होती. तिचा अवतार पाहून मी आईने न सांगताच त्या दिवशी टी.व्ही. बंद केला.

उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे आत उकडत होते म्हणून बाहेर हवेला बसण्यास आलो. तेवढ्यात आई म्हणाली, ''तू बस येथे दुकानात. मी चपात्या करते.'' आई घरात गेली. मी बसलो. एकदम लाईट गेली. आईने कंदील दुकानात आणला व ती परत आत गेली. मी पाहतो तो तर काय आकाश ढगांनी भरून गेले होते. विजा चमकू लागल्या. पाऊस पडायला सुरुवात झाली. माणसे घराकडे पळू लागली. पोरे पावसात भिजू लागली. थोड्याच वेळात रस्त्यावरची वाहतूक थांबली. संध्याकाळचे सात वाजले होते. तरी पाऊस सुरूच होता. मी एकटाच दुकानात होतो. मी विचार करत होतो उन्हाळ्यात पाऊस कसा पडेल. विचार करता करता माझी नजर रस्त्यावर गेली. तिथून एक कंदील हालत हालत माझ्या दिशेने येत होता. मी माझा कंदील घट्ट पकडला. मला वाटले तो माझा कंदील नाही. मग तो कंदील कोणाचा? तो दुसऱ्याचा कंदील होता. हळू हळू तो माझ्याकडे येत होता. तो जरा जरा जवळ आल्यावर मला कळले



तो कंदील घेऊन एक माणूस येत होता. तो माझ्या दुकानात आला. तो विचित्र दिसत होता. केस वाढलेले, दाढी वाढलेली, कपाळावर गंध, कानात रिंग घातलेली व हातात कडे. असा तो माणूस होता. त्याने माझा हात दाबला. तेव्हा माझे पाय भीतीने लटलटा कापू लागले. त्याने माझ्या हातात काही पैसे दिले आणि म्हणाला मेणबत्ती दे. मी डबे शोधत होतो पण माझे लक्ष त्या माणसाकडेच होते. मला मेणबत्तीचे पाकीट सापडले. त्या पाकिटातली एक मेणबत्ती काढून त्या माणसाला दिली. ती घेऊन त्याच्या रस्त्याकडे तो निघाला. त्याची चाल तर वाघावाणी होती. तो चालत चालत दिसेनासा झाला. माझ्या मनातली भीती नाहीशी झाली. काही वेळाने लाईट आली आणि मी कंदील विझवला व दुकान बंद करून घरात जेवायला गेलो.


# माझे पोहणे

**सृष्टी कदम (इयत्ता ७ वी)**

आईच्या पोटात असतानाच मुलाला पाण्याविषयी ओढ असते. त्यामुळे त्याला जीवनात पाण्याची ओढ कायम राहते. माणूस सोडून सर्व प्राणी निसर्गतःच पोहू शकतात. माणसाला मात्र पोहणे शिकावे लागते. काही लोकांना तर पाण्याची भीती वाटते.

मला मात्र लहानपणापासून पाणी आवडते. मला पोहता यावे या दृष्टीने व माझ्या बरोबरच अनेकांना पोहण्याचा फायदा व्हावा या दृष्टीने माझ्या बाबांनी पोहण्याचा तलाव बांधला.

तलाव बांधण्याआधी मी एकदा दोनदा विहिरीतही पोहले होते. पण पाठीला टायर लावूनच. पोहण्याचा तलाव बांधल्यानंतर मी महिन्याभरात पोहणे शिकले. पोहणे हे सर्वांना शिकणे आवश्यक आहे. मला तर वाटते पोहण्याविना जीवनात मजा नाही. पोहण्याविना जीवन अधुरे आहे. माझ्या बाबतीतच बोलायचे तर पोहणे जीवनच आहे.





एके दिवशी बाबांच्या मित्राचा त्यांना फोन आला. माझे भाग्य उजळायला तो फोन फार महत्त्वाचा होता. बारामतीत जायंट्स् ग्रुपने वीर सावरकर नावाचा पोहण्याचा तलाव बांधला होता. त्या तलावात पहिल्याच वर्षी पोहण्याच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. या पोहण्याच्या स्पर्धेत मी भाग घेतला. पहिल्यांदाच पोहण्याच्या स्पर्धेत भाग घेतल्याने मलाच काय कोणालाही फार भीती वाटली असती. त्या स्पर्धेत माझा पहिला नंबर आला व मला माझे पहिले पोहण्याचे प्रशस्ती-पत्रक व एक ट्रॉफी मिळाली. ते बक्षीस माझ्या सगळ्यात आवडीचे आहे असे मी मानते.

मी इयत्ता चौथीत येईपर्यंत मला माहीतच नव्हते की पोहण्याच्या स्पर्धा शाळेकडूनही खेळल्या जातात. मला वाटते पोहणे मला जमत असेल हे शाळेत कुणाला माहीतच नव्हते त्यामुळे इतक्या वर्षांत कुणी मला विचारले नसावे. पण चौथीत मी पोहण्याच्या स्पर्धेत भाग घेतला. मी पोहण्याच्या प्रत्येक प्रकारात नाव नोंदविले. तालुकास्तरीय स्पर्धा आमच्याच पोहण्याच्या तलावावर झाल्या. माझा सगळ्या प्रकारांत नंबर आला. मला माझ्या पोहण्याचा अभिमान वाटू लागला.

वीस-पंचवीस दिवस उलटले असतील. आता जिल्ह्याच्या स्पर्धा जवळ आल्या. या स्पर्धा पाचगणीला होत्या. मी पहिल्यांदाच इतक्या मोठ्या आणि माहीत नसलेल्या ठिकाणी आले होते. पाचगणी थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. थंडीत पाण्याची काय अवस्था असेल? अशा पाण्यात पोहणे मला शक्य होईल का? पाण्याचा अंदाज घेण्यासाठी स्पर्धा चालू होण्यापूर्वी मी एक फेरी मारून घेतली. पाणी जरा थंडच होते पण माझा नाइलाज होता. एवढ्या थंडीत पहिल्यांदाच जिल्हास्तरीय खेळूनदेखील माझा तिसरा नंबर आला. मला आनंदही होत होता व वाईटही वाटत होते. आनंद याचा की मी पहिल्यांदाच जिल्हास्तरीय खेळले होते व दुःख याचे की एवढे प्रयत्न करूनदेखील माझा तिसरा नंबर आला होता. पण या अनुभवामुळे माझ्या पुढच्या प्रवासात सुधारणा झाल्या.

मग मात्र मी एकाच प्रकारात भाग घेण्याचे ठरवले. त्यात मी तालुकास्तरीय पास केली, जिल्हास्तरीय पास होऊन मी विभागीयपर्यंत पोचले. पण दुर्दैवाने विभागीयमध्ये माझा तिसरा नंबर आला. एका नंबरसाठी

मी राज्यस्तरापर्यंत पोचले नाही. त्याच वेळी मी मनाशी निश्चय केला की पुढच्या वेळी चांगला प्रयत्न करून राज्यस्तरापर्यंत पोचायचे.

तो निश्चय पूर्ण करण्याचे माझे प्रयत्न सध्या चालू आहेत. मला वाटते, जे साध्य करणे शक्य आहे, ते साध्य झालेच पाहिजे. जीवनातील एक-एक क्षण हा प्रयत्नातच घालवला पाहिजे त्यामुळे जे साध्य होईल ते गोडच असेल!



# जम्मू प्रवास

**प्रथमेश इनामदार (इयत्ता ४ थी)**

सर्व विद्यार्थ्यांवर परीक्षेचा ताण हा असतोच. शेवटचा पेपर संपला व सुट्टी लागली की सर्वजण कोठे ना कोठे जाण्याचा बेत आखतात. तसा आम्ही जम्मूला जाण्याचा बेत आखला. अगोदर हा विषय चेष्टेचा वाटला पण आम्ही मनाची तयारी केली व जायचे ठरवले. त्या दृष्टीने तयारी सुरू केली. सामानाची बांधाबांध केली. डबे बनवून घेतले. पहाटे ४ वाजता घरातून निघालो. स्टेशनवर आलो. येऊन प्लॅटफॉर्मवर जातच होतो तेवढ्यात, 'गाडी आज रद्द झाली' याचे निवेदन ऐकले. लगेच तिकीट रद्द करून दुसऱ्या दिवशीचे तिकीट काढले.

दुसऱ्या दिवशी गाडीत बसलो व गाडीने फलाट सोडला. आम्ही खूप आनंदी होतो पण नंतर तिकीट तपासनीसाने सांगितले गाडी जरा लांबून जाणार आहे कारण पालघर जवळील पुलाला जलसमाधी मिळाली आहे. म्हणजे आता एका दिवसाच्या प्रवासाला तीन दिवस लागणार होते. रात्री आम्ही पंजाबमध्ये आल्यावर आमच्या डब्यातील वीज गेली. सर्व डब्यात अंधारच अंधार. पप्पांनी खाली उतरून तक्रार नोंदवली. गाडी तपासणीसाठी रेल्वे पोलीस तसल्या अंधारात गाडीतील सामानाची तपासणी करत होते. सकाळी आम्ही जम्मूला पोहचताच सगळीकडे पोलिसांच्या गाड्या, बंदूक रोखून सैनिक आणि त्यांच्या छावण्या दिसू लागल्या.

आतापर्यंत बातम्यांमध्ये ऐकलेले, पाहिलेले आम्ही प्रत्यक्ष पाहत होतो. नंतर आम्ही बसमधून प्रवास सुरू केला. डोंगरावरील हिरवीगार गर्द झाडी, डोंगर आणि त्यात सैनिक, त्यांच्या छावण्या व थोड्या थोड्या अंतरावरील तपासणी केंद्र हे सर्व पार पाडून आम्ही कटरॉं येथे पोहोचलो. तिथे आम्ही खोली घेतली. नंतर पटपट आवरून आम्ही खोलीबाहेर पडलो. आता आम्हाला १४ कि.मी. एवढा डोंगर चढायचा होता. सर्वांनी वर जाण्यासाठी घोडे ठरवले. काही वेळेला घोडेवाले आमच्या बरोबर चालले पण नंतर ते सर्वजण मधल्या पायवाटेने आणि आम्ही रस्त्याने निघालो. घोडे वळणावर अगदी डोंगराच्या कडेने वळाले की भीती वाटायची. थोड्या वेळाने वरून

खाली येणाऱ्या काही मुलांनी पाण्याच्या मोकळ्या बाटल्या पायाने उडवल्या. त्या बाटल्यांच्या आवाजाने घोडे घाबरले व उलट्या दिशेने पळाले. एका घोड्यामागोमाग तीन-चार घोडे पळतच सुटले. एका बाजूला दरी व दुसरीकडे डोंगरांची भिंत. आता आपण संपलो असेच वाटले पण नंतर घोडे आवरले व आम्ही देवळाजवळ पोहचलो.

वैष्णवदेवीच्या देवळाभोवतीचा परिसर खूपच सुंदर होता. तेथील निसर्ग, यात्रेकरूंसाठी असलेल्या सोयी, स्वच्छता हे पाहून प्रवासाचा शीण एका क्षणात नाहीसा झाला. गुहेत जाताना जवळ कोणतीही वस्तू नेता येत नव्हती. गुहेची रचना अत्यंत छोटी होती. त्यातच आत एक मोठा दगड. मला पलीकडे जाता येईना. म्हणून मामाने मला दगडावरून पलीकडे अक्षरशः ढकलले व आईने पलीकडे उतरवून घेतले. पाण्यातून आम्ही देवीजवळ पोहचलो. पुजाऱ्याने थोडक्यात माहिती सांगितली. तेथील धार्मिक वातावरण पाहून आमची तहानभूक हरपली.

भैरवनाथ नावाच्या राक्षसाचं दर्शन घेतल्याशिवाय यात्रा सफल नाही म्हणून तिथे जाण्याचे ठरवले तर ते मंदिर मूळ मंदिरापासून आणखी वर २ कि.मी.! तिथे जाण्यासाठी आम्ही सुसज्ज झालो पण अचानक झालेल्या गारपिटीमुळे आमचा बेत फसला व आम्हाला मुक्काम करावा लागला. मग सकाळी दर्शन घेऊन खाली येताना अर्धकुवारी नावाच्या गुहेत दर्शनास गेलो. तिथे गुडघ्यावरून रांगत जाऊन दर्शन घेऊन खालून वर साखळी धरून यावे लागते. मी रांगत गेलो पण वर येता येईना. बराच वेळ प्रयत्न केला. रांग पुढे सरकेना. रांग पुढे का येत नाही हे पाहण्यासाठी पोलीस आले. त्यांनी मला ओढून बाहेर काढले.

तेथील बाजारपेठ आपल्यापेक्षा निराळी होती. तेथे विकायला शाली, गालीचे, भरतकामाच्या वस्तू, विणलेल्या वस्तू, आकर्षक टोपल्या, बास्केट, टोप्या, ड्रेस इत्यादी वस्तू आणि अक्रोड, बदाम, पिस्ते, काजूंनी भरलेली दुकाने होती. तणावाचे वातावरण असूनसुद्धा तेथील लोक पर्यटकांना माहिती देणे, बोलणे, हे काम करीतच होते. सतत होणारे बाँबस्फोट आणि दंगल यामुळे ते स्वतः व पोलीस चिडचिड्या स्वभावाचे बनले होते.

दुसऱ्या दिवशी आम्ही गाडीत बसलो व मुंबईकडे येण्यास निघालो.



आता गाडीला किती दिवस लागणार हे विचारले. सुदैवाने आम्ही एका दिवसात मुंबईला पोहचलो. त्यानंतर दोन दिवसांनी देवळाबाहेर बाँबस्फोट झाला व बरेच जण मृत्युमुखी पडले हे वाचले व पाहिले. आम्ही त्यातून सुखरूप बाहेर पडलो हे जाणवत असूनही भीती वाटत होती जणू आम्ही मृत्यूच्या दाढेतून बाहेर पडलो होतो.

# लेकरू

**सई भोसले (इयत्ता ७ वी)**


ज्ञानोबा आजोबांचे घर एका नारळाच्या झाडाच्या झावळ्यांनी लपले होते. समोरच्याच समुद्रासारख्या अफाट जागेला त्यांनी आपले अंगण मानले होते. त्यांचे घर खूप खूप मोठे होते. त्या एवढ्या मोठ्या घरात ते एकटेच राहत होते. त्यांच्या पत्नीचे काही वर्षांपूर्वीच निधन झाले होते. त्या आजोबांना दोन मुले होती. त्यातील एक मुलगा अमेरिकेला व दुसरा मुलगा युरोपला होता. आजोबांनी मुलांना कोणतीही गोष्ट अपुरी पडू दिली नव्हती. पण त्याच आजोबांना ती मुले विसरली होती. ती दोन्ही मुले दुसऱ्या देशात गेल्यापासून एकदाही आजोबांना भेटायला आली नव्हती.

पण एवढे सगळे होऊनही आजोबा नेहमी खूष दिसत असत. त्यांनी समुद्रासारख्या अफाट अंगणात फणस, आंबा, चिकू यांची झाडे लावली होती. तसा आजोबांना झाडाचा ध्यास भारी होता. कुणाचाही वाढदिवस असो ते त्यांना आपल्या अंगणातील रोपटे द्यायचे आणि म्हणायचे, ''रोपट्यांचा गुण नेहमी आपल्या अंगी बाळग. झाड हेच आपले जीवन आहे. माझी भेट म्हणून हे झाड आपल्या अंगणात लाव. त्याला पाणी घाल आणि त्याची मायेने मशागत कर. मग बघ की हेच झाड तुला फळे देईल.''

असेच एकदा आजोबा आपल्या जुन्या पण आजही ताज्यातवान्या असणाऱ्या आठवणी काढत मनातल्या मनात हसत होते. तेवढ्यात त्यांच्या घराचे फाटक वाजले. आजोबांनी खुर्चीत बसून विचारले, ''कोण आहे?'' पण काहीच उत्तर आले नाही. म्हणून ते फाटकाजवळ गेले आणि त्यांनी इकडेतिकडे पाहिले पण कुणीच नव्हते. ते फाटकाजवळून आले आणि पुन्हा खुर्चीत बसले नि मनाशीच म्हणाले, ''जाऊ देत, असेल कुणीतरी.'' इतक्यात पाठीमागून त्यांच्या डोळ्यांवर कुणीतरी हात ठेवला. नाजूक हात, हातात बांगड्या. क्षणाचाही विलंब न लावता आजोबांनी पटकन ओळखले कारण ती होती मालन, जी लहानपणापासून आजोबांच्या सान्निध्यात हसत खेळत बागडत मोठी झाली. आजोबा तिला आपल्या नातीप्रमाणेच समजायचे. ती आजोबांची सर्व कामे करायची. त्यांच्या झाडांना पाणी घालायची, अंगण साफ करायची, आजोबांना ती वेळेवर औषध द्यायची. अशी ही गुणी मालन मोठ्यांचा आदर करायची. आजोबांची खूप लाडकी होती. आजोबा तिला लाडाने लेकरू म्हणायचे.

मालन आजोबांच्या घराशेजारीच राहायची. तिच्या घरात तिचे बाबा, सावत्र आई, सावत्र भाऊ, सावत्र बहीण आणि ती राहायची. तिची सावत्र बहीण तिच्यावर खूप जळायची. कारण मालन दिसायला छान होती व बुद्धीनेही चलाख होती. तिची सावत्र आई तिचा खूप छळ करायची. ती जन्मल्यावर तिच्या आईचे निधन झाले त्यामुळे अपशकुनी म्हणून तिच्यावर शिक्का पडला. तिला त्या लहान वयात जे आईचे प्रेम हवे होते ते मिळालेच नाही. पण हेच प्रेम, हीच मायेची छाया ज्ञानोबा आजोबांनी तिला दिली होती. त्यांनी त्यांच्या लेकराचे नाव शाळेत घातले आणि आजोबा त्याची फी पण भरू लागले. आता ते लेकरू त्या शाळेत शिकू लागले. आता तिच्या गुणांना त्या शाळेत वाव मिळू लागला होता.

काही वर्षं अशीच गेली. आता लेकरूचे शिक्षण हळू हळू पूर्ण होऊ लागले होते आणि आता आजोबांचे वयही वाढत होते. त्यांनी त्यांच्या वयाची पंच्याऐंशी ओलांडली होती. आता लेकरू पुढचे शिक्षण घेण्यासाठी बाहेरगावी गेले. ते दर महिन्याला आजोबांना पत्र पाठवत असे. त्याचे पत्र वाचून ते मनोमन सुखावत. पण अलीकडे आजोबांची तब्येत बिघडत



चालली होती. ते कोणत्याही क्षणी दगावण्याची शक्यता होती. त्यामुळे त्यांनी आपल्या लंगोटी मित्राच्या वकील मुलाला फोन केला आणि त्या वकिलाला सांगून आपल्यानंतर हे घर आणि शेतीवाडी लेकराच्या नावावर केली आणि एका रात्री ज्ञानोबा आजोबा काळाच्या पडद्याआड गेले. ही बातमी ऐकल्यावर मालन आपले शिक्षण अर्धवट सोडून येईल म्हणूनच की काय वकिलाने तिला ही बातमीच सांगितली नाही. पण मालन आल्यावर तिला जेव्हा ही बातमी सांगितली तेव्हा ती धाय मोकलून रडली. तिला आजोबांबरोबर घालवलेला प्रत्येक क्षण आठवू लागला. पुढे तिने ज्ञानोबा आजोबांचे घर आणि शेतीवाडी सांभाळली. ती आता मोठी इंजिनिअर तर आहेच पण त्याचबरोबर एक उत्तम समाजसेविकादेखील आहे. ती अनेक वृद्धांची सेवा करते. तिने एक वृद्धाश्रमदेखील बांधला आहे. ज्ञानोबा नावाचा.

पण रोज रात्री तिला स्वप्न पडते. त्या स्वप्नात तिच्यावर आभाळाएवढे प्रेम करणारे आजोबा येतात. आणि तिला हाक मारतात, ''लेकरू... ए... लेकरू.''




# नवनीत २००८

# आणि परीक्षा दिली

**प्रथमेश इनामदार (इयत्ता ५ वी)**

वार्षिक परीक्षेची धामधूम सुरू झाली होती. चहूकडून ग्यानबा तुकारामप्रमाणे अभ्यास करा हाच जयघोष कानी पडत होता. परीक्षा एका दिवसावर येऊन ठेपली. सगळी तयारी पूर्ण झाली. आदल्या रात्री सर्व विषयांची उजळणी करून झोपी गेलो. सकाळी उठलो. घसा दुखत होता. मी आईच्या कानावर ही गोष्ट घातली. आईने गरम मधपाणी देऊन, त्याच त्याच सूचना हजारवेळा रिपीट करून व शुभेच्छांसह पेपरला पाठवले. पेपर दिला, घरी आलो तरी अजूनही घसा दुखत होता. अचानक मला सणकून ताप भरला. ताप वाढला. आईने डॉक्टरांना दूरध्वनी करून परिस्थिती कानावर घातली. संध्याकाळी रुग्णालयात गेलो. स्टेथस्कोप छातीला टेकला. हृदयाची स्पंदने वाढली. थोड्याच वेळात रक्तदाबाच्या यंत्राचा पट्टा हाताभोवती आवळला गेला. गोळ्या दिल्या गेल्या. संपूर्ण रात्र तळमळत काढली. सकाळी उठून पेपरला गेलो. दुपारी रक्ततपासणीचा अहवाल आला आणि डॉक्टर वाचेपर्यंत श्वास रोखले गेले. रुग्णालयात दाखल करा हे शब्द आम्हाला बंदुकीच्या गोळीप्रमाणे वाटले. पायाखालची जमीन सरकली. मी





सर्व भान विसरून भावनांना वाट मोकळी करून दिली. त्यातच मी आईबाबांच्या मागे लकडाच लावला की ही गोष्ट कल्पितातार्इंच्या कानावर घालाच. त्यांनी माझी समजूत घालून मला रुग्णालयात नेले.

रुग्णालयात गेलो तर आम्हाला प्रतीक्षागृहात तिष्ठत बसवले. नेहमीप्रमाणे डॉक्टरांचा दूरध्वनी (मोबाईल) रुसलेला. येतीलच, येतीलच असा आश्वासनांचा भडिमार आमच्यावर झाला. ताप काहीही करून डोक्यात जाऊ देऊ नका म्हणून गार पाण्यात नळाखाली बसवले तर अंगात थंडी भरली. अशातच अंग थंड राहण्यासाठी बर्फाचा खडा हातात पडला. एखादा यात्रेकरू जसा डोळ्यांत तेल घालून गाडीची वाट पाहतो त्याप्रमाणे आम्ही डॉक्टरांची वाट पाहत होतो आणि डॉक्टर आले. धावतपळत त्यांच्याजवळ गेलो. परिस्थितीची कल्पना दिली. त्यांनीही रुग्णालयात भरती करण्यास सांगितल्यावर माझी पाचावर धारण बसली. माझी रवानगी खोलीत झाली. सलाईन लावण्यासाठी शीरच सापडेना. शेवटी अंगाला दोन-तीन ठिकाणी सुईचा स्पर्श झाल्यावर सापडली एकदाची! सलाईनची बाटली, ती नळी हे पाहून छातीत धडकी भरली कारण असा प्रसंग माझ्यावर पूर्वी कधीच आला नव्हता. काही सुचत नव्हते. घसा काहीही खाऊ देत नव्हता. थोडक्यात मी अगदी बेजार झालो होतो. थोड्याच वेळात पाणी आणि कसल्यातरी गोळ्या आल्या. पाण्यात बुडवून घडी ठेवण्यास सांगितले. रुमाल ठेवला. क्षणार्धात रुमालातून पाण्याचे बाष्पीभवनच. अंगावर पाणी ओतले तरीही तसेच. तिथला पंखा काठीने फिरवला तरी जोरात फिरेना असा होता. माझी होणारी मामी आली. तासा-तासानी डॉक्टर येत होते. थर्मामीटरनी माझा ताप तपासला जात होता. पारा १०४ ते १०५च्या खाली येईना आणि मी माझा पेपर माझी परीक्षा हेच बडबडत राहिलो. सकाळी आईने कल्पितातार्इंना बोलावले. त्यांनी धीर दिल्यावर माझा पारा खाली आला. पडून पडून कंटाळा आला होता. एक रात्र आम्ही तळमळत काढली. माझे वडील खाली झोपले. एका मैत्रिणीच्या आईने ट्रॉली उघडून दाखवली व कोणतेही सरबत घ्या म्हणाली. हक्काने या. कधीही मदत लागेल तेव्हा बोलवा. असे आपुलकीचे उद्‌गार निघत होते. जरा जरा उठायला लागल्यावर मागच्या हौदात अंघोळीचा कार्यक्रम पार पाडण्याचे ठरवले पण माझा तिथे

बसण्यास असहकारच! मग एका मगातच खाटेवर अंघोळ केली. माझी भूक घशामुळे मोसंबीच्या पेलाभर रसावर भागवावी लागायची. भेटणाऱ्यांची गर्दी वाढू लागली. सर्वांनी एकच सल्ला दिला. काळजी करू नकोस. ठीक होशील. रात्री डास आम्हाला फोडून काढत होते. आता सलाईन काढली होती. माझे मनही घरच्या दिशेने उचल खात होते. वेळ घालवण्यासाठी वर्तमानपत्रांचा माझ्याकडून फडशा पडू लागला. मामा आला. सकाळी थालपिठांचा नाष्टा व्हायचा (घसा बरा झाल्यावर). माझ्यात सुधारणा होऊ लागली पण तणाव कमी झाला नव्हता. पेपर होतेच. आता गाण्यांचा फड रंगू लागला. आठवणी निघू लागल्या. आमची सुटका झाली. घरी आलो. माझी ईश्वराकडे एकच प्रार्थना आहे की,

सर्व गुण देगा देवा. आजारपण नको देवा!



# चुना

**प्रीतम पवार (इयत्ता ६ वी)**

दिवाळीचे दिवस होते. आज तुळशीचे लग्न होते. नेहमीप्रमाणे आमच्याही घरात तुळशीचे लग्न होते. बाबांची आणि आईची तुळशी लग्नाची तयारी चालली होती. मी बाबांच्या हाताखाली काम करत होतो. बाबांना एखादी वस्तू घेता येत नसेल तर मी त्यांना द्यायचो. असेच मला एक काम बाबांनी सांगितले. बाबांनी मला तुळशीला लावण्यासाठी चुना आणायला सांगितला. तो मी आणायला निघालो. बाबांनी मला पाच रुपये दिले. मी ते घेऊन दुकानात गेलो आणि काकांना चुना मागितला. तो त्यांनी दिला आणि मी पाच रुपये देऊन माघारी पैसे न घेताच पळून आलो. बाबांनी मला चुना मागितला. मी तो दिला. माघारी दिलेले पैसे मागितले. तेव्हा मी काहीच बोललो नही. बाबांच्या लक्षात आले की याने पैसे आणले नाहीत. बाबांनी चुना टेबलावर ठेवला आणि सांगितले, पुन्हा असे केले तर मार देईन आणि बाबा तयारी करायला निघून गेले. बाबांना जेव्हा चुना हवा होता तेव्हा चुना कोठे ठेवला आहे हे ते विसरले. सगळे घर चुना शोधत होते. मला अचानक टेबलावर चुना दिसला. मी त्याला हात लावला. हाताला मऊ लागला. मला पुन्हा एकदा हात लाऊ वाटला. मी ती पुडी दाबली तेव्हा ती फुटली. मला काय करू काय नको ते सुचेना. इतक्यात मला एक कल्पना सुचली. मी खाटेखाली जाऊन लपलो. बाबांनी मला चुना शोधायला हाक मारली. मी काही ओ दिली नाही. चुना तर सापडला पण मी गायब झालो होतो. परत मला शोधण्याची धावपळ झाली. एक तास झाला. दोन तास झाले. मी काही सापडलो नाही. बाबा शोधायला बाहेर निघाले. दीदीला आधीच जोराची झोप आली होती म्हणून ती खाटेखालचे अंथरूण काढायला निघाली तेव्हा मी दिसलो. मी लगेच बाहेर आलो तेव्हा सगळ्यांच्या जिवात जीव आला. आईने बाबांना फोन केला. बाबा जेथे होते तेथून घरी आले व त्यांनी मला मिठी मारली.

# कमल्याचा तमाशा

**रणजित गुंजवटे (इयत्ता ९ वी)**

उन्हाळ्याची सुट्टी होती. आमची जत्रा उद्या होती. तमाशा आज संध्याकाळी होता. काय कळत नसायचं तरी आम्ही तमाशाला जायचो. मी आणि कमल्या तमाशाला गेलो. सरपंचाने नारळ फोडून तमाशा सुरू केला. गवळणी झाल्या, गाणी झाली आणि मुख्य तमाशा संपताच मुलं आपापल्या घरी जाऊ लागली. कमल्या म्हणाला मीपण घरी जातो. मी म्हणालो जा. मग मी वगनाट्य बघत बसलो. वगनाट्य संपल्यावर मी घरी गेलो. घरी गेलो तर कमलेश अजून घरी नाय आला. मी म्हणलं घरात झोपला असेल. आम्ही सर्व घर फिरलो पण कमल्या काय सापडेना. मग कमलेशची आईसुद्धा रडू लागली. कमलेशच्या वडिलांनी मला अशी एक सनसनीत चापट लावली की मला तिरीमिरी आल्यासारखं झालं. तसाच मी किविलवाना चेहरा करून परत कमल्याला हुडकायला गेलो. पण कमल्या काय सापडंना झाला, मग मी कंटाळून तिथल्या एका वाळूच्या ढिगाऱ्यावर बसलो. फिरल्यामुळे मला तिथेच झोप लागली. सकाळी उठून पाहतो तर कमल्याच मला म्हणतोय आरं यड्या, इथं कुठं झोपलाय? घरी चल. खरं तर कमल्या त्याच ढिगाऱ्यावर झोपला होता. मग आम्ही दोघं घरी गेलो.

तवापासून कमल्याला घेऊन कुठल्या तमाशाला गेलो नाही.







# म्हव

**कमलेश गुंजवटे (इयत्ता ४ थी)**

एकदा सुट्टीच्या दिवशी दुपारी खेळता खेळता गव्या आला आणि म्हणाला, ''तुम्हाला माहिती आहे का? त्या आमच्या रानात हिरीपाशी लिंबावर म्हव हाय म्हणं. जावूया का फुडच्या रविवारी काढायला? पण, आदीगर बगून तर यूवकी.'' असं म्हणलं की हातातला खेळ टाकून आम्ही सगळे ते मधमाश्यांचे पोळे नीट बघण्यासाठी गेलो. म्हणजे माश्या केवढ्या आहेत. मधाचा कांदा केवढा आहे, झाड कसं आहे हे बघून कसं कसं कोणी कोणी काय काय करायचं हे ठरलं. त्या पोळ्यात किती मध मिळेल या विचारात पुढचे आठ दिवस गेले. ठरलेल्या दिवशी दुपारीच मी, गव्या, भैया आम्ही तिघेच घराबाहेर पडलो आणि गव्याच्या रानात पोहोचलो. आमच्या म्हव काढण्याच्या कामगिरीला सुरुवात झाली.

दुपारची उन्हाची वेळ असल्याने रानात कुणीच नव्हतं. येतानाच आम्ही फुल शर्ट, फुल पँट घालून आलो. आता बरोबर आणलेले टॉवेल डोक्यावरून, तोंडावरून गुंडाळून घेतले. गव्या नारळाची शेंडी आणि काडेपेटी खिशात घेऊन आधी झाडावर चढला. मग मी थोडा वर गेलो आणि



भैय्याने माझ्या हातात विळा दिला. मी वर चढलो. आम्ही दोघे म्हवापाशी पोहोचलो. मग गव्याने नारळाची शेंडी पेटवली आणि म्हवासमोर धरली. धुरामुळे सगळ्या माश्या घोंघाऊ लागल्या. दोन घावात मी ढांपी तोडली. ती खाली पडली. भैय्याने झेलली आणि तो पळत सुटला. मी झाडावरच होतो. माझ्या बोटांना दोन माश्या चावल्या होत्या, गव्यालाही दोन-तीन माश्या चावल्या. फांदी घेऊन पळताना पोळ्यावर राहिलेली एक माशी भैय्यालाही चावली. भैय्या पळत जाऊन रस्त्यावर उभा राहिला. आम्ही दोघे सरसर उतरलो व रस्त्याकडे पळत सुटलो आणि भैय्यापाशी पोचलो. आम्ही म्हव लपवत लपवत गव्याच्या घरी पोचलो. घरातील एक ताटली आणून त्यात मधाचा कांदा काढला व तिघांचे तीन वाटे केले आणि मधावर ताव मारला. जिथं माशी चावली होती तिथला काटा काढला व त्यावर मध आणि तुळशीची माती चोळली. असे आम्ही गुपचूप मध खातो.



# आमचा भैय्या

**सुजित क्षीरसागर (इयत्ता ६ वी)**

मी, आई आणि भैय्या संध्याकाळच्या वेळी असेच निवांतपणे बसलो होतो. गप्पा रंगात आलेल्या आणि का कुणास ठाऊक आई अचानक स्तब्ध झाली. मी पाहिले तर ती भैय्याकडे एकटक पहात होती. तिचे डोळे पाणावल्याचेही मला जाणवले. आई अचानक भावविवश का झाली समजेना. मी तिला विचारू लागलो. मात्र काहीच न बोलता ती माझ्याकडे व भैय्याकडे पहायची. शेवट मी तिच्या गळी हात घालून तिला बोलते करण्याचा प्रयत्न करू लागलो. तेव्हा तिने 'तो' प्रसंग सांगितला.

भैय्या साधारणतः दोन वर्षांचा होता अणि माझा तर जन्मही नव्हता. तेव्हा माझी आई, पप्पा भाडोत्री घरात राहत होते. तेथे इतरही भाडेकरू राहत होते. त्यापैकी एका भाडेकरूच्या नातेवाइकाचे सांगलीला लग्न होते आणि साहजिकच त्याने या सर्वांना लग्नाचे आग्रहाचे निमंत्रण दिले होते. सर्वजण जाण्यासाठी तयार होते. मात्र आई जाण्यासाठी नकार देत होती. कारण भैय्या लहान होता. प्रवासाची दगदग होणार होती आणि मुख्य म्हणजे आईला प्रवास बिलकुल सहन होत नसे. तरीही सर्वांच्या आग्रहाखातर आई त्या लग्नाला जाण्यास तयार झाली. खाजगी भाडोत्री वाहन करून सर्वजण निघाले आणि आईला उलट्यांचा त्रास सुरू झाला. हे सर्व सहन करीत कशीबशी सर्वजण सांगलीला पोहोचली. अर्धाअधिक दिवस लग्नाच्या ठिकाणी गेला. आईला विश्रांती हवी होती. मात्र ती मिळणे दुरापास्तच होते.

संध्याकाळी सर्वजण परतीच्या मार्गाने निघाले. गाडीत बसल्याबरोबर आईने डोळे झाकले. भैय्या पप्पांकडे असायचा आणि आताही तो पप्पांजवळच होता. सर्वजण प्रवासी थकले होते. कोणीच काहीच बोलत नव्हते. अनेकांचे डोळे झाकले जात होते. गाडी सुरू होती. मायणीमध्ये गाडी आल्यावर कोणीतरी चहा पिण्याची कल्पना काढली आणि सर्वजण एक छोटे चहाचे हॉटेल पाहून उतरले. पप्पांनी आग्रह करून आईला चहा घेण्यास सांगितले. सर्वजण चहा घेत होते. चहाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर सर्वजण गाडीत बसले आणि लगेच गाडी सुरू झाली, सुसाट वेगाने धावू लागली.

मात्र का कुणास ठाऊक आईचे खाडकन डोळे उघडले. पप्पा व इतर पुरुष मंडळी पुढील बाजूस बसली होती. तेव्हा आईने त्यांच्याकडे पाहिले पण भैय्या तिथे नव्हता आणि आईच्या काळजात धस्स झाले. तिने मोठ्यांदा ओरडून विचारले, ''सुमित कुठाय?'' आणि सर्वांना परिस्थितीचे गांभीर्य समजले. गाडी गचकन जागेवर थांबली. आई गाडीतून उतरून उलट दिशेने धावू लागली. बाकीही सारे उतरले. समोर रस्त्यावर पाहिले तर दूरवर एक छोटीशी आकृती धावत धावत येत होती. होय, तोच तो दोन वर्षे वय असणारा माझा भैय्या होता. क्षणाचाही विलंब न घालवता आई वाऱ्याच्या वेगाने तिकडे धावत निघाली. तिने त्याला उचलून घेतले. तिच्या अश्रूंना खळ नव्हता. भैय्या मात्र निर्विकार चेहऱ्याने सर्वांकडे पहात होता. आईच्या मनात अनेक विचारांनी थैमान घातले होते. जर एखादे वाहन भरधाव गतीने आले असते तर? जर कदाचित तो दुसऱ्या रस्त्याने वळला असता तर? तिला काही सुचत नव्हते आणि ती स्वतःला दोष देत होती. आईने हे सर्व सांगितल्यानंतर माझेही डोळे पाण्याने भरले होते आणि भैय्या मात्र माझ्याकडे व आईकडे पाहून मिस्कील चेहऱ्याने गालात हसत होता.

